रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९ । अंक ४७ । पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## मिग-२१ विमान होणार निवृत्त

**नवी दिल्ली :** गेल्या काही वर्षांमध्ये अनेक अपघातांमध्ये नाव आलेले मिग-२१ हे भारतीय हवाई दलाचे लढाऊ विमान निवृत्त होत आहे. भारतीय हवाई दलाकडून यासंदर्भात माहिती देण्यात आली आहे. येत्या सप्टेंबर महिन्यात विशेष कार्यक्रमात या विमानाला अखेरचा निरोप दिला जाणार आहे. शेवटची काही वर्षे या फायटर



पान २ वर


# कृषीवल

रायगड, बुधवार, दि. २३ जुलै २०२५

किंमत ४₹



शर्ट कारागीर पाहिजे

नामांकीत टेलरिंग दुकानात अनुभवी शर्ट कारागीर पाहिजे.

संपर्क : हिमसन टेलर, पेढांबे-अलिबाग.
मो. : ९२६००९८९९२


**वेधक**

### एअर इंडियाच्या विमानाला आग

**नवी दिल्ली :** हाँगकाँगवरुन दिल्लीला येणाऱ्या एअर इंडियाच्या विमानात आग लागल्याची घटना मंगळवारी घडली. दिल्ली विमानतळावर लँडिंगदरम्यान विमानात ही आग लागली. हे विमान हाँगकाँगहून दिल्लीच्या दिशेने येत होते. विमानतळावर उतरताच विमानाच्या ऑक्झिलरी पॉवर युनिट (एपीयू) ला आग लागली. सुदैवाने सर्व प्रवासी आणि कर्मचारी सुरक्षित आहेत. याबाबत अधिक माहिती एअर इंडियाने दिली आहे. एअर इंडियाच्या प्रवक्त्याने सांगितले की, मंगळवारी हाँगकाँगहून दिल्लीला येणारी फ्लाइट क्रमांक एआय ३१५ लँड झाल्यानंतर प्रवासी खाली उतरत होते. यावेळी अचानक आग लागली.

### पावसाचा जोर वाढणार

**मुंबई :** बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला असून, अरबी समुद्रात जोरदार वाऱ्याचे प्रवाह निर्माण झाल्याने मान्सूनसाठी पोषक वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे पुढील चार दिवस जोरदा पाऊस पडेल, असा इशारा भारतीय हवामान विभागने दिला आहे. दरम्यान, भारतीय राष्ट्रीय महासागर माहिती सेवा केंद्राकडून सिंधुदुर्ग, रत्नागिरी, ठाणे, मुंबई शहर, मुंबई उपनगर जिल्ह्यांच्या किनारपट्टीस २३ जुलै रोजी सायंकाळी ५.३० पासून ते २४ जुलै रात्री ८.३० वाजेपर्यंत ३.६ ते ४.३ मीटर उंच लाटा, तर पालघर आणि रायगड जिल्ह्यांच्या किनारपट्टीवर २४ जुलै रोजी रात्री ८.३० पर्यंत ३.४ ते ३.८ मीटर उंच लाटा उसळणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

### नितीश कुमार नवे उपराष्ट्रपती?

**नवी दिल्ली :** जगदीप धनखड यांनी नुकतेच आपल्या उपराष्ट्रपतीपदाचा राजीनामा दिला आहे. दरम्यान, धनखड यांच्या राजीनाम्यानंतर आता उपराष्ट्रपतीपदासाठी कोणाची निवड होणार? असा सवाल उपस्थित केले जात आहे. आता या पदासाठी थेट नितीश कुमार यांची निवड करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. भाजपाचे आमदार हरिभूषण ठाकूर बचौल यांनी नितीश कुमार यांची उपराष्ट्रपती म्हणून नियुक्ती झाली तर यापेक्षा चांगली बाब कोणती असू शकते. बिहारसाठी ही गौरवास्पद बाब असेल, असं म्हटलंय. याआधी नितीश कुमार यांना देशाचे उपपंतप्रधानपद द्यायला हवे, असे विधान भाजप आ. हरिभूषण ठाकूर बचौल यांनी केले आहे.

# महाराष्ट्र सरकार भिकारी

- **कृषीमंत्री कोकाटे पुन्हा बरळले**
- **सरकारमध्ये राहून सरकारचीच काढली लाज**

। मुंबई । प्रतिनिधी ।

**कृषीमंत्री माणिकराव कोकोटे सभागृहात रमी खेळत असल्याचा कथित व्हिडिओ समोर आल्याने विरोधकांच्या निशाण्यावर असतानाच आता 'महाराष्ट्र शासन भिकारी' असल्याचे म्हटल्याने टीकेचे लक्ष्य झाले आहेत. पीक विम्यासंदर्भात केलेल्या विधानावर स्पष्टीकरण देताना त्यांची गल्लत झाली आणि महाराष्ट्र शासन भिकारी असल्याचं म्हटलं. शेतकऱ्यांकडून एक रुपया शासन घेतं, पण शेतकऱ्याला एक रुपया देत नाही. म्हणजे, भिकारी शासन आहे, शेतकरी नाही, असे त्यांनी म्हटले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोकाटेंनी केलेले विधान चुकीचे असून, नाराजी व्यक्त केली आहे. तर, विरोधकांनीही कोकाटेंच्या विधानाचा खरपूस समाचार घेतला आहे.**

कृषीमंत्री माणिकराव कोकाटे हे चांगलेच अडचणीत सापडले आहेत. विरोधकच नाही तर सत्ताधारी पक्षातील आमदारांनीदेखील त्यांच्याविषयी नाराजी व्यक्त कली आहे. इतकेच नाही तर स्वतः मुख्यमंत्र्यांनी याबाबत नाराजी व्यक्त केली आहे. दरम्यान, झाल्या घटनेवर स्पष्टीकरण देण्यासाठी मंगळवारी पत्रकार परिषद बोलावल्यानंतर कोकाटे यांनी पुन्हा एकदा वादग्रस्त विधान केले आहे. मी राज्यातील शेतकऱ्यांना भिकारी असल्याचे म्हणालो नव्हतो, तर महाराष्ट्राचे सरकारच भिकारी असल्याचे कोकाटे यांनी म्हटले आहे. त्यांच्या या विधानामुळे आता पुन्हा वादंग उठले आहे.



> माणिकराव कोकाटे आज खूपच पुढे गेलेत. राज्य शासन भिकारी आहे, हे ते म्हणालेत. मग भिकाऱ्यांच्या नेत्यांकडे ५०-५० कोटी कुठून येतात? हे कळालं पाहिजे. कोकाटे यांनी वारंवार शेतकऱ्यांबद्दल वादग्रस्त वक्तव्यं केली आहेत. आम्ही तुम्हाला कर्ज देतो, त्या कर्जात तुम्ही मुलींची लग्न करता, असं कोकाटे म्हणाले होते. अशी माणसे त्या मंत्रीपदावर बसणं योग्य नाही.
>
> – खा. अरविंद सावंत, शिवसेना ठाकरे गट

> शेतकऱ्यांच्या प्रती अतिशय असंवेदनशील वागणारे कृषीमंत्री या राज्याने कधीही पाहिले नव्हते. त्यात सभागृहात मोबाईलवर रमी खेळून या सगळ्यांवर त्यांनी कडी केली आहे. आजच्या पत्रकार परिषदेत ते पश्चाताप व्यक्त करुन राजीनाम देतील, अशी अपेक्षा होती. त्यापेक्षा त्यांनी राज्यालाच भिकारी म्हणून कळस गाठला आहे. मुख्यमंत्र्यांनी त्यांचा राजीनामा घेऊन हे खाते शेती आणि शेतकरी यांच्याप्रती संवेदनशीलतेने वागणाऱ्या व्यक्तीकडे द्यावे.
>
> – खा. सुप्रिया सुळे


यावेळी बोलताना माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्यांच्या एक रुपयात पीक विम्यासंदर्भातदेखील आपण केलेल्या वक्तव्यावरुन झालेल्या वादावर स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केला. मात्र, हे स्पष्टीकरण देत असताना त्यांनी मी शेतकऱ्यांना भिकारी म्हणालो नव्हतो, असे सांगितले. पान २ वर

> ते काय बोलले हे एकलं नाही, पण तसं वक्तव्य केलं असेल तर मंत्र्यांनी अस वक्तव्य करणे चुकीच आहे. पीक विम्याच्या संदर्भात जाणीवपूर्वक निर्णय घेतला आणि त्याची पद्धत बदलली. काही वर्षांमध्ये शेतकऱ्यांना फायदा झाला असला तरी बहुतांश वर्षामध्ये कंपन्यांना फायदा जास्त झाला. त्यामुळे आपण त्याची पद्धत बदलली. त्यांचबरोबर ५ हजार कोटी रूपये दरवर्षी शेतीमध्ये गुंतवणूक करू. २५ हजार कोटी रूपयांची शेतीमधील गुंतवणूक वाढवत आहोत, असे असताना अशा प्रकारचे वक्तव्य योग्य नाही.
>
> – देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री

# उपराष्ट्रपतींचा राजीनामा

## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मूंकडून मंजूर

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।



उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी प्रकृती अस्वास्थ्याच्या कारणास्तव सोमवारी अचानक राजीनामा दिला. आपल्याला प्रकृती अस्वास्थ्य जाणवत असून, आता आरोग्याला प्राधान्य देण्यासाठी राजीनामा देत असल्याचे ७४ वर्षीय धनखड यांनी म्हटले आहे. ते २०२२ पासून उपराष्ट्रपतीपदावर होते. त्यांच्या अचानक राजीनाम्यामुळे राजकीय वर्तुळात तर्क-वितर्क करण्यात येत आहेत. आता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांचा राजीनामा स्वीकारला आहे. तसेच गृहमंत्रालयानेही याबाबतची अधिसूचना जारी करण्यात आली आहे.

जगदीप धनखड यांनी सोमवारी संध्याकाळी अचानक आपल्या पदाचा राजीनामा दिला. आरोग्याला प्राधान्य देण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मंगळवारी त्यांचा राजीनामा स्वीकारला. संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी त्यांनी राजीनामा देणे हे खूपच आश्चर्यकारक आहे. दिवसभर ते राज्यसभेत उपस्थित होते, जिथे ऑपरेशन सिंदूर आणि पहलगाम हल्ल्यावरून सभागृह नेते जेपी नड्डा आणि विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांच्यात जोरदार वादविवाद झाला. नंतर त्यांनी विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्षाची बैठक बोलावली. त्यात सत्ताधारी पक्षाचे खासदार आले नाहीत. यानंतर, संध्याकाळी उशिरा जगदीप धनखड यांनी राजीनामा जाहीर केला. त्याबाबत राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहेत. दरम्यान, धनखड यांच्या राजीनाम्यामुळे राज्यसभेचे सभापतीपद रिक्त झाले आहे. उपराष्ट्रपतींची निवडणूक सहा महिन्यांत घेणे बंधनकारक आहे.

# एसटी कर्मचाऱ्यांच्या पेन्शनचा घोळ

प्रमोद जाधव

। अलिबाग ।

एसटीच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना कष्टाची जमापुंजी मिळविण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. पेन्शनमध्ये झालेल्या घोळामुळे सेवानिवृत्तीनंतर त्यांचे जगणेही मुश्कील झाले आहे. जिल्ह्यातील डेपोसह विभागीय कार्यालयाकडून चुकीची माहिती भविष्य निर्वाह भत्ता कार्यालयात पाठविण्यात आली. त्याचा फटका जिल्ह्यातील ९९ हून अधिक पेन्शनधारकांना बसला आहे. निवृत्तीला सात वर्षे होऊनही या कर्मचाऱ्यांना पेन्शनच मिळाली नाही. तसेच काही कर्मचारी सेवानिवृत्त नसताना, त्यांच्या नावाची पेन्शन चालू करून घेण्यात आली आहे. रामवाडी येथील विभागीय कार्यालयातील प्रताप यातून उघड झाला आहे. त्यामुळे यामागे नक्की काय अर्थकारण लपले आहे, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

एसटी महामंडळ रायगड विभागीय कार्यालयाच्या अखत्यारित अलिबाग, पेण, रोहा, कर्जत, माणगाव, श्रीवर्धन, मुरूड, महाड असे आठ एसटी बस आगार आहेत. जिल्ह्यात १९ बस स्थानके आहेत. जिल्ह्यात ४८० हून एसटी बसेस आहेत. यापैकी ३०० हून अधिक बसेस सीएनजीवर चालणाऱ्या आहेत. एसटीतून महिन्याला एक लाखाहून अधिक प्रवासी प्रवास करतात. यातून एसटीला महिन्याला ३७ लाख रुपयांहून अधिक उत्पन्न मिळते. रायगड विभागात अडीच हजार कर्मचारी कार्यरत आहेत. यामध्ये चालक व वाहकांची महत्त्वपूर्ण भूमिका असते. प्रवाशांना त्यांच्या निश्चित स्थळी सुखरुप सोडण्याचे काम चालक व वाहक करतात. क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी घेऊन एसटीच्या पान २ वर

**क्लार्कच्या भोंगळ कारभाराचा फटका**

**रात्रीचा दिवस करून चालक, वाहक व इतर कर्मचाऱ्यांनी प्रवाशांना सेवा देण्याचे काम केले. एसटी महामंडळ विभागात ३६ वर्षांपासून २५ वर्षे सेवा करून अनेकजण सेवानिवृत्त झाले. मात्र, अलिबागसह अन्य आगारांतील क्लार्कच्या भोंगळ कारभाराचा फटका सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना बसला आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्याच्या नावात चूक असण्यापासून जन्म वर्ष व इतर चुकीची माहिती पाठविल्याने सेवानिवृत्त कर्मचारी अजूनही पेन्शनच्या प्रतीक्षेत आहेत. त्यामुळे या क्लार्कच्या कामांबाबत संशय व्यक्त करण्यात येत असून, त्यांची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी होत आहे.**

> पेन्शनधारक कर्मचाऱ्यांच्या ज्या त्रुटी होत्या, त्या सोडविण्यात आल्या असून, पेन्शन कार्यालयाला त्याची माहिती पाठविण्यात आली आहे. ज्या कर्मचाऱ्यांची चुकीची माहिती गेलेली आहे, त्याबाबत योग्य ती कार्यवाही करुन त्यांना पेन्शन सुरळीत करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.
>
> – दिपक घोडे, विभागाय नियंत्रक, पेण

## भरपावसात डांबरीकरण

### ठेकेदाराचा अजब कारभार



(छायाचित्र : समीर मालोदे)

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग-पेण मार्गावर पडलेल्या खड्ड्यांमुळे नागरिक त्रस्त झाले आहे. पावसाळ्यात या खड्ड्यांची दुरुस्ती करणे आवश्यक असताना, त्याकडे संबंधित विभागाने दुर्लक्ष केले. आता भरपावसात चेंढरे बायपासपासून पुढील खड्डे डांबरीकरण करून भरण्यात आले आहेत. ठेकेदाराचा अजब कारभार यातून दिसून आला आहे. खड्ड्यांवर लाखो रुपये खर्च करून आर्थिक लूट होत असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

अलिबाग-पेण मार्गावरील रस्ता नक्की कोणाचा अखत्यारित आहे? सार्वजनिक बांधकाम विभाग की राष्ट्रीय महामार्ग पान २ वर

**गाडीला दे धक्का!**




**चेंढरे बायपासपासून खड्डे बुजविण्यास सुरुवात केली. डांबर, खडीचा वापर करीत खड्ड्यांची दुरुस्ती ठेकेदाराच्या मार्फत करण्यात आली. मात्र, मालाची वाहतूक करणारा ट्रकच बंद पडला. त्यामुळे या ट्रकला धक्का देण्याची वेळ कामगारांवर आली.**

## लाचखोर पोलीस उपनिरीक्षक सचिन वाईकरला अटक

### लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई

। पनवेल । प्रतिनिधी ।

अंतरिम जामीन नामंजूर करून वडिलांना अटक करेन, अशी भीती दाखवत लाचेची मागणी करत ५० हजारांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने पनवेल शहर पोलिस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक सचिन वाईकर यांना अटक केली आहे.



तक्रारदार यांचे वडिलांच्या विरुध्द पनवेल शहर पोलीस ठाणे येथे दाखल असलेल्या गुन्ह्यामध्ये कलम वाढ करून, तक्रारदार यांचे वडिलांचा अंतरिम जामीन नामंजूर करून त्यांना अटक करेन, अशी भीती घालत असल्याबाबत व अटक न करण्याकरिता पनवेल शहर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक सचिन वामन वाईकर यांनी एक लाख रूपयांची मागणी करीत असल्याबद्दल तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे प्राप्त झाली होती.त्यानुसार दि. २१ जुलै रोजी मारूती कुशन, छत्रपती शिवाजी महाराज चौक पनवेल येथे सापळा लावला असता पोलीस उपनिरीक्षक सचिन वामन वाईकर यांनी मागणी केल्याप्रमाणे लाचेची रक्कम ५० हजार रूपये त्यांचे व्हॅगन आर कारमध्ये खासगी इसम रवींद्र उर्फ सचिन पान २ वर

## अवैध सावकारीचा फास आवळला

### पेण येथील उद्योजक पितापुत्राविरुद्ध गुन्हा दाखल

। पेण । प्रतिनिधी ।

पेण तालुक्यातील अवैध सावकारीचा फास अखेर पोलिसांनी आवळला असून, प्रसिद्ध उद्योजक असणाऱ्या पितापुत्राविरुद्ध पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहकार खात्याने अवैध सावकारीची दखल घेत पोलिसात तक्रार दाखल करताच गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. मात्र, अद्याप आरोपींना अटक झालेली नसून, राजकीय दबावापुढे त्यांना अटक होईल की नाही, याबाबत प्रश्नचिन्ह आहे.

पेण येथील उद्योजक तथा हॉटेल व्यावसायिक सुरेशशेठ उर्फ सूर्यकांत जोमा पाटील हे अवैधरित्या सावकारी करत असल्याचा आरोप



त्यांची सून प्रज्ञा हिने पत्रकार परिषद घेऊन दोन महिन्यांपूर्वी सांगितले होते. परंतु, याबाबीकडे सर्वांनीच दुर्लक्ष केले होते. मात्र, १८ जुलै रोजी एलसीबीकडून सूर्यकांत पाटील आणि त्यांचा मुलगा भरत पाटील यांच्या गोमांतक हॉटेल व आमंत्रण सोसायटीचा प्लॅट नंबर ३०१, ३०२ यावर छाप टाकला असता, या छाप्यामध्ये पोलिसांच्या हाती विविध बँकांचे रकमा भरलेले व तसेच कोरे धनादेश, विविध मालमत्तांचे करारनामे, वचन पावत्या, खरेदीखत, गावनकाशे यासंह अनेक आक्षेपार्ह कागदपत्रे सापडली. पूर्ण झाडाझडती झाल्यानंतर पोलिसांनी सर्व माहिती सहाय्यक निबंधक सहकार सुभाष काळे यांच्याकडे दिली होती. या सर्व बाबींची सुभाष काळे यांनी पडताळणी करुन २१ जुलै रोजी सायंकाळी पेण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्याच्या प्रक्रियेला सुरुवात झाली. तो गुन्हा २२ जुलै रोजी सकाळी ६ वाजून २ मिनिटांनी दाखल झाला. पूर्ण रात्रभर या गुन्ह्याची नोंद करण्याची प्रक्रिया सुरू होती. यावरुन पोलिसांच्या हाती आणि सहकार पान २ वर

## निविदा न काढताच कामांना मंजुरी

- **तळा तालुक्यातील ग्रामपंचायतींमधील गैरप्रकार समोर**
- **कामात राजरोसपणे भ्रष्टाचार करण्याची नामी युक्ती?**

। तळा । प्रतिनिधी ।

केंद्र सरकारने १५ व्या वित्त आयोगाचा निधी ग्रामपंचायतींना थेट हस्तांतरण करून विकासासाठी दिलेला निधी ग्रामपंचायत बंधित व अबंधित कामासाठी वापरतात. ग्रामपंचायत ग्रामसभामधून कामांची निवड करुन आराखडा बनविला जातो. परंतु, शासन निर्णयानुसार पाच रुपयांच्या वरील रकमेच्या कामाच्या निविदा मागविणे कायद्यात असूनही तळा तालुक्यातील काही ठराविक ग्रामपंचायती वगळता बहुतांशी ग्रामपंचायतींमध्ये कुठेही वर्तमानपत्रात जाहिराती न देता आपल्या मर्जीतील ठेकेदारांना काम देणे, कामात अनियमितता, कामे निकृष्ट दर्जाची तर काही बोगस कामे होत असताना दिसत आहेत. त्यामध्ये बांधकाम अधिकारी यांचा निष्काळजीपणाही कारणीभूत असून, अशा विविध प्रकारच्या समस्या निर्माण होऊन कामाकडे अक्षरशः दुर्लक्ष केले जात आहे.

या निधीचा गैरवापरही होत असून, केंद्र सरकारने दिलेल्या निधीतून चांगली पान २ वर

**निधीअभावी कामाला ब्रेक लागण्याची माहिती** | **रायगडकरांचे स्वप्न पूर्ण होणार कधी?**


# किहीमचे पक्षी अभ्यास केंद्र अपूर्णावस्थेत

। अलिबाग । प्रतिनिधी ।

**पक्षी शास्त्रज्ञ डॉ. सलीम अली यांच्या नावाचे किहीमध्ये पक्षी अभ्यास केंद्र उभारणीचा गाजावाजा जिल्हा परिषद व वन विभागामार्फत करण्यात आला. मात्र, साडेतीन वर्षे होऊनदेखील हा प्रकल्प अद्याप पूर्ण झाला नाही. निधीअभावी या प्रकल्पाच्या कामाला ब्रेक लागला आहे. त्यामुळे अलिबागसह संपूर्ण रायगडकारांचे स्वप्न अपूर्णच राहणार असल्याची शक्यता वर्तविली जात आहे.**

अलिबाग तालुक्यातील किहीम येथील जिल्हा परिषदेची शाळा २००७ पासून बंद होती. या ठिकाणी डॉ. सलीम अली यांच्या नावाचे पक्षी अभ्यास व संशोधन केंद्र उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. रायगड जिल्हा परिषद व वन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने या प्रकल्पाची उभारणी करण्याच्या हालचाली सुरू झाली. जिल्हा परिषद शिक्षण विभागाची परवानगी घेऊन ११ जानेवारी २०२२मध्ये या प्रकल्पाच्या कामाचा भूमीपूजन सोहळा मोठ्या थाटामाटात झाला. तत्कालीन पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते या पान २ वर







> डॉ. सलीम अली पक्षी अभ्यासकेंद्राच्या कामासाठी प्रादेशिक पर्यटनातून एक कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला होता. आतापर्यंत ५० लाख रुपये या कामासाठी खर्च झाले आहेत. जास्तीच्या निधीची तरतूद नसल्याने हे काम थांबले आहे. निधी प्राप्त झाल्यास कामाला सुरुवात केली जाईल.
>
> – बांधकाम अधिकारी, जि.प.

## हुतात्मा स्मारकात बकऱ्यांचा गोठा

- **रेवदंड्यातील शेषनाथ वाडेकर स्मारकाची दुरवस्था**
- **पुढारी, प्रशासन आणि शासन अद्याप गाढ झोपेत**

निलेश फुंडे

। रेवदंडा ।

देशासाठी रक्त सांडणाऱ्या हुतात्मा शेषनाथ वाडेकर यांचं रेवदंड्यातील स्मारक आज उपेक्षेच्या खोल खाईत ढकललं गेलं आहे. स्मारकात बकऱ्यांचा गोठा तयार करण्यात आला आहे. स्मारकाभोवती झाडझुडपं वाढलेली, गेटजवळ कचऱ्याचे ढिगारे, परिसरात दुर्गंधी, स्मारकात पान २ वर





> देशासाठी रक्त सांडणाऱ्या हुतात्म्याचं स्मारक जर कचऱ्याचं ढिगारं, गर्दुल्ल्यांचा अड्डा, बकऱ्यांचा गोठा आणि प्रेमीयुगुलांचं हॉटस्पॉट बनलं असेल, तर स्वातंत्र्यदिन साजरा करायचा अधिकारच कोणाला? देशप्रेम भाषणात नको, कृतीत दिसलं पाहिजे. रेवदंडा गावाचं हे लज्जास्पद वास्तव बदललं नाही तर ही फक्त देशभक्तीची नौटंकी ठरेल.
>
> – संदीप म्हात्रे, सामाजिक कार्यकर्ते

## पान १ वरून

## मिग-२१ विमान होणार निवृत्त

जेटसाठी कमालीची आव्हानात्मक राहिली असली, तरी त्याआधी भारताच्या अनेक महत्त्वपूर्ण मोहिमांमध्ये मिग-२१ नं मोलाची भूमिका बजावली आहे. यात १९६५ च्या युद्धापासून अगदी हल्लीच्या ऑपरेशन सिंदूरचादेखील समावेश आहे. १९६२ साली मिग-२१ विमानं भारताच्या हवाई दलाच्या ताफ्यात सामील करण्यात आली. तेव्हापासून अनेक महत्त्वाच्या युद्धांमध्ये ही विमानं भारतीय हवाई दलाच्या मोहिमांचा प्रमुख भाग राहिली आहेत. यात १९६५ व १९७१ ची भारत-पाकिस्तान युद्धं, १९९९ चं कारगिल युद्ध, २०१९ चा बालाकोट एअर स्ट्राईक आणि ऑपरेशन सिंदूरमध्ये भारतानं पाकिस्तानच्या हद्दीत व पाकव्याप्त काश्मीरमध्ये राबवलेली हवाई मोहीम यांचा समावेश आहे.

## महाराष्ट्र सरकार भिकारी

वास्तविक, शेतकरी नाही तर शासनच भिकारी असल्याचे म्हटले आहे. शासन शेतकऱ्यांकडून एक रुपया घेता. त्याचा अर्थ शासन भिकारी आहे, असे कोकाटे यांनी म्हटले आहे. त्यांच्या वक्तव्यावरुन आता वाद वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. इतकेच नाही तर, त्यांच्या या वक्तव्यामुळे पुन्हा एकदा त्यांच्या राजीनाम्याची मागणी जोर धरत आहे.

## भरपावसात डांबरीकरण

विभाग, हे अद्यापही गुलदस्त्यात आहे. या रस्त्याची जबाबदारी घेण्यास सार्वजनिक बांधकाम विभाग तयार नाहीत. तर, राष्ट्रीय महामार्ग विभागाकडून या रस्त्याच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष, अशी परिस्थीती निर्माण झाली आहे. दरवर्षी पावसाळ्यात या रस्त्यावरून खड्ड्यांतून प्रवास करावा लागत असतो. संबंधित विभाग याबाबत जबाबदारी स्वीकारण्यास तयार नसल्याने प्रवाशांना प्रचंड त्रास आहे. शहराच्या प्रवेशद्वारासमोर पडलेल्या खड्ड्यांची दुरुस्ती अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांनी पुढाकार घेत सामाजिक बांधिलकी जपत केली. त्यामुळे प्रवाशांनी समाधान व्यक्त केले. बांधकाम विभाग या खड्डेमय रस्त्याच्या दुरुस्तीबाबत उदासीन असल्याचे दिसून आले आहे. पावसाळ्यापूर्वी डांबरीकरण करून रस्ता दुरुस्त करणे गरजेचे असताना, भरपावसात ठेकेदाराने डांबरीकरण करून दुरुस्ती केली. मात्र, डांबरीकरण करून टाकण्यात आलेली खडी विखुरली. त्यामुळे काही क्षणातच दुरुस्तीचा खर्च वाया गेला. पावसाळ्यात डांबरीकरणाने खड्डे बुजविण्याच्या ठेकेदाराच्या प्रतापाबाबत अनेकांकडून नाराजीचे सूर उमटत आहेत.

## अवैध सावकारीचा फास आवळला

निबंधकांच्या हाती लागलेली माहिती अथवा कागदपत्रे केवढी असतील याविषयी अंदाजही बांधता येणार नाही.

सहाय्यक निबंधक सुभाष काळे यांनी पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार, सूर्यकांत जोमा पाटील व भरत सूर्यकांत पाटील यांच्याविरुद्ध वेगवेगळे दोन गुन्हे नोंदले गेले. एकंदरीत, सफेद कपड्यांच्या आतून समाजसेवा करण्याचा पांघरूण घेतलेल्या सूर्यकांत जोमा पाटील व भरत सूर्यकांत पाटील यांचा खरा चेहरा सहकार खात्याने गुन्हा नोंदल्याने समोर आला आहे. या गुन्ह्याचा अधिक तपास जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदीप बागुल, सहायक पोलीस निरीक्षक निलेश राजपूत हे करत आहेत. मात्र, या गुन्ह्यामध्ये आरोपींना अटक झाली नाही. परंतु, आरोपींना अटक होईल की नाही, याबाबत निश्चित माहिती नाही.

## निविदा न काढताच कामांना मंजुरी

विकासकामे होताना दिसत नाही. यात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असल्याचे बोलले जात आहे. सध्या तर अनेक ग्रामपंचायतींवर प्रशासक असल्याने ग्रामविकास अधिकारी आणि प्रशासक यांच्या कारभारात या निधीचा विनियोग हा नागरिकांना विश्वासात न घेता करत असल्याने 'आंधळा दळतो आणि कुत्रं पीठ खातो' अशी स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात येणारा हा निधी ग्रामपंचायतीमध्ये विकासासाठी येतो की आपल्या मर्जीतील ग्रामपंचायत अधिकारी व पुढारी यांच्या संगनमताने वापरण्यासाठी येतो, असा प्रश्न सुज्ञ नागरिक करीत आहेत. या कामाच्या जाहिराती वर्तमानपत्रात दिल्यास ती कामे योग्य ठेकेदारांना मिळतील, शिवाय कामांना निधी आला आणि काम सुरू होणार आहे हे त्या त्या हद्दीत राहणाऱ्या नागरिकांनाही कळतील. त्यामुळे त्या कामात पारदर्शकता आणण्यासाठी कामाच्या निविदा प्रक्रिया करणे क्रमप्राप्त आहे. हे असताना त्या का होत नाही, त्याला जबाबदार कोण आहे, असे अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. याकडे संबंधित गटविकास अधिकारी यांनी लक्ष देऊन या कामाच्या निविदा मागविणे यासाठी ग्रामपंचायत अधिकारी यांना आदेश द्यावेत, अशी मागणी तालुक्यातील नागरिकांच्या वतीने होत आहेत.

अशा ग्रामीण भागातील या निधीचा योग्य वापर व्हावा यासाठी तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये अशा वित्त आयोगाच्या निधीचा विनियोग योग्य होण्यासाठी कामाच्या निविदा मागविणे बंधनकारक करण्यात यावे, यासाठी रायगड जिल्हा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत अधिकारी यांना लेखी आदेश करावे, अशीही मागणी आम जनतेच्यावतीने होत आहे.

## हुतात्मा स्मारकात बकऱ्यांचा गोठा

बकऱ्यांचा गोठा, दिवसाढवळ्या प्रेमीयुगुलांचं मनमोकळं 'मनोमिलन', रात्री दारुड्यांचा व गर्दुल्यांचा अड्डा झाला आहे. हुतात्म्यांच्या स्मारकाची ही विदारक प्रतिमा शासनाला आणि स्थानिक पुढाऱ्यांना दिसत नाही का? स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात देशभक्तीची गोडवी गाणाऱ्यांनी एकदा तरी या स्मारकाला भेट द्यावी! मग कळेल खऱ्या देशभक्ताचा, शेषनाथ वाडेकरांचा अपमान कसा केला जातोय, असा संताप येथील जनता करीत आहे.

हुतात्म्यांच्या बलिदानामुळे आपण आज स्वातंत्र्याचा श्वास घेतो. पण, या बलिदानाचं स्मारक जर बकऱ्यांचे गोठे, गर्दुल्यांचे अड्डे आणि कचऱ्याचं डंपिंग ग्राऊंड बनत असेल, तर ही केवळ लाजिरवाणी गोष्ट नाही तर जनतेने आणि पुढाऱ्यांनी मिळून केलेली 'राष्ट्रभक्तीची फसवणूक' आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार, रायगड जिल्हा प्रशासन आणि स्थानिक ग्रामपंचायत सगळ्यांचं लक्ष वेधणं, ही आता काळाची गरज आहे. लोकसहभागाच्या नावाखाली योजनांची जाहिरात होते, पण हुतात्म्याच्या स्मारकासाठी एकतरी योजना किंवा निधी मिळाला का? ''पुतळे उभे करायचे, भाषणं द्यायची, फलक लावायचे... पण, त्या पुतळ्यांचं काय? त्यांच्या स्मृतींचं काय? देशप्रेम केवळ १५ ऑगस्टपुरतं नको, ते कृतीत दिसायला हवं!'', असे रेवदंड्यातील जनतेचं म्हणणं आहे.

## एसटी कर्मचाऱ्यांच्या पेन्शनचा घोळ

उत्पन्नवाढीसाठी हे कर्मचारी काम करतात.

जिल्ह्यामध्ये गेल्या सात वर्षांपासून अनेक एसटी कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत. या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी २५ वर्षांपासून ३६ वर्षांपर्यंत सेवा देण्याचे काम केले. सेवानिवृत्त झाल्यावर त्यांचा थाटामाटात निरोप समारंभ केला जातो. मात्र, सेवा करून कमविलेली पुंजी पुढील आयुष्यासाठी उपयोस यावी, म्हणून शासनाच्या तिजोरीत जपून ठेवली असतानाही त्यांना ती वेळेवर मिळत नसल्याचा प्रकार समोर आला आहे. पेन्शन विभागाचे कामकाज पाहणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे सेवानिवृत्त कर्मचारी गेल्या अनेक वर्षांपासून पेन्शनपासून वंचित आहेत. अलिबागसह अन्य आगारांतील कार्यालयाकडून विभागीय कार्यालयात त्यानंतर विभागीय कार्यालयाकडून नवी मुंबई येथील भविष्य निर्वाह भत्ता कार्यालयात पेन्शनधारकांची सर्व माहिती व कागदपत्रे पाठविण्याचे काम केले जाते. परंतु, डेपोतील क्लार्क आणि विभागीय कार्यालयातील क्लार्ककडून माहिती चुकीची पोहोचत असल्याने अनेक कर्मचारी पेन्शनपासून दूरच असल्याचा प्रकार समोर आला आहे.

सेवानिवृत्त होऊन सात वर्षे झाली आहेत. तरीदेखील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पेन्शन मिळाली नाही. काही कर्मचाऱ्यांचे चुकीचे नाव, त्याच्या नातेवाईकांचे चुकीचे नाव, जन्म वर्ष अशी चुकीची माहिती विभागीय कार्यालयाकडून भविष्य निर्वाह भत्ता कार्यालयात पोहोचल्याचा धक्कादायक प्रकार दिसून आला आहे. त्यांच्या भोंगळ कारभारामुळे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पेन्शनपासून वंचित राहावे लागत आहे. या प्रकारामुळे विभागीय कार्यालयातील सावळागोंधळ समोर आला आहे.

पेन्शन नसल्याने अनेकांना घरखर्च कसा चालवावा, असा प्रश्न समोर झाला आहे. त्यामुळे गलथान कारभार करणाऱ्या कर्मचाऱ्यांविरोधात कारवाई करण्यात यावी, अशी मागणी होत आहे. जिल्ह्याचे विभागीय नियंत्रक दिपक घोडे यांनी याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी करण्यात येत आहे.

मागील वर्षी जून महिन्यात सेवानिवृत्त झालो आहे. सेवानिवृत्त होऊन एक वर्षे एक महिना झाला आहे. पेन्शन वेळेवर मिळावी, म्हणून लागणाऱ्या कागदपत्रांची पूर्तता अलिबाग कार्यालयासह रामवाडी येथील कार्यालयात करण्यात आली. परंतु, अजूनपर्यंत पेन्शन मिळाली नाही. त्यामुळे मोठा आर्थिक फटका बसत आहे. याबाबत अलिबागमधील कार्यालयात जाऊन विचारणा केल्यावर तेथील क्लार्ककडून उडवाउडवीची उत्तरे दिली जात आहेत. अनेकांची पेन्शनची रक्कम थकली आहे. कार्यालयातील गलथान कारभाराचा त्रास सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना होत आहे, असे सेवानिवृत्त कर्मचारी प्रसन्न पाटील यांनी सांगितले. एसटी महामंडळ रायगड विभागातील मुरूड एसटी बस आगारात चालक म्हणून २५ वर्षे सेवा केली आहे. २०२२ मध्ये मी सेवानिवृत्त झालो. मात्र, मला २०१९ मध्ये सेवानिवृत्त दाखवून माझ्याच्या नावाच्या अन्य कर्मचाऱ्याच्या नावे पेन्शन काढण्यात आली आहे. याबाबत नवी मुंबई येथील भविष्य निर्वाह भत्ता कार्यालयात जाऊन माहिती दिली. त्यानंतर रामवाडी येथील विभागीय कार्यालयात जाऊन सांगितले. ही चूक विभागीय कार्यालयाकडून झाल्याचे पत्र भविष्य निर्वाह भत्ता कार्यालयाला दिले आहे. परंतु, अद्याप पेन्शन देण्याबाबत कार्यवाही झाली नाही. त्यामुळे मोठी आर्थिक हानी झाली आहे. कमविलेली पुंजी पेन्शनच्या रुपात वेळेवर मिळत नसल्याने खूप त्रास होतो, असे सेवानिवृत्त चालक राजेंद्र नाईक यांनी सांगितले.

**एसटी महामंडळाचा गलथान कारभार**

एसटी महामंडळ रायगड विभागातील आगारात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची आर.एम. नाईक, पी.डी नाईक अशा नावाची नोंद केली जाते. या नोंदीचा फटका पेन्शन मिळताना होत आहे. एसटी महामंडळाच्या गलथान कारभारामुळे अनेकजण पेन्शनपासून वंचित राहिले असल्याचे चित्र आहे.

## सचिन वाईकरला अटक

सुभाष बुट्टे (३०, रा. करंजाडे, सेक्टर एक) यांच्यामार्फत स्वीकारल्याचे आढळून आले. त्याचवेळी त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रायगडच्या पोलीस उपअधीक्षक सरिता भोसले, पोलीस निरीक्षक निशांत धनवडे, सहाय्यक फौजदार विनोद जाधव, पोलीस हवालदार महेश पाटील, पोलीस शिपाई नवदीत नांदगावकर यांनी ही कारवाई केली आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

## किहीमचे पक्षी अभ्यास केंद्र अपूर्णावस्थेत

प्रकल्पाच्या कामाचा शुभारंभ झाला. एक वर्षात हा प्रकल्प उभा राहण्याची अपेक्षा होती. या प्रकल्पासाठी जिल्हा नियोजन समितीकडून ५५ लाख प्रादेशिक पर्यटनातून एक कोटी २० लाख असा एकूण एक कोटी ७० लाख रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली होती. 'नव्याचे नऊ दिवस' या उक्तीप्रमाणे प्रकल्पाचे काम सुरू झाले. यासाठी ५० लाख रुपये खर्च करण्यात आले. मात्र, तीन वर्षे सहा महिने होऊनदेखील या प्रकल्पाचे काम पूर्ण झाले नाही. निधी नसल्याने या प्रकल्पाचे काम रखडले आहे, असे संबंधित विभागाकडून सांगण्यात येते. याबाबत अधिक माहितीसाठी जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता राहुल देवांग यांच्याशी संपर्क साधला असता, तो होऊ शकला नाही.

डॉ. सलीम अली हे पक्षी अभ्यासक होते. किहीम येथे राहात असताना त्यांनी अनेक पक्ष्यांचा अभ्यास केला आहे. त्यामुळे सलीम अली यांच्या नावाचे पक्षी अभ्यास केंद्र बांधण्याची संकल्पना उदयास आली. पर्यटनवाढीला चालना देणे, वेगवेगळ्या पक्ष्यांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या प्रकल्पातून करण्यात आला आहे. डिजिटल माहिती केंद्र, पक्ष्याविषयी लिहिलेल्या पुस्तकांचे ग्रंथालय या ठिकाणी उभारण्यात येणार आहे. परंतु, शासनाकडून निधी प्राप्त झाला नाही. त्यामुळे हा प्रकल्प अपूर्णावस्थेत राहिला आहे.

## विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप


(छायाचित्र : संजय गायकवाड)

**| कर्जत | प्रतिनिधी |**

सद्भाव फाऊंडेशन संस्थे अंतर्गत प्राथमिक शाळेत शैक्षणिक साहित्य व स्कूल बॅगचे मोफत वाटप करण्यात आले.

तालुक्यातील प्राथमिक शाळा वंजारपाडा, चाफेवाडी, पादीरवाडी, मेंगाळवाडी, चेवणे, भोपळेवाडी, मोहमाळवाडी, पालीआदीवासी वाडी, कलोते, किरवली या शाळांना शैक्षणिक साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले मान्यवराच्या हस्ते दिप प्रज्वल करून शाळेच्या मुख्याध्यापिका यांनी प्रास्ताविक केले, याप्रसंगी सद्भाव फाऊंडेशनच्या ट्रस्टी नीता दोशी, योगी डिवाईन सोसायटीचे आनंदभाई उपस्थित होते. था कार्यक्रमात सद्भाव फाउडेशनचे कार्यकर्ते प्रगती, पाटील, प्रतिक्षा दगडे, केतन लाड, किर्ती लाड, कमिटीचे अध्यक्ष बडेकर, किरवली शाळेचे सर्व शिक्षिक, शिक्षिका उपस्थित होत्या. दहा प्राथमिक शाळा मिळून ३७० दप्तरे व शालोपयोगी वस्तू वाटप करण्यात आल्या. त्यानंतर संस्थेच्या प्रकल्प अधिकारी सुनंदा लाड यांनी मुलांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेशपब्लिशर्सप्रा.लि.कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

### जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक प्रदीप प्रभाकर गावंड यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्य काही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १० (दहा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव- नारंगी, तालुका - अलिबाग, जिल्हा - रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग ५५/१ ड, एकूण क्षेत्र ००-१८-१० (हे.आर.चौ.मी.) आकार रु. पै.०.३१/-

**ठिकाण : अलिबाग**
**दिनांक : २३/०७/२०२५**
झुंजारराव आणि कं. करीता
सही/-
विक्रांत झुंजारराव

### : जाहीर नोटीस ::

सर्व लोकांस कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन :- मौजे/गाव-शिघ्रे, ता.मुरुड, जि.रायगड, गट क्रमांक व उपविभाग-१३४/२, एकुण क्षेत्र हे.आर. ०-८३-७० पैकी ०-१६-५०, आकार रु.पैसे.१७-२७ ही मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक मुशरीफ सादुल्ला खतीब व इतर यांचेकडुन आमचे अशिल यांनी रजिस्टर्ड खरेदीखताने कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे व तशी बोलणी देखील आमचे अशिलांनी विद्यमान मालकांसोबत केलेली आहे.

ही मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा त्या मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी देखील या मिळकतीमध्ये इतर कोणाचेही गहाण, दान, लिज, फरोक्त, भागिदार, बक्षिस, मृत्युपत्रांकित दान, ताबेकब्जा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगीहक्क, लिन, इजमेंटरी हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास तसेच या मिळकतीबाबत कोणत्याही ठिकाणी वाद तंटे चालु असल्यास अथवा या व्यवहाराला कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी आपली हरकत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांत लेखी स्वरुपात पुराव्यासह दाखल करावी व त्याची पोच घ्यावी. या मुदतीमध्ये कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून आमचे पक्षकार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागावुन येणाऱ्या हरकती आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

लक्ष्मीखार, मुरुड
ता.मुरुड-जंजिरा,
जि.रायगड, पिन कोड नं. ४०२४०१.
दि. २३/०७/२०२५

**ॲड.एम.जे.तांबडकर**
बी.कॉम.एल.एल.एम.
ॲडव्होकेट व नोटरी

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची बिनशेती प्लॉट मिळकती तिचे मालक अमित बळदेव हिंदुजा यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :

मौजे-आंबिवलीतर्फे कोतलखलाटी तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील बिनशेती प्लॉट मिळकत

| भुमापन क्र व उपविभाग | प्लॉट क्रमांक | एकुण क्षेत्र |
|---|---|---|
| १६/१/ब | प्लॉट नंबर १ ते १५ | ८००० चौ मीटर |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयाना-पावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : २३/०७/२०२५

**खरेदीदारा तर्फे वकील ॲड. वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा.८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला,हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

**खरेदीदारातर्फे वकील ॲड. निलेश कान्हु मोरे**
मोबा.९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९. तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर अमराई रोड. कर्जत ता. कर्जत, जि.रायगड ४१०२०१

### पनवेल महानगरपालिका
### जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | श्री.प्रकाश नायर,प्रिंसिपल, डॉ. पिल्लई ग्लोबल अकॅडमी, प्लॉट नं.बी.-१, बी-२, सेक्टर-०७, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (पू), ता.पनवेल, जि.रायगड | ०१ जंगली झाड तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील डॉ. पिल्लई ग्लोबल अकॅडमी, प्लॉट नं.बी-१, बी-२,सेक्टर-०७, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (पू), ता.पनवेल,जि.रायगड या भूखंडाच्या आवारातील ०१ जंगली झाडाला कीड लागली असून,धोकादायक स्थितीत असल्याने. |
| २. | अनुज महेंद्र बांठिया, न.भु.क्र.-१२६१, एम.जी.रोड पनवेल,ता.पनवेल,जि.रायगड | ०१ जांभुळ,०२ आंबा, ०१ बदाम अशी एकूण ०४ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील न.भु.क्र. १२६१, एम.जी.रोड,पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड या भूखंडाच्या आवारातील ०१ जांभुळ,०२ आंबा, व ०१ बदाम अशी एकूण ०४ झाडे नवीन इमारतीचे बांधकाम करणेस बाधित होत आहेत. |
| ३. | आकाश महेंद्र बांठिया न.भु.क्र.-१२६१/१, एम.जी.रोड, पनवेल,ता.पनवेल जि.रायगड | ०१ उंबर,०१ करंज,०१ बदाम व ०१ नारळ अशी एकूण ०४ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील न.भु.क्र.-१२६१/१,एम.जी.रोड, पनवेल,ता.पनवेल जि.रायगड या भूखंडाच्या आवारातील ०१ उंबर,०१ करंज,०१ बदाम व ०१ नारळ अशी एकूण ०४ झाडे नवीन इमारतीचे बांधकाम करणेस बाधित होत आहेत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची/पुनर्रोपण परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणी करणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**उपायुक्त**
**(वृक्ष प्राधिकरण विभाग)**
**पनवेल महानगरपालिका**

PMC-PARK/398/2025-PTAD

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमुद केलेल्या शेतजमीन मिळकती ह्या खाली लिहिलेल्या जमीन मालक यांचे नावावर ७/१२ उताऱ्या सदरी महसुल दप्तरी नावे असून ती त्यांचे खुद्द, ताबा, कब्जा, मालकी वहिवाटीतील आहे. त्या शेतजमीन मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे : वळक, ता.पेण,जि.रायगड, येथील मिळकत**

| मालकाचे नाव | गट नं. | एकूण क्षेत्र हे.आर. | आकार रु.पै. | प्रकार |
|---|---|---|---|---|
| विठोबा लहान्या कातकरी व इतर | २४/ब/८ | जिरायत ४-००-०० | ८=०० | २ |
| धर्मा पांड्या कातकरी | २४/ब/९ | जिरायत ४-००-०० | ८=०० | २ |
| हाशा मऱ्या कातकरी व इतर | २४/ब/१० | जिरायत ३-२०-०० | ६=४० | २ |

वरील मिळकतीसंबंधात आमचे आशिल यांनी जमीन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतीवर अन्य कोणाचा गहाण,दान लिज, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिएन, चार्ज, ॲटचमेंट अन्न, वस्त्र, निवारा ताबा,कब्जा, वहिवाट वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, वाद, तंटा चालू असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (१५) पंधरा दिवसांत लेखी स्वरुपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आवश्यक कागदपत्रे सादर करुन खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.

दि.२३-०७-२०२५

सही/-
**ॲड.श्री.पी.जी.दाभाडे,**
रा.फ्लॅट नं.४०२, बी विंग, ४ था मजला,
साई नगरी सोसायटी, छत्रपती शिवाजी
नगर, डॉ.वागळे हॉस्पिटलजवळ, रोहा,ता.रोहा,
जि.रायगड ४०२१०९, मोबा.क्र.९२७२७१३९५६

### अपर जिल्हाधिकारी रायगड मुख्यालय अलिबाग यांचे न्यायालयात
### जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अलिबाग जि. रायगड

क्रमांक/हक्कनोंद/अपील क्र.१३०/२०२५

१ श्रीम.अलका बाळू भोईर
रा.बोरीवली, ता.कर्जत, जि.रायगड — **अपिलार्थी**

**विरुद्ध**

१ सिताराम महादू भोईर मयत तर्फे वारस
१/१ श्री.काळूराम सिताराम भोईर
१/२ श्री.प्रभाकर सिताराम भोईर
अ.क्र.१/१ व १/२ रा.बोरीवली, ता.कर्जत, जि.रायगड
१/३ श्रीम.लिला रघुनाथ साळुंखे
रा.सावरगाव, ता. कर्जत, जि. रायगड
१/४ श्रीम.विमल सुर्याजी दाभणे
रा.वांगणी, डोणवाडी, ता.अंबरनाथ, जि.ठाणे
१/५ श्रीम.मिना संजय ठोंबरे
रा.ठोंबरवाडी, ता.पनवेल, जि.रायगड
२ श्रीम.सुंदराबाई हरिश्चंद्र कडव
रा.इंद्रगांव, बदलापूर, ता.अंबरनाथ, जि.ठाणे
३ श्री.नामदेव विष्णू ठाकरे
रा.असल, ता.कर्जत, जि.रायगड — **उत्तरार्थी**
४ श्रीम.माई अनंता ठोंबरे
रा.टेंभरे, ता.कर्जत, जि.रायगड
५ श्रीम.योगिता नंदकुमार सनावरे
६ श्रीम.सविता चंद्रकांत पांगारे
७ श्रीम.कांता सदा ढाकवळ
८ श्रीम.अंजना जनार्दन पांगारे
९ श्रीम.रेणुका रमेश साळोखे
१० श्री.रविंद्र बारकू भोईर
अ.क्र.५ ते १० रा.बोरीवली, ता.कर्जत, जि.रायगड
११ श्रीम.गंगूबाई बबन थोरवे
मु.अंजप, ता.कर्जत, जि.रायगड
१२ श्रीम.ताई परशुराम श्रीखंडे
रा.आषाणे, ता.कर्जत, जि.रायगड
१३ निवासी नायब तहसिलदार कर्जत, जि. रायगड

**महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये**

या जाहिर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, मौजे बोरीवली, ता. कर्जत, जि.रायगड येथील सर्व्हे नं.१/२ ब क्षेत्र ०-१०-४ हे.आर. आकार ०.०९, १८/११ क्षेत्र ०-०८-० हे.आर. आकार ०.१०, २/१ क्षेत्र ०-०५-०६ हे.आर. आकार ०.०५, २/३ क्षेत्र ०-२७-७ हे.आर. आकार २.३५, २/४ क्षेत्र ०-२०-६ हे.आर. आकार ०.६०, २/८ क्षेत्र ०-०९-४० हे.आर. आकार ०.०५, ३/१ क्षेत्र १-२१-७ हे.आर. आकार ४.७५, ३/२ क्षेत्र ०-११-९ हे.आर आकार ०.१०, ४/७ क्षेत्र ०-४४-५ हे.आर. ४.५५, ५५/१८ क्षेत्र ०-७६-० हे. आर. आकार ०.८०, ५५/२० क्षेत्र ०-२९-० हे.आर. आकार ०.२०, ६९/८ क्षेत्र ०-७६-० हे.आर ०.३५

या जमीन मिळकती संदर्भात अपिलार्थी यांनी उपविभागीय अधिकारी कर्जत यांचेकडील आरटीएस अपील क्र.१०८/२०२३, दि.१७/०२/२०२५ मधील आदेशाविरुद्ध या न्यायालयाकडे अपील दाखल केले आहे. सदर अपीलाची नोटीस काढली असता त्याची बजावणी होऊ शकली नाही. आपला राहण्याचा शेवटचा पत्ता वरीलप्रमाणे असल्याची माहिती अपिलार्थी यांस आहे. सबब, अपिलार्थी या जाहिर समन्सद्वारे कळविण्यात येते की, सदर अपीलामध्ये दि. ०८/०८/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता अपर जिल्हाधिकारी रायगड - अलिबाग हे सुनावणी घेणार असून सदरची सुनावणी अपर तहसिलदार पनवेल यांचे कार्यालय, खोली क्रमांक ३०७, प्रशासकीय भवन, आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके ऑडीटोरीयन समोर, जुने पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे निश्चित करणेत आलेली आहे तरी आपण स्वतः अगर तुमचे वकीलांमार्फत सदर सुनावणीस हजर रहावे. आपण हजर न राहील्यास आपले गैरहजेरीत प्रकरणामध्ये सुनावणी होऊन आदेश दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २२/०७/२०२५

सही/-
**अपर जिल्हाधिकारी रायगड**
**अलिबाग करीता**

### अपर जिल्हाधिकारी रायगड मुख्यालय अलिबाग यांचे न्यायालयात
### जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अलिबाग जि.रायगड

क्रमांक/हक्कनोंद/अपील क्र.६३/२०२५

१ श्री. सतिश गणपत पाटील — अपिलार्थी
रा.चरी-पळी,पो.पोयनाड,
ता.अलिबाग,जि.रायगड

विरुद्ध

१ श्री.भाऊसाहेब नामदेव शिंगाडे
रा.९०५-९०८, शेल्टॉन क्युबिक्स, सेक्टर नं.१५,
सी बी डी बेलापूर, नवी मुंबई- ४०० ६१४
२ श्री.आनंदा दिनकर फणसे
मु.फ्लॅट नं.४०४/४०५, प्लॉट नं.२, महावीर सरगम, मुकांबिका मंदिरासमोर, सेक्टर नं.५, घनसोली, नवी मुंबई- ४०० ६१४
३ श्री. चंद्रकांत तुळशीराम गोरडे
मु.सी/४५/एस/५, अमरज्योती सोसायटी, एम जी कॉम्पलेक्स, सेक्टर नं.१४, वाशी, नवी मुंबई ४०० ७०३ — उत्तरार्थी
४ श्री. अमोल मनोहर काकडे
मु.रुम नं.११, बिल्डींग नं.सी-४०, एन कुमकूम सोसायटी,
एम जी कॉम्पलेक्स, सेक्टर नं.१४, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३
५ श्री. अनिल भगवान पाटील
६ श्री. सुभाषचंद्र हरिनारायण पाण्डेय
७ श्रीम. पुष्पा चौधरी
अ.क्र.५ ते ७ रा. कांडवीरा, ता.अलिबाग, जि.रायगड

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार अपील**

जा जाहीर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, मौजे कांडवीरा, ता.अलिबाग, जि.रायगड येथील गट नं.६ क्षेत्र २-२८-१० पैकी ०-८३-१९ आकार २९.४४ या जमीन मिळकती संदर्भात अपिलार्थी यांनी उपविभागीय अधिकारी अलिबाग यांचेकडील आरटीएस अपील क्र.१०/२०२१, दि.१३-०१-२०२५ मधील या न्यायालयाकडे अपील दाखल केले आहे. सदर अपीलाची नोटीस काढली असता त्याची बजावणी होऊ शकली नाही. आपला राहण्याचा शेवटचा पत्ता वरीलप्रमाणे असल्याची माहिती अपिलार्थी यांस आहे. सबब, अपिलार्थी या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, सदर प्रकरणामध्ये दि. ०४-०८-२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता अपर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचे कार्यालयात सुनावणी निश्चित करणेत आलेली आहे. तरी आपण स्वत: अगर तुमचे वकीलांमार्फत सदर सुनावणीस हजर रहावे. आपण हजर न राहिल्यास आपले गैरहजेरीत प्रकरणामध्ये सुनावणी होऊन आदेश दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

**ठिकाण :- अलिबाग**
**दिनांक :-२२-०७-२०२५**

**सही/-**
**अपर जिल्हाधिकारी रायगड**
**अलिबागकरीता**

## निवडक



### खारघरमधल चायनीज दुकानाला आग

**पनवेल :** खारघर रेल्वे स्थानकाच्या समोर एका चायनीजच्या दुकानाला आग लागल्याची घटना घडली होती. या दुकानाचे शटर उघडून शोरमा मशीनमध्ये पेटलेला एलपीजी गॅस सिलेंडर बाहेर काढून त्याची आग विझवून इतर वस्तूंना लागलेली आग देखील पूर्णपणे विझविण्यात आली. दरम्यान, आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे केंद्र अधिकारी सौरभ पाटील, अग्निशमन प्रणेता प्रशांत दरेकर, यंत्रचालक आर. एल. बंडा, फायरमन संभाजी पाटील, गणेश भोईर, एन.जे. मढवी व बी.व्ही. भोसले आदींनी आगीवर नियंत्रण मिळवीत दुकानामधून २ भरलेले व २ रिकामे असे एकूण ४ एलपीजी सिलेंडर बाहेर काढले आणि ही आग पूर्णपणे विझवली.



### भरपावसात खड्ड्यांना मुलामा

**कोर्लई :** मुरुडच्या परेश नाका ते मारुती नाका रस्त्यावर गेल्या अनेक दिवसांपासून खड्डे पडले होते. याकडे संबंधित बांधकाम खात्याच्या दुर्लक्षाबाबत नाराजी व्यक्त करत हे खड्डे बुजविण्याची मागणी केली जात होती. अखेर बांधकाम खात्याने त्याची दखल घेत या रस्त्यावरील खड्डे बुजविले आहेत. मुरूडमधील परेश नाका ते मारुती नाका मुख्य रस्त्यावर तहसीलदार कार्यालय, वनविभाग, सेतू, न्यायालय व पोस्ट इत्यादी महत्वाची शासकीय कार्यालये आहेत. या ठिकाणी विविध कामांसाठी येणाऱ्यांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. या रस्त्यावर गेल्या अनेक दिवसांपासून खड्डे पडले होते. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे त्या खड्ड्यांचा आकार वाढत असून ते अधिक जीवघेणे बनले होते. वेळप्रसंगी अपघाताची शक्यता लक्षात घेऊन संबंधित बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी यात लक्ष पुरवून हे खड्डे बुजविण्याची मागणी केली जात होती. अखेर बांधकाम खात्याने दखल घेऊन या रस्त्यावरील खड्डे बुजविले आहेत. परंतु, बुजविण्यात आलेले खड्डे भर पावसात किती दिवस टिकतील, यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

### कॅबचालकाची मारहाण करून लूट

**पनवेल :** रॅपीडो ॲपवरून प्रवासी भाडे घेण्यासाठी गेलेल्या एका कॅबचालकाला चौघा लुटारूंनी बेदम मारहाण केली. तसेच, त्याचा मोबाईल हिसकावून खात्यातून फोन पेद्वारे जबरीने पैसे ट्रान्सफर केल्याची धक्कादायक घटना कळंबोली येथे घडली आहे. या घटनेतील पिडीत कॅबचालकाचे नाव अब्दुल कादीर इस्माईल केळकर (३१) असून हा मुंब्रा कौसा परिसरात राहण्यास आहे. संध्याकाळच्या सुमारास तो रॅपीडो ॲपवरून आलेले भाडे घेण्यासाठी कळंबोली सेक्टर-१७ येथील बालाजी इंटरनॅशनल स्कूलजवळ गेला होता. त्यावेळी मुंबई-कुलाबा मार्केट येथे जाण्याच्या बहाण्याने दोघे लुटारू अब्दूलकडे विचारणा करून त्याच्या कारमध्ये बसले. त्यानंतर त्यांचे इतर दोन साथीदार देखील कारमध्ये बसले. त्यानंतर या चौघांनी कॅबचालक अब्दुल याला मारहाण करून त्याचा मोबाईल हिसकावून घेतला. त्यानंतर त्यांनी अब्दुल्ला धमकावून त्याच्याकडून मोबाईलचा पासवर्ड आणि फोन पे ॲपचा पासवर्ड मागितला. मात्र, अब्दुलने त्यांना पासवर्ड देण्यास नकार दिल्याने चौघा लुटारूंनी दमदाटी केली. त्यानंतर जबरदस्तीने फोनपेचा पासवर्ड घेऊन त्याद्वारे त्याच्या मोबाईलवरून ५ हजार रूपये आपल्या खात्यात वळते करून घेतले. त्यानंतर लुटारूंनी पलायन केले. या घटनेनंतर कॅब चालकाने कळंबोली पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात चौकडी विरोधात गुन्हा दाखल करून शोध सुरू केला आहे.

# बांधकामाचा पडदा अडकला निधीत

## आठ वर्षानंतरही नाट्यगृहाचे काम अपूर्णच

**| माणगाव | प्रतिनिधी |**

मुंबई-गोवा महामार्गावर असलेले माणगाव हे जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण असून ते झपाट्याने विकसित होत आहे. शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक क्षेत्राबरोबरच सांस्कृतिक जडणघडणीचे केंद्र म्हणून माणगावकडे पहिले जाते. या भागातील सांस्कृतिक चळवळीला अधिक वाव मिळावा यासाठी आठ वर्षांपूर्वी याठिकाणी नाट्यगृह मंजूर झाले होते. माणगावातील या नाट्यगृहाचे काम ५० टक्के झाले असून बाल्कनीचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. मात्र, अपुऱ्या निधीमुळे हे नाट्यगृह अपूर्णच राहिले आहे. आता बांधकामासाठी लागणाऱ्या साहित्याचे दर मिळालेल्या निधीच्या तुलनेत आवाक्याबाहेर गेल्याने मंजूर निधीत या नाट्यगृहाचे काम कसे होणार, हा प्रश्नच सर्वांसमोर उभा राहिला आहे. त्यामुळे आताचे दर विचारात घेऊन पुनर्मूल्यांकन करून निधी मंजूर करावा, अशी मागणी नाट्यरसिकांसह माणगावकरांमधून होत आहे.

दक्षिण रायगडमधील सांस्कृतिक क्षेत्राला उत्तेजन मिळावे, तसेच येथे नवनवीन व व्यावसायिक नाटक प्रेक्षकांना पाहता यावीत यासाठी या भागातील नाट्यप्रेमींकडून नाट्यगृहाची मागणी करण्यात येत होती. या मागणीचा विचार करून माणगावातील शासकीय विश्राम गृहासमोर महाराष्ट्र शासनाचे संस्कृतीक कार्य विभागाकडून नाट्यगृह मंजूर केले होते. नाट्यगृह मंजूर होऊन आता तब्बल आठ वर्ष लोटली तरी या नाट्यगृहाचे बांधकाम अद्याप अपूर्ण आहे. तसेच, मजुरीही मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे नाट्यगृह बांधकामाला मंजुर झालेला निधी अपुरा पडत आहे. त्यामुळे नाट्यगृहाच्या बांधकामाचा तिढा कायम राहणार आहे. यासाठी शासनाकडून पुरेसा निधी मंजूर झाल्यास माणगावमध्ये सर्व सोयीनीयुक्त प्रशस्त असे नाट्यगृह उभारू शकेल, अशी आशा माणगावकरांना वाटत आहे.

### आसन क्षमता वाढविण्याची गरज

**माणगाव येथे उभारण्यात येत असलेल्या नाट्यगृहाची आसन क्षमता कमी असल्याने आयोजकांना दर्जेदार व नावाजलेली नाटके आणणे परवडणारे नाही. त्यामुळे प्रेक्षकांना आवडीची, गाजलेली व दर्जेदार नाटके बघता येणार नाहीत. अशी नाट्यगृहे सध्या रायगड जिल्ह्यात पनवेल, रोहा, महाड येथे आहेत. तर, रत्नागिरी जिल्ह्यात खेड व चिपळूण येथे आहेत. मात्र, माणगावचे नाट्यगृह ५०० बैठक आसन क्षमतेचे असल्याने नाहिलाजास्तव आयोजकांना पर्यायाने तिकिटाचा दर वाढवावा लागेल. मात्र, हा खर्च उभा करण्यासाठी रसिकांच्या खिशाला कात्री लागणार आहे. त्यामुळे या नाट्यगृहाची आसन क्षमता वाढवून ७०० ते १००० केल्यास या नाट्यगृहात लहान-मोठे कार्यक्रम व दर्जेदार नाटक ठेवणे सोयीस्कर होईल.**



# कचऱ्यासाठी वेगवेगळ्या गाड्यांची गरज

## शेकाप कार्याध्यक्ष गौरव पोरवाल यांची मागणी



- **सोसायटींमध्ये कंपोस्ट मशीन वाटपाची गरज**
- **पनवेलच्या आयुक्तांना निवेदन**

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये सुका कचरा आणि ओला कचरा गोळा करण्यासाठी वेगवेगळ्या गाड्या सुरु कराव्यात, अशी मागणी शेकाप कामोठचे कार्याध्यक्ष गौरव पोरवाल यांनी आयुक्त मंगेश चितळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

यावेळी गौरव पोरवाल यांनी सांगितले की, आपल्या पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये सुका कचरा आणि ओला कचरा गोळा करण्यासाठी जोरदार मोहीम चालू आहे; परंतु, त्याचा काही उपयोग होत नाही. कारण तो कचरा एकाच गाडी मध्ये एकत्र केला जातो. त्यामुळे सुका कचरा आणि ओला कचरा दोन वेगवेगळ्या गाड्यांमध्ये घेऊन जाणे गरजेचे आहे. तसेच, कंपोस्ट बनविण्यासाठी प्रत्येकी १० सोसायटींमध्ये एका मशीनचे वाटप केले पाहिजे. महानगरपालिकेचे एक सकारात्मक पाऊल समाजाला स्वस्थ बनवू शकतो. तरी लवकरात लवकर ही सेवा सुरु करावी, अशी मागणी पोरवाल यांनी केली आहे. यावेळी गौरव पोरवाल यांच्यासह नितीन पगारे व रमेश गोरे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# कर्जतमध्ये ठाकरे गट आक्रमक

**| कर्जत | प्रतिनिधी |**

कर्जत नगर परिषद हद्दीतील वाढत्या नागरी समस्या आणि प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे संतप्त झालेल्या शिवसेना ठाकरे गटाकडून शहरातील समस्या तातडीने सोडविण्याची मागणी करत नगरपरिषद मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात समस्या तात्काळ न सुटल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.




माजी नगरसेवक नितीन सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारी (दि.२२) शिवसेना ठाकरे गटाच्या कर्जत शहरातील पदाधिकाऱ्यांनी मुख्याधिकाऱ्यांची भेट घेतली. यावेळी शहरातील विविध गंभीर समस्यांबाबत सविस्तर चर्चा झाली. सावंत यांनी शहराच्या दैनंदिन व्यवस्थापनात होणाऱ्या त्रुटींबाबत चिंता व्यक्त केली. त्यांनी सांगितले की, वारंवार तक्रारी करूनही प्रशासन दुर्लक्ष करत असल्यामुळेच समस्या अधिक बळावत आहेत. शहरात मच्छर फवारणी नियमित न होणे, रस्त्यांवरील खड्डे, अनियमित पाणीपुरवठा, बाजारपेठेतील वाहतूक कोंडी, अतिक्रमण, भटक्या कुत्र्यांचा त्रास, अपूर्ण स्ट्रीट लाईट व्यवस्था, नाल्यांची साफसफाई न होणे आणि सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा अभाव अशा अनेक समस्यांमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. या समस्यांबाबत अनेक वेळा निवेदन दिले गेले असतानाही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही, अशी टीका यावेळी पदाधिकाऱ्यांनी केली. प्रशासनाने याची गंभीर दखल घेतली नाही तर जनआंदोलन अटळ असल्याचे संकेत ठाकरे गटाकडून दिले गेले आहे.

# बँक खात्यातून काढले दीड लाख

- **हॅकरकडून मोबाईल हॅक**
- **वृद्ध महिलेची रक्कम चोरली**

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेलमध्ये राहणाऱ्या महिलेचा मोबाईल हॅक करून त्यांच्या बँक खात्यातून एकूण १ लाख ४७ हजारांची रक्कम परस्पर काढून घेतल्याची घटना उघडकीस आली आहे. पनवेल शहर पोलिसांनी याप्रकरणी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

पनवेल येथे राहणाऱ्या सुजाता दांडेकर (६५) यांचे द आण्णासाहेब सावंत को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक महाड लि. या बँकेत खाते आहे. अज्ञात सायबर चोरट्याने त्यांचा मोबाईल फोन हॅक केला. त्यानंतर त्याने सुजाता दांडेकर यांच्या मोबाईलमार्फत त्यांच्या खात्यातून ९ जुलै रोजी ९५ हजार आणि १० जुलै रोजी ५२ हजार, अशी एकूण १ लाख ४७ हजारांची रक्कम काढून घेतली. याबाबतचा मेसेज त्यांच्या मोबाईलवर आल्यानंतर त्यांना हा प्रकार लक्षात आला. प्राथमिक माहितीनुसार, अज्ञात सायबर चोरट्याने सुजाता यांच्या मोबाईल डिव्हाईसमध्ये प्रवेश करून डिजिटल बँकिंगद्वारे त्यांच्या खात्यातून ही रक्कम काढल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. त्यानुसार पनवेल शहर पोलिसांनी अज्ञात सायबर चोरट्याविरोधात गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# झोपलेल्या रेल्वे प्रवाशावर हल्ला

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल रेल्वेस्थानकाबाहेर बाकड्यावर झोपलेल्या एका प्रवाशावर लुटारूने हल्ला करून त्याची सोनसाखळी हिसकावली. पहाटे चारच्या सुमारास ही घटना घडली आहे. पनवेल शहर पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला. हल्ल्यात जखमी झालेल्या प्रवाशाचे नाव निखिल निकम (२२) असे असून तो नेरूळ येथे राहतो. पहाटे निखिल पनवेल स्थानकाबाहेरील बाकड्यावर झोपला असताना लुटारूने त्याच्या पॅन्टच्या खिशातील मोबाईल काढण्याचा प्रयत्न केला. निखिलला जाग आल्याने लुटारूने त्याच्या हातातील जड वस्तूने निखिलच्या डोक्यात मारून जखमी केले. त्यानंतर त्याची सोनसाखळी हिसकावून पळ काढला.

# म्हसळ्यात बिबट्याची दहशत

**| म्हसळा | प्रतिनिधी |**

वन विभागाच्या रोहा परिक्षेत्र वनविभाग अंतर्गत म्हसळा तालुक्यातील वांगणी मोरवणे परिसरात बिबट्याने चांगलीच दहशत निर्माण केली आहे. मागील तीन महिन्यांत मोरवणे गावात दोन शेतकऱ्यांच्या गोठ्यात बांधलेली तीन वासरे आणि घूम गावात एकाच शेतकऱ्याची दोन वासरे बिबट्याने फस्त केली आहेत. त्यातच आता वांगणी येथील सीतप यांच्या शेतघरात १६ जुलै रोजी वासरावरावर तर १७ जुलै रोजी येथीलच शेतकरी अशोक नाईक यांच्या बैलावर हल्ला करून ठार केले. तसेच, नाईक यांच्या शेतावारील पाळीव कुत्र्याची देखील बिबट्याने शिकार केली असल्याचे सांगण्यात येत आहे.

# धाटावमधील प्रदूषणाने झाडे कोमेजली

## पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केला संताप

**| चणेरा | प्रतिनिधी |**

धाटाव औद्योगिक वसाहतीत दिवसेंदिवस वाढणाऱ्या वायुप्रदूषणामुळे परिसरातील झाडे झपाट्याने कोमेजत चालली आहेत. पाने काळी-पिवळी होऊन गळत आहेत. तर, काही झाडे पूर्णपणे वाळण्याच्या मार्गावर आहेत. या पर्यावरणीय संकटामुळे स्थानिक पर्यावरणप्रेमी आणि रहिवाशांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.



धाटाव औद्योगिक वसाहतीत काही कारखान्यांकडून निघत असलेला धुर, धूळकण आणि रासायनिक वायू हवेत मिसळत आहेत. या प्रदूषित हवेमुळे झाडांसह मानवी आरोग्यावरही गंभीर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. बेक केमिकल व निरलॉन रस्त्यालगत असणाऱ्या करंज या झाडांवर केमिकलचा जास्त प्रमाणात प्रादुर्भाव दिसून येत आहे. या झाडाची पाने काळी-पिवळी पडलेली दिसत आहेत. झाडांची ही अवस्था आहे तर मानवी फुफ्फुसांवर काय परिणाम होत असतील? याबाबत सामाजिक संघटनांनी प्रदूषण नियंत्रण मंडळाला अनेकदा लेखी तक्रारी केल्या आहेत. परंतु, अद्याप कोणतीही ठोस कारवाई केली गेली नाही. त्यामुळे प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत. आता आम्ही गप्प बसणार नाही. जे कारखाने राजरोसपणे वायु प्रदुषण करतात, अशा कारखान्यांवर महाराष्ट्र प्रदुषण मंडळाने कारवाई केलीच पाहिजे. अन्यथा सर्वसामान्यांच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असा इशारा पर्यावरण प्रेमींनी दिला आहे.

# रहिवासी इमारतीच्या मीटरला आग

**| पनवेल | प्रतिनिधी |**

करंजाडे येथील जानकी अपार्टमेंटमधील तळमजल्यावरील मीटर बॉक्सला अचानक मोठी आग लागल्याची घटना घडली. मात्र, येथील नागरिकांनी दाखवलेल्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, करंजाडे सेक्टर-४ येथील जानकी अपार्टमेंटमधील मीटर बॉक्ससला आग लागली. त्याची माहिती मिळताच येथील रहिवाशांनी तत्काळ इमारतीतील सर्व नागरिकांना सुरक्षितरीत्या बाहेर काढले. त्यानंतर फायर एक्स्टिंग्विशरच्या सहाय्याने आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न करण्यात आला. दरम्यान, महावितरण कर्मचारी व पनवेल मनपा अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी संपूर्ण परिसराची पाहणी करून प्राथमिक सुरक्षात्मक उपाययोजना केल्या. यावेळी त्यांनी कोणताही धोका नसल्याचे स्पष्ट केले. विद्युत मीटर बॉक्समध्ये शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. रहिवाशांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे अनुचित घटना घडली नसल्याचे सांगण्यात आले आहे.

॥ प्रथममास पुण्यस्मरण ॥
॥ पितृदेवो भव ॥



कै. श्री. गोविंद काशिनाथ घरत
मृत्यू दि. २७/६/२०२५
मु. थेरोंडा, दांडेकरवाडी, पो. चौल, अलिबाग-रायगड

तुमच्या जाण्यान घरात घरपण हिरावून गेल
कधी न संपणार दुःख मनामध्ये राहुन गेलं.
तुमचे शब्द, तुमचा आवाज, तुमचे मार्गदर्शन
तुमच्या आठवणी वेळोवेळी घेउन येतात पाणी

स्मरणकर्ते
मुलगा, मुली, पुतणे, पुतण्या, भाचे, जावई, नातवंडे.

भावपूर्ण श्रद्धांजली
विशाल घरत, अक्षय घरत, विधी ठाकूर

## माथेरानमध्ये रोप-वेचा मुहूर्त कधी? | पार्किंगच्या मर्यादित जागेमुळे वाहतूक कोंडी

# पर्यायी व्यवस्था उपलब्ध करण्यास प्रशासन असमर्थ

**| माथेरान | प्रतिनिधी |**

सध्या माथेरानमध्ये पर्यटकांची संख्या अगणित वाढत आहे. त्यातच याठिकाणी वाहनांच्या पार्किंगच्या जागा मर्यादित वाहनांपुरत्याच असल्याने नेरळ-माथेरान या घाटरस्त्यात सुट्ट्यांच्या हंगामात वाहनांची प्रचंड गर्दी होत असते. त्यामुळे पर्यटकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. याबाबत शासन आणि प्रशासनाला माहिती असून देखील अद्याप पर्यायी वाहतूक व्यवस्था उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न केले जात नाहीत, त्यामुळे नागरिक आणि पर्यटकांमधून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

यंदाच्या वर्षी दर शनिवार-रविवारी पर्यटकांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. या दिवसांत पार्किंगच्या मर्यादित जागेमुळे नेरळ-माथेरान घाटातच आपल्या किंमती गाड्या पार्क करून त्यांना आपल्या लवाजम्यासह चालत माथेरान गाठावे लागत आहे. तसेच, घाट रस्त्यात गाडी पार्क केल्याने या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. दोन दिवस आरामासाठी आणि येथील नैसर्गिक सौंदर्य न्याहाळण्यासाठी येणाऱ्याना पर्यटकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. पर्यटक याठिकाणी येत आहेत म्हणून माथेरानकरांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. मात्र, पर्यटाकांनाचा योग्या त्या सुविधा निर्माण केल्या नाहीत तर आगामी काळात माथेरानसाठी धोक्याची घंटा नाकारता येत नाही, असे येथील ज्येष्ठ मंडळी बोलत आहेत.

तसेच, माथेरानमध्ये जाण्यासाठी रोप-वेचा पर्याय देखील मंजुर करण्यात आला आहे. परंतु, राजकीय नेत्यांच्या अनास्थेमुळे माथेरानचा विकास होऊ शकला नाही. त्यामुळे माथेरानमध्ये रोप-वेचा मुहूर्त कधी लागणार, असा संतप्त प्रश्न उपस्थित केला जात आहे. केवळ मतांच्या राजकारणापायी माथेरानकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप देखील स्थानिकांकडून होत आहे.



> माथेरान रोप-वे प्रा.लि. कंपनीला माथेरानमध्ये रोपे-वेसाठी सर्व परवानग्या दिलेल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाने सुद्धा २०१६ मध्येच परवानगी दिली आहे. परंतु, त्यांना आतापर्यंत निधी उभा करता आला नाही. जर ते हा प्रकल्प करण्यास असमर्थ असतील तर शासनाने हा प्रकल्प ताब्यात घ्यावा. पर्यटकांची संख्या प्रचंड वाढलेली आहे. परंतु, आज जे इन्फ्रास्ट्रक्चर आहे ते अपुरे आहे. प्रकल्प उभा करण्यासाठी शासनाने लक्ष घातले पाहिजे. परंतु, या कंपनीच्या प्रवर्तकांच्या दबावापुढे शासकीय अधिकारी काहीच करत नाहीत. ते रोप-वे करत नाहीत आणि एमएमआरडीएच्या फ्युनिक्युलर रेल्वे प्रकल्पाला आक्षेप घेतात. या प्रवर्तकांकडून (कर्जत) भुतीवली मार्गे माथेरान रोप-वे प्रकल्प शासनाने एमटीडीसी अथवा एमएमआरडीएच्या माध्यमातून पुर्ण करावा आणि माथेरानकरांचे व पर्यटकांचे हाल संपवावेत.
>
> – मनोज खेडकर, माजी नगराध्यक्ष

# बोगस तपासाची पोलखोल

मुंबईमध्ये जुलै २००६ मध्ये लोकलमध्ये झालेल्या बाँबस्फोटांनी दिला होता तसाच काहीसा हादरा उच्च न्यायालयाने सोमवारी दिला. या प्रकरणातील बारा दोषी आरोपींना तर न्यायालयाने निर्दोष सोडलेच, पण आपल्याकडच्या एकूण पोलिसी यंत्रणा आणि तपासाचेही अभूतपूर्व असे वाभाडे काढले. मुंबई पोलिस हे स्कॉटलंड यार्डच्या तोडीस तोड आहे असे पूर्वी म्हटले जायचे. आता पोलिसांच्या या तथाकथित कार्यक्षमतेबाबतच मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ११ जुलै २००६ रोजी पश्चिम रेल्वेच्या सात लोकलमध्ये संध्याकाळच्या गर्दीच्या वेळी अकरा मिनिटांमध्ये सात ठिकाणी स्फोट झाले होते. त्यात १८९ लोक ठार तर ८१६ लोक जखमी झाले होते. बारा मार्च १९९३ ला दाउदने घडवून आणलेल्या स्फोटांनंतर मुंबईत मधून मधून असे स्फोट होत असत. तरीही त्यातला हा साखळी बाँबस्फोट सर्वांनाच हादरवणारा होता. त्यामुळे या घटनेच्या तपासासाठी मुंबई पोलिसांवर कमालीचा दबाव होता. मात्र त्यातून त्यांनी ज्यांना आरोपी ठरवले त्यांच्याविरुध्दचे पुरावे बनावट आहेत किंवा पुरेसे नाहीत असे उच्च न्यायालयाला वाटते. शिवाय हा एकूणच तपास अत्यंत पूर्वग्रहदूषित पध्दतीने झाला व या प्रकरणाशी संबंध नसलेल्या मुस्लिम तरुणांना यात विनाकारण गोवण्यात आले असे न्यायालयाच्या निकालावरून दिसते. अशा घटनेतल्या दोषींना कठोर शिक्षा व्हायलाच हवी. पण प्रकरणाचा यशस्वी छडा लावल्याचा आभास निर्माण करणे म्हणजे लोकांची दिशाभूल करण्यासारखे आहे असे स्पष्ट मत न्यायालयाने नोंदवले आहे. या प्रकरणात आरोप सिध्द करणारे निर्विवाद पुरावे समोर आलेले नाहीत, साक्षीदारांच्या साक्षी अजिबात विश्वासार्ह नाहीत आणि पोलिसांनी तपास करताना योग्य त्या प्रक्रियांचे पालन केलेले नाही असे तीन महत्वाचे ताशेरे न्यायालयाने ओढले आहे. एकूण मुंबई पोलिसांच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवण्याऐवजी त्यांच्या अब्रूचे धिंडवडे या प्रकरणात निघाले आहेत. असे स्फोट वा गुन्हे झाले की मुंबई पोलिस सरसकट मुस्लिम तरुणांची धरपकड करतात व त्यात अनेक निरपराधांचा बळी जातो असे आरोप यापूर्वीही झाले होते. तसे काही गुन्हेही मुंबई पोलिसांवर दाखल झाले आहेत. मात्र उच्च न्यायालयाच्या निकालामुळे मुंबई पोलिसांमध्ये मुस्लिमद्वेष खोलवर पसरलेला आहे यावर शिक्कामोर्तब झाले आहे.

## पोलिसांमध्येच दुफळी

या प्रकरणाच्या तपासात अगदी आरंभापासूनच असंख्य गडबडी झाल्या होत्या. राज्य सरकारच्या दहशतवादविरोधी पथकाकडे हा खटला सोपवण्यात आला. त्याने अवघ्या तीन महिन्यात या प्रकरणाचा उलगडा केल्याचा दावा केला. पाकिस्तानच्या आयएसआयच्या आदेशानुसार लष्करे तैयब्बाच्या अतिरेक्यांनी हा कट रचला व त्याला स्थानिक सिमी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी साथ दिली असा पोलिसांचा दावा होता. त्यानुसार तेरा-चौदा जणांना पकडण्यात आले. त्यातील काहींनी पाकिस्तानात जाऊन स्फोटांचे प्रशिक्षण घेतल्याचेही सांगण्यात आले. मात्र मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने २००८ मध्ये इंडियन मुजाहिदीनच्या एका संशयिताला अटक केली तेव्हा हे साखळी बाँबस्फोट या संघटनेने घडवून आणले असे निष्पन्न झाल्याचे जाहीर केले. पोलिसांच्या दोन विभागांच्या तपासातली ही तफावत संशय निर्माण करणारी होती. एटीएसच्या म्हणण्यानुसार गोवंडीच्या झोपडपट्टीत प्रेशरकुकरमध्ये आरडीएक्स ठेवण्यात आले व नंतर बॅगांमधून हे कुकर बोरीवली व विरार लोकलमध्ये ठेवण्यात आले. तर गुन्हे शाखेच्या म्हणण्यानुसार शिवडीमध्ये हे बाँब तयार करण्यात आले होते. अर्थात, सरकारने एटीएसचा तपास उचलून धरला व त्यानुसार खटला भरला. एटीएसने त्यानुसार पुरावे गोळा केले. याच साक्षीपुराव्यांच्या आधारे मोक्का न्यायालयाने २०१५ मध्ये बारा जणांना दोषी ठरवून पाच जणांना फाशी आणि सात जणांना जन्मठेप सुनावली होती. त्यानंतर दहा वर्षांनी याच दोषी ठरलेल्या आरोपींची निर्दोष मुक्तता झाली आहे. यामुळे आपल्या पोलिसी यंत्रणेप्रमाणे न्याय यंत्रणेबाबतही अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. या आरोपींविरुद्ध युएपीए व मोक्कासारखे अत्यंत कडक कायदे लागू असल्याने व खालच्या न्यायालयाने त्यांना गंभीर शिक्षा सुनावल्याने इतकी वर्षे त्यांना तुरुंगात काढावी लागली. या सर्वांच्या आयुष्याची अठरा वर्षे वाया गेली. दुसरीकडे या स्फोटांमध्ये जे ठार वा जखमी झाले त्यांच्या कुटुंबियांनाही न्याय मिळालाच नाही. उलट २०१५ मध्ये, उच्च न्यायालयाच्याच म्हणण्यानुसार, त्यांना केवळ न्याय मिळाल्याचा आभास तयार करण्यात आला.

## पोलिसांना शिक्षा काय?

खटल्याच्या तपासातल्या असंख्य त्रुटी न्यायालयाने दाखवून दिल्या आहेत. आरोपींनी मोक्का किंवा युएपीए लावण्यासाठी उपमहानिरीक्षकांची परवानगी आवश्यक असते. हा कायदा लावल्यानंतर आरोपींना विनाजामीन कितीही काळ तुरुंगात ठेवता येते. त्यांचे पोलिसांसमारचे जबाब ग्राह्य मानले जातात आणि आपण निर्दोष आहोत हे त्यांना सिध्द करावे लागते. त्यामुळे मोक्का लावण्यापूर्वी त्यांच्याविरुध्द पुरेसे पुरावे आहेत हे पोलिसांना सादर करावे लागते. मात्र याबाबत महानिरीक्षकांकडे केवळ जुजबी अडीच पानांचा अर्ज केला गेला व त्याच्या आधारे तशी परवानगी दिली गेली. पोलिसांनी आरोपींना कोठडीत अमानुष मारहाण करून त्यांच्याकडून कबुलीजबाब घेतले असावेत असा ठपकाही न्यायालयाने ठेवला आहे. हे अत्यंत गंभीर आहे. याखेरीज या आरोपींना चर्चगेट स्टेशनात नेले तो टॅक्सीवाला किंवा बाँब ठेवताना ज्यांनी पाहिले असे साक्षीदार स्फोट झाल्यानंतर शंभर दिवस गप्प होते व नंतर एकाएकी त्यांनी पोलिसांपुढे येऊन साक्ष दिली हे कसे असा सवाल न्यायालयाने केला आहे. शिवाय मुळात हे बाँब कोणत्या स्फोटकांचे होते व कसे केले याबाबतही पोलिसांनी सबळ पुरावा दिलेला नाही असा न्यायालयाचा अभिप्राय आहे. मुंबई पोलिसांनी आपल्या तपासात इतक्या प्राथमिक व ढोबळ चुका कराव्यात व खालच्या कोर्टाने त्या आधारे आरोपींना फाशीच्या शिक्षा द्याव्यात हे सामान्य माणसांच्या समजेच्या बाहेरचे आहे. मात्र हे खरोखरच घडले आहे व उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींच्या चोख व प्रामाणिक कामगिरीमुळे ते जगासमोर आले आहे. मुंबई पोलिस दलात खूप आधीपासून मुस्लिमद्वेषाची लागण झाली आहे. १९९२ च्या दंगलीबाबतच्या श्रीकृष्ण आयोगाच्या अहवालात याबाबत ताशेरे आहेत. नंतर संशयितांना चकमकीत ठार करण्याची जितकी प्रकरणे झाली त्यातील बहुतांश जण मुस्लिम होते. त्यातील काही जणांना हकनाक मारल्याचे निष्पन्न झाले. तशा काही केसेसही झाल्या. ख्वाजा युनुस नावाच्या एका सुशिक्षित तरुणाला तर काहीही संबंध नसताना पकडून गोळ्या घातल्या गेल्या. त्याचे प्रकरण देशभर गाजले. आता न्यायालयाच्या निकालामुळे या सर्वांवर कडी झाली आहे. या स्थितीत मुंबई पोलिस दलाची तातडीने सफाई करण्याची गरज आहे. वास्तविक न्यायालयाने कालचा निकाल दिल्यानंतर २००६ पासून हे प्रकरण ज्यांनी चुकीच्या रीतीने हाताळले त्या अधिकाऱ्यांना शिक्षा म्हणून त्यांची बढती तरी रोखली पाहिजे किंवा पेन्शनीत गेले असतील तर ती कमी करायला हवी. पण आपल्याकडे नोकरशाही व पोलिस अधिकारी यांना कधीही शिक्षा होत नसते. उलट सध्याचे सरकार हे तर अशा अधिकाऱ्यांना प्रोत्साहनच देईल की काय अशी अवस्था आहे.

विचार

# बुलेट ट्रेन आली कुठपर्यंत?

*जगाला आता वेगाचे वेड लागले आहे. कुणालाही थांबायला वेळ नाही. काळाची गती आता वाढली आहे. जगभरात हायस्पीड रेल्वे, बुलेट ट्रेन, मेट्रोचा विस्तार होत आहे. मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन ही भारतातील पहिली बुलेट ट्रेन असणार आहे. आता तिच्या कामाला गती आली आहे. पुढील दोन वर्षांमध्ये मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन सुरू झालेली असेल. त्यानंतर तिचा दिल्लीपर्यंत विस्तार होऊ शकतो.*



**प्रा. सुखदेव बखळे**

केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या बांधकामात एक महत्वाचा टप्पा गाठला गेला आहे. या प्रकल्पासाठी वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स (बीकेसी) ते शिळफाटा दरम्यान बांधण्यात येत असलेल्या बोगद्याचे काम पूर्ण झाले आहे. हा बोगदा २१ किलोमीटर लांबीचा आहे. या अंतर्गत एका २.७ किलोमीटर लांबीच्या अखंड बोगद्याचेही बांधकाम पूर्ण झाले आहे. या प्रकल्पाअंतर्गत एकूण पाच किलोमीटरचे बांधकाम शिळफाटा आणि घणसोली दरम्यान 'न्यू ऑस्ट्रियन टनेलिंग मेथड' (एनएटीएम) वापरून केले जात आहे. यासोबतच उर्वरित १६ किलोमीटरचे बांधकाम 'टनेल बोरिंग मशीन' (टीबीएम) वापरून केले जाईल. या बोगद्यात ठाणे खाडीखालील सात किलोमीटर लांबीचा समुद्राखालील भागदेखील समाविष्ट आहे. 'एनएटीएम' विभागात बोगद्याचे बांधकाम जलद करण्यासाठी, घणसोली आणि शिळफाटा येथे एकाच वेळी उत्खनन करण्यास परवानगी देणारा एक अतिरिक्त 'ड्रिव्हन इंटरमीडिएट टनेल' (एडीआयटी) बांधण्यात आला. आतापर्यंत शिळफाटा येथून सुमारे १.६२ किलोमीटर उत्खनन झाले आहे. याशिवाय 'एनएटीएम' विभागातील एकूण प्रगती सुमारे ४.३ किलोमीटर आहे. प्रकल्पाच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची समस्या उद्‌भवू नये, म्हणून व्यापक सुरक्षा उपाययोजना राबवण्यात आल्या आहेत. या सुरक्षा उपायांमध्ये 'ग्राउंड सेटलमेंट मार्कर', 'पायझोमीटर', 'इनक्लिनोमीटर', 'स्ट्रेन गेज' आणि 'बायोमेट्रिक ॲक्सेस कंट्रोल सिस्टीम'चा समावेश आहे. असे म्हटले जाते की यामुळे आजूबाजूच्या संरचनांना नुकसान होऊ न देता सुरक्षित आणि नियंत्रित बांधकाम सुनिश्चित केले जात आहे.

या बांधकामाबद्दल 'एनएचएसआरसीएल'चे व्यवस्थापकीय संचालक विवेककुमार गुप्ता म्हणाले, की आम्ही २१ किलोमीटरपैकी २.७ किलोमीटरचे बांधकाम पूर्ण केले आहे. यानंतर बोगद्याच्या अस्तरीकरणाचे काम सुरू होईल. त्यानंतर आरसी ट्रॅक बेड टाकले जाईल आणि ट्रॅक बसवण्याचे काम त्वरित सुरू केले जाईल. पावसाळ्यानंतर लगेचच बुलेट ट्रेन प्रकल्पाचे महाराष्ट्र विभागातील काम जलद गतीने व्हावे आणि नियोजित वेळेनुसार पूर्ण व्हावे, असा आमचा प्रयत्न असेल. दुसरीकडे, मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन कॉरिडॉरसाठी दमणगंगा नदीवरील पुलाचे बांधकाम पूर्ण झाले आहे. बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी बांधण्यात आलेला हा सोळावा नदी पूल आहे. गुजरातमधील वलसाड जिल्ह्यातील दमणगंगा नदीवर हा पूल बांधण्यात आला आहे. बुलेट ट्रेन प्रकल्पांतर्गत गुजरातमध्ये एकूण २१ पूल बांधले जाणार आहेत. 'एनएचएसआरसीएल'ने सोळा नदी पूल पूर्ण केले आहेत. वलसाड जिल्ह्यात असलेल्या पाच नदी पुलांपैकी पाचही पूल आता पूर्ण झाले आहेत. अहमदाबाद ते मुंबई या संपूर्ण कॉरिडॉरवर २५ नदी पूल बांधले जात आहेत. मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन हा भारतातील 'पहिला हाय-स्पीड' रेल्वे प्रकल्प आहे. तो मुंबई आणि अहमदाबाद शहरांना जोडेल. हा ५०८ किलोमीटर लांबीचा मार्ग आहे. बुलेट ट्रेनचा कमाल वेग ३२० किलोमीटर प्रति तास असेल.

वलसाड जिल्ह्यातील एमएएचएसआर मार्ग (दादरा आणि नगर हवेलीतील ४.३ किलोमीटरसह) सुमारे ५६ किलोमीटर लांब आहे. तो जरोली गावापासून सुरू होतो आणि वाघलदरा गावावर संपतो. या मार्गात वापी बुलेट ट्रेन स्टेशन, ३५० मीटर लांबीचा बोगदा, पाच नदी पूल आणि एक पीएससी पूल (२१० मीटर लांबीचा) यांचा समावेश आहे. वलसाडमध्ये पूर्ण झालेल्या पुलाची लांबी ३६० मीटर आहे. त्यात नऊ पूर्ण स्पॅन गर्डर (प्रत्येकी ४० मीटर) समाविष्ट आहेत. येथे चार मीटर आणि ५ मीटर व्यासाचा प्रत्येकी एक आणि ५.५ मीटर व्यासाचे आठ वर्तुळाकार खांब समाविष्ट आहेत. हा पूल बोईसर आणि वापी बुलेट ट्रेन स्टेशन दरम्यान आहे. या दोन स्टेशनदरम्यान आणखी एक नदी पूल बांधण्याचे काम दारोठा नदीवर पूर्ण झाले आहे. ही नदी वापी बुलेट ट्रेन स्टेशनपासून एक किलोमीटर आणि बोईसर बुलेट ट्रेन स्टेशनपासून सुमारे ६१ किलोमीटर अंतरावर आहे. वलसाड जिल्ह्यात इतरही नदी पूल पूर्ण झाले आहेत. दमणगंगा नदी महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातील वालवेरी गावाजवळील सह्याद्री टेकड्यांमधून उगम पावते. ती महाराष्ट्र, दादरा आणि नगर हवेली आणि दमणमधून सुमारे १३१ किलोमीटर वाहते आणि अरबी समुद्रात विलीन होते. ही नदी सिंचनाचे स्रोत आहे. ही नदी पिण्यासाठी, सिंचनासाठी आणि औद्योगिक वापरासाठी पाण्याचा एक महत्त्वाचा स्रोत आहे. वापी, दादरा आणि सिल्वासा सारखी औद्योगिक शहरे तिच्या काठावर आहेत. नदीवर बांधलेले मधुबन धरण हा एक प्रमुख जलसंपदा प्रकल्प आहे. त्याचा फायदा गुजरात, दादरा-नगर-हवेली आणि दमण-दीवला होतो.

भारतीय बुलेट ट्रेनच्या इतिहासात सात जुलै या तारखेला फार महत्त्व आहे. रेल्वेमंत्र्यांनी सात जुलै रोजी सादर केलेल्या २०१४-१५ च्या रेल्वे अर्थसंकल्पात भारताच्या पहिल्या बुलेट ट्रेन प्रकल्पाची घोषणा केली. यापूर्वी 'हाय स्पीड रेल कॉरिडॉर'चा प्रस्ताव बुलेट ट्रेन प्रकल्प म्हणून ओळखला जात होता. अर्थसंकल्पीय भाषणात मुख्य शहरांमधील प्रवास वेळ कमी करणे हे या प्रकल्पाचे मुख्य उद्दिष्ट होते. गुजरातमध्ये मुंबई-अहमदाबाद रेल्वे कॉरिडॉरचे काम वेगाने झाले. महाराष्ट्रातले काम तुलनेने मंद होते; परंतु अलिकडेच या कामाला गती आली आहे. कॉरिडॉरमध्ये बांधल्या जाणाऱ्या बारापैकी गुजरातमध्ये असलेल्या आठपैकी सहा स्थानकांवर स्ट्रक्चरल काम पूर्ण झाले आहे, तर महाराष्ट्रातील चारपैकी तीन उन्नत स्थानकांवर आणि मुंबईत भूमिगत स्थानकाचे काम सुरू आहे. महाराष्ट्रात १५६ किलोमीटर ट्रॅक बांधण्यात आला आहे. रेल्वे स्थानक बांधल्या जात असलेल्या बारा शहरांपैकी मुंबई, ठाणे, विरार, बोईसर ही स्थानके महाराष्ट्रात असून गुजरातमध्ये वापी, बिलीमोरा, सुरत, भरूच, वडोदरा, आणंद, अहमदाबाद आणि साबरमती अशा स्थानकांचा समावेश आहे. मुंबई-अहमदाबाद 'हाय-स्पीड रेल कॉरिडॉर' साठी शंभर टक्के भूसंपादन पूर्ण झाले आहे. महाराष्ट्र, गुजरात आणि दादरा आणि नगर हवेली येथून एकूण १३८९.४९ हेक्टर जमीन संपादित करण्यात आली आहे. कोरोना काळामुळे आणि शेतकऱ्यांच्या विरोधामुळे संपादनास विलंब झाला.

प्रकल्पाअंतर्गत बहुतेक, म्हणजेच एकूण सुमारे ४६८ किलोमीटर उन्नत आहे. त्यामुळे भूसंपादनाची आवश्यकता कमी झाली. मुंबई-अहमदाबाद 'हाय-स्पीड रेल कॉरिडॉर' प्रकल्पाची अंदाजित किंमत १.०८ लाख कोटी ते १.६५ लाख कोटी रुपयांच्या दरम्यान असल्याचे सांगितले जात आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर सुमारे आठ तासांचा प्रवास दोन तासांमध्ये पूर्ण होईल असा दावा केला जात आहे. 'जपान इंटरनॅशनल कोऑपरेशन एजन्सी' (जेआयसीए) ने या प्रकल्पासाठी ८० टक्के कर्ज दिले आहे. जपानमधून बरीच यंत्रसामग्री आयात केली जात आहे. भविष्यात हा 'हाय-स्पीड रेल कॉरिडॉर' दिल्लीपर्यंत वाढवण्याची योजना आहे. त्याचा फायदा राजस्थान आणि हरियाणालाही होईल. मुंबई-अहमदाबाद मार्गावर चालवण्यात येणाऱ्या बुलेट ट्रेनची जपानमध्ये अंतिम चाचणीही झाली आहे. ती पुढील वर्षी भारतात आणली जाऊ शकते. मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन सुरू झाल्यानंतर भारतात लगेचच नवी दिल्ली-पाटणा, मुंबई-हैदराबाद आदी मार्गावरही बुलेट ट्रेन सुरू करण्याचे घाटत आहे. त्यापैकी मुंबई-हैदराबाद मार्गाची घोषणा पूर्वीच झाली आहे; परंतु या योजनेचे सर्वेक्षणच अजून झालेले नाही. मुंबई-नागपूर मार्गाचाही विचार केला जाऊ शकतो. आता नवी दिल्ली-पाटणा मार्गाची घोषणा झाली आहे. त्यानंतर मुंबई-चेन्नई, बेंगळुरू, कोलकत्ता आदी शहरांसाठीही बुलेट ट्रेनच्या घोषणा केल्या जाऊ शकतात.

**(लेखक अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आहेत.)**

चर्चा आजची

# मंत्रीमहोदय, आपण कधी सुधारणार?



**राकेश लोहार**

राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांच्याबद्दल बोलायचे झाले तर माणिकराव एक अन् वाद अनेक अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. कृषीमंत्री झाल्यापासून कोकाटे अनेकदा वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. मात्र, याआधीच्या दोन प्रकरणांमध्ये वाचलेले कोकाटे तिसऱ्या प्रकरणत मात्र पुरते अटकले आहेत. अशा मंत्र्यांना घरी बसवले पाहिजे, घरी २४ तास रमीचा जुगार खेळू द्या. सभागृह जनतेचे आहे, ते शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी असते, रमी खेळण्यासाठी नाही, याची 'ओसाड गावच्या पाटलांना' जाण नसावी? अशा मंत्र्याला पदावर राहण्याचा अधिकार नाही. माणिकराव कोकाटे यांच्याबद्दल काय बोलावे? त्यांच्यामुळे आज महाराष्ट्राची शोभा झाली आहे. शेतकऱ्यांबाबत कोणतीही संवेदना नसणारे मंत्री कोकाटे यांनी आता तरी राजीनामा देऊन राज्याच्या जनतेवर उपकार करावेत, असं म्हणण्याची वेळ आलेय. मंत्रीमहोदयांना एकच विचारणा आहे, की आपण सुधारणार तरी कधी?

कोकाटे यांच्या विधिमंडळामध्ये रमी गेम खेळतानाचा व्हिडीओ समोर आला आहे. महाराष्ट्रात दररोज सात-आठ शेतकरी आत्महत्या करत असताना कृषीमंत्री विधिमंडळात रमीचा डाव मांडतात. हा तर निर्लज्जपणाचा कळसच म्हणावा लागेल. राज्यातला शेतकरी आत्महत्या करतोय अन् इकडे कृषीमंत्री गेम खेळताय. त्यांना शेतकऱ्यांच्या प्रश्नांबद्दल काहीच गांभीर्य नाही. त्यामुळे असा कृषीमंत्री काय कामाचा?

याआधी सर्वप्रथम कोकाटे अडचणीत आले ते शासकीय सदनिकांच्या घोटाळा प्रकरणात. माणिकराव कोकाटे व त्यांचे बंधू विजय कोकाटे यांनी १९९५ मध्ये आर्थिक दुर्बल घटकातील असल्याचे दाखवून मुख्यमंत्र्यांच्या स्वेच्छा कोट्यातील १० टक्के आरक्षित सदनिका मिळवल्याचा आरोप होता. माजी मंत्री तुकाराम दिघोळे यांनी १९९५ मध्ये त्यांच्याविरोधत तक्रार दाखल केली होती. १९९५ ते १९९७ च्या काळातील हे प्रकरण होते. १९९७ मध्ये तत्कालिन उपजिल्हाधिकाऱ्यांच्या तक्रारीनंतर पोलिसांनी कोकाटे यांच्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला होता. याप्रकरणात जवळपास तीस वर्षांनी निकाल देताना नाशिक जिल्हा न्यायालयाने कोकाटे व त्यांच्या बंधूंना दोन वर्षांचा कारावास आणि ५० हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावली होती. त्याचवेळी त्यांच्या मंत्रीपदावर व त्यापाठोपाठ आमदारकीवर टांगती तलवार होती. कारण, सध्या कायद्यानुसार, कोणत्याही निवडून आलेल्या लोकप्रतिनिधीस दोन वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक शिक्षा झाल्यास त्यांची आमदारकी रद्द होऊ शकते. मात्र, कोकाटे यांनी याविरोधात सत्र न्यायालयात अपील केले होते. सत्र न्यायालयाने कोकाटे यांच्या शिक्षेला स्थगिती दिली. पुढे या प्रकरणातून त्यांची अलगद सुटका झाली. परंतु, त्यानंतर कोकाटे पुन्हा अडचणीत आले ते त्यांनी वारंवार शेतकऱ्यांविषयी केलेल्या वादग्रस्त वक्तव्यांमुळे. कृषीमंत्री असूनही कोकाटे यांनी शेतकऱ्यांविषयी नको ती वक्तव्य केली. कृषी खातं म्हणजे 'ओसाड गावची पाटीलकी' असल्याचे वक्तव्य त्यांनी केले होते. त्यानंतर त्यांनी केलेल्या 'भिकारीसुद्धा एक रुपया घेत नाही, आम्ही शेतकऱ्यांना एक रुपयात पीक विमा देतो.' या वक्तव्यामुळे वाद उफाळला होता.

त्यानंतर नुकसानग्रस्त पिकांची पाहणी करण्यासाठी गेलेल्या कोकाटे यांनी 'कर्जमाफीच्या व पीक विम्याच्या पैशातून घरातील लग्न, साखरपुडे करतात' असे शेतकऱ्यांना उद्देशून म्हटलं होतं. नुकसानग्रस्त कांदा पिकाच्या पंचनाम्यासंदर्भात बोलताना 'शेतात जे कांदे आहेत, त्याचे पंचनामे होतील, कापणी झालेल्या पिकांचे पंचनामे करुन काय करणार, ढेकळांचे पंचनामे करायचे का?' असा सवाल कोकाटे यांनी केला होता. कोकाटे यांच्या या सर्व वादग्रस्त विधानांवरुन त्यांना शेतकऱ्यांबद्दल एकंदरीतच राज्यातील सामान्य जनतेबद्दल किती आस्था आहे, हेच दिसून येते.

दरम्यान, माणिकराव कोकाटे यांनी आपल्या वादग्रस्त वक्तव्यावर स्पष्टीकरण देताना शासन भिकारी आहे, शेतकरी नाही, असे वक्तव्य केले आहे. यावरून माणिकराव कोकाटे हे पुन्हा एकदा वादात सापडले आहेत. तर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आता माणिकराव कोकाटे यांचे कान टोचले आहेत. अशा मंत्र्यांमुळे महाराष्ट्र बदनाम होत आहे. त्यामुळे कृषीमंत्री कोकाटेंनी मंत्रीपदावर राहण्याचा नैतिक अधिकार गमावला आहे. आणखी वाद वाढवून घेण्यापेक्षा त्यांनी राजीनामा देऊन राज्यातील जनतेवर उपकार करावेत, असे नाईलाजाने म्हणावे लागत आहे.

लोकसंसद

## सायबर गुन्हेगारांचे अदृश्य चेहरे

सध्याचे युग हे सोशल मीडियाचे युग आहे. या युगात सोशल मीडियावर ॲक्टिव्ह राहून आपण किती सोशल आहोत हे दाखवून देण्याची चढाओढ लागलेली असते. त्यातही तरुण वर्ग तर सोशल मीडियाच्या आहारीच गेला आहे. सोशल मीडियावर आपले फॅन फॉलोअर्स कसे वाढतील? आपल्या पोस्टला जास्तीतजास्त लाईक आणि शेअर कसे मिळतील याकडे तरुणांचे लक्ष असते. मात्र काही वेळा हेच जास्त फॅन फॉलोअर्स असलेले अकाउंट सायबर गुन्हेगारांना आकर्षित करतात आणि यांना धोका दिला जातो. सायबर गुन्हेगार ज्यांचे जास्त फॅन फॉलोअर्स असतील अशा तरुणांना स्टार्टअप कंपनी आपल्या प्रोडक्टच्या जाहिराती करण्यासाठी संपर्क करतात त्यातही या सायबर गुन्हेगारांचे लक्ष तरुण मुलींवर अधिक असते. सुंदर आणि जास्त फॅन फॉलोअर्स असणाऱ्या तरुण मुलींना जाळ्यात ओढण्यासाठी सायबर गुन्हेगार आपण मोठ्या कंपनीतून बोलत असून या मुलींचे फेसबुक आणि इंस्टाग्रामवरील रिल्स आणि व्हिडिओ पाहून संपर्क केल्याचे सांगतात. मुलींचा व्हिडीओ कंपनीला आवडला असून तुम्हाला आमच्या कंपनीच्या प्रोडक्टसाठी जाहिरात करण्यासाठी निवडले असल्याचे सांगून आणखी व्हिडीओ आणि रिल्स पाठवण्यास सांगतात. बहुतेक वेळा असा संपर्क ईमेल द्वारे केला जातो. मुलीही जणू आपण मॉडेल बनलो आहोत अशा आविर्भात त्यांनी साांगितल्याप्रमाणे व्हिडीओ पाठवतात व इथेच फसतात. व्हिडिओ पाठवल्यानंतर काही दिवसांनी पुन्हा त्या मुलींना मेल येतो हा मेल त्यांचाच मॉर्फ केलेला व्हिडिओ असतो. तो व्हिडिओ मॉर्फ करून अश्लील बनवलेला असतो. हा व्हिडीओ पाठवून मुलींना ब्लॅकमेल केले जाते. हे अश्लील व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देऊन मुलींकडे पैशांची मागणी केली जाते. ज्यांच्याकडे पैसे आहेत त्या मुली पैसे देऊन स्वतःची सुटका करून घेतात मात्र ज्यांना पैसे देणे शक्य होत नाही त्या मुली बदनामीच्या भीतीने स्वतःच आयुष्य संपवून टाकतात. आजवर देशात अनेक मुली या सायबर गुन्हेगारांच्या कारस्थांनाना बळी पडल्या आहेत. विशेष म्हणजे हे ब्लॅकमेलर सायबर गुन्हेगार अदृश्य असल्याने सायबर क्राईमकडे तक्रार करूनही यांचा छडा लागेलच असे नाही. अशा अनेक केसेस पोलिसांच्या सायबर क्राईम सेल कडे दाखल असूनही अनेक गुन्हेगार मोकाट फिरत आहेत. अशा सायबर गुन्हेगारांचा छडा लावणे पोलिसांसाठी डोकेदुखीची बाब बनली आहे. पोलिसांच्या सायबर सेलकडून अशा आमिषाला बळी पडू असे आव्हान केले जाते तरीही अनेक तरुण आमिषाला बळी पडतात. अलिकडे तर हे प्रमाण खूप वाढले आहे. त्यामुळे सोशल मीडियावर वावरताना खूप सतर्क राहणे आवश्यक आहे.

**- श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे**

दिनविशेष

# भारतीय असंतोषाचे जनक - लोकमान्य टिळक

भारतीय असंतोषाचे जनक समजले जाणारे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची आज जयंती. बाळ गंगाधर टिळक हे लोकमान्य टिळक म्हणूनही ओळखले जातात. लोकमान्य ही पदवीही त्यांना देण्यात आली. लोकमान्य म्हणजे लोकांनी स्वीकारलेला नेता. ते एक भारतीय राष्ट्रवादी, शिक्षक, समाजसुधारक, वकील आणि स्वातंत्र्यसैनिक होते. ते भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील पहिले लोकप्रिय नेते बनले. ते हिंदू म्हणून ओळखले जात होते. त्यांना राष्ट्रवादाचे जनक देखील म्हटले जाते. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील लाल-बाल-पाल या त्रयींमधील ते एक होते. बाळ गंगाधर टिळक हे ब्रिटीश राजवटीत स्वराज्याचे पहिले आणि खंबीर पुरस्कर्ते मानले जातात. त्या काळात त्यांनी मराठी भाषेत नारा दिला. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच' हा नारा खूप प्रसिद्ध झाला.

बाळ गंगाधर टिळक यांचा जन्म २३ जुलै १८५६ रोजी महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यातील चिखली गावात झाला. रत्नागिरी गावातून आधुनिक महाविद्यालयात शिक्षण घेतलेले ते भारतीय पिढीतील पहिले सुशिक्षित नेते होते. त्यांनी काही काळ शाळा-महाविद्यालयांमध्ये गणित शिकवले. ते इंग्रजी शिक्षणाचे टीकाकार होते. यामुळे ते भारतीय सभ्यतेचा अनादर शिकवते, असा त्यांचा समज होता. भारतातील शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी त्यांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. शिक्षणाचा दर्जा सुधारण्याच्या दिशेनेही बरेच काम झाले आहे.

टिळकांनी हिंदू धार्मिक प्रतीकात्मकतेचा परिचय करून आणि मुस्लिम राजवटीविरुद्धच्या मराठ्यांच्या संघर्षाच्या लोकप्रिय परंपरांचा वापर करून राष्ट्रवादी चळवळीची लोकप्रियता वाढवण्याचा प्रयत्न केला. अशा प्रकारे त्यांनी १८९३ मध्ये गणेशोत्सव आणि १८९५ मध्ये शिवजयंती असे दोन महत्त्वाचे उत्सव आयोजित केले.

लोकमान्य टिळकांनी त्यांच्या प्रदीर्घ राजकीय कारकीर्दीत ब्रिटिश राजवटीपासून भारतीय स्वायत्ततेसाठी लढा दिला. लोकमान्य टिळक हे जहालमतवादी नेते ओळखले जात असे. टिळक हे कट्टर राष्ट्रवादी परंतु सामाजिक परंपरावादी मानले जात होते. लोकमान्य टिळकांवर १८९७ आणि १९०८ मध्ये असे दोन वेळेस राजद्रोहाचे खटले चालवण्यात आले आहे. १९०६ मध्ये टिळकांवर राजद्रोहाचा आरोप लावून ब्रिटिशांनी त्यांना अटक केली. १९०८ मध्ये त्यांना ६ वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली. मंडालेच्या या कारावासात त्यांनी गीतारहस्य हा ग्रंथ लिहिला. १९१४ मध्ये कारावासातून सुटका झाली. चिपळूणकर, टिळक व आगरकर यांनी १८८१ मध्ये आर्यभूषण छापखाना काढला. टिळकांनी इतर सहकाऱ्यांच्या मदतीने १८८१ साली केसरी व मराठा ही वृत्तपत्रे सुरू केली. यापैकी केसरी हे मराठीतून प्रसिद्ध होत होते तर मराठा हे इंग्रजीमधून प्रसिद्ध होत असे. दोन्ही वर्तमानपत्रे भारतीयांमध्ये खूप लवकर लोकप्रिय झाली. तर १८८१ ते १९२० या चाळीस वर्षांच्या काळात टिळकांनी ५१३ अग्रलेख लिहिले. सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय, उजाडले पण सूर्य कुठे आहे, टिळक सुटले पुढे काय, प्रिन्सिपॉल, शिशुपाल की पशुपाल आदी अग्रलेख चांगलीच गाजली. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या प्रेरणेने, १८८० मध्ये गोपाळ गणेश आगरकर, महादेव बल्लाळ नामजोशी आणि विष्णुशास्त्री चिपळूणकर या त्यांच्या काही महाविद्यालयीन मित्रांसह त्यांनी माध्यमिक शिक्षणासाठी न्यू इंग्लिश स्कूलची सह-स्थापना केली. या शिक्षण संस्थेने पुण्यात महाविद्यालयेही सुरू केली.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२३ जुलै
१) श्री.हरिश्चंद्र परशुराम बना
कोळीवाडा-अलिबाग,
२३-७-१९५२
२)श्री.सुहास सिताराम पाटील
मु.विद्यानगर, अलिबाग
२३-७-१९५५


### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

### सुवर्णकण



संतांची प्रसन्नता मळविल्याशिवाय आपल्या मधील संशय रुपी जाळ कधीही नष्ट होणार नाही.

**श्रीज्ञानेश्वरभावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी, पेण.**

# प्राथमिक शाळांच्या दुरुस्तीत तफावत

## ● साडेचार कोटीपैकी ३ मतदारसंघात ३ कोटी ५२ लाखांची कामे; गुहागर, चिपळूणवर अन्याय

**। गुहागर । प्रतिनिधी ।**

**जिल्हा नियोजन समितीच्या २०२४-२५ या आर्थिक वर्षात प्राथमिक शिक्षण विभागात शाळा दुरुस्ती करण्यासाठी ६ कोटी रुपये खर्च करण्यात आले. यामध्ये साडेचार कोटीची प्रशासकीय मान्यता देण्यात आली. यापैकी ३ मतदारसंघात कोटीची कामे तर २ मतदारसंघात ५० लाखाच्या आत निधी देऊन कामे करण्यात आली. त्यामुळे प्राथमिक शिक्षणामध्येसुध्दा कंत्राटदाराच्या भल्याचा विचार काही ठिकाणी केला गेला असल्याचा आरोप माजी आ. डॉ. विनय नातू यांनी केला आहे. याप्रकरणी चौकशी करुन कारवाई व्हावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.**




दापोली विधानसभा मतदारसंघात एकूण १ कोटी १४ लाखाची शाळा दुरुस्तीची कामे झाली. यामध्ये मंडणगड तालुक्यातील ४ शाळांसाठी साडेबारा लाख, दापोली तालुक्यातील २२ शाळांसाठी ५६ लाख, तर खेड तालुक्यातील २८ शाळांसाठी ४६ लाख, गुहागर विधानसभा मतदारसंघातील शाळांच्या दुरुस्तीसाठी एकूण ५४ लाखाची कामे झाली. यामध्ये खेड तालुक्यातील ३५ शाळांना १७ लाख, चिपळूण तालुक्यातील ११ शाळांना २० लाख आणि गुहागर तालुक्यातील १२ शाळांसाठी १७ लाख.

चिपळूण मतदारसंघात फक्त ३९ लाख मंजूर झाले. त्यामध्ये चिपळूण तालुक्यातील १५ शाळांसाठी १९ लाख तर संगमेश्वर तालुक्यातील १७ शाळांसाठी २० लाख मंजूर झाले. रत्नागिरी मतदारसंघातील शाळांच्या दुरुस्तीसाठी एकूण १ कोटी ३८ लाखाची कामे झाली. यामध्ये २२ शाळांसाठी १ कोटी १४ लाख व संगमेश्वर तालुक्यातील ५ शाळांसाठी २४ लाख. तर राजापूर मतदारसंघात लांजा तालुक्यातील ९ शाळा, राजापूरमधील २३ शाळा व संगमेश्वरमधील ४ शाळांना असे एकूण १ कोटीची कामे झाली. जर दापोली तालुक्यातील २२ शाळांची दुरुस्तीची अंदाजपत्रकीय रक्कम ५६ लाख आहे, तर रत्नागिरी तालुक्यातील २२ शाळांसाठी १ कोटी १४ लाखाची कामे होतात. याचा अर्थ निधी वाटपात समानता नसून केवळ ३ मतदारसंघांना झुकते माप दिल्याचा आरोप डॉ. नातू यांनी केला आहे.

### मार्गदर्शन केंद्राचा निधी चुकीच्या पध्दतीने खर्च

**माध्यमिक विभागाच्या नाविन्यपूर्ण योजनेतून जेईई व नीट परीक्षांसाठी हुशार व गरजू विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन केंद्र सुरु करणेअंतर्गत अंमलबजावणी करण्यात आली. मात्र, शिक्षण विभागाकडून हे मार्गदर्शन केंद्र कुठे सुरु होणार याबद्दल माहिती नाही. गेल्यावर्षीचा निधी वितरीत करुन झालेला आहे. मात्र, अजून निविदा मंजूर नाही. ९ तालुक्यातील ११ वी व १२ वी मध्ये शाळांमध्ये शिकतात व जे गरीब आहेत त्यांच्यासाठीच्या व्यवस्थेची कोणतीही तरतूद नसताना या पध्दतीने चुकीच्या पध्दतीने निविदा काढून खर्च केले जात आहेत. या सर्व कामांची चौकशी व्हावी व दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी डॉ. नातू यांनी केली आहे.**

### नवीन वर्गखोल्या निधी वाटपातही अनियमितता

**जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून सन २०२४-२५ मध्ये प्राथमिक शाळा नवीन वर्ग खोल्या बांधण्यासाठी ४-४.५ कोटीची तरतूद करण्यात आली. यामध्ये दापोली विधानसभा ४०लाख, गुहागर विधानसभा ३० लाख, चिपळूण विधानसभा ५० लाख, रत्नागिरी विधानसभा १ कोटी १३ लाख, राजापूर विधानसभा १कोटी ५५ लाख असा निधी वितरीत करण्यात आला. ठराविक मतदारसंघामध्ये कोटीच्या कोटी उड्डाणे व काही मतदार संघांमध्ये ५० लाखांच्या आत निधी वाटप अशा चुकीच्या पद्धतीने नियोजन मंडळाचे कामकाज सुरू आहे.**

# कारीवणी नदीपुलावरील स्लॅब उखडला

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

कारीवणी नदीवरील पुलाचा स्लॅब उखडल्याने पुलावर खड्डे पडले आहेत. पुलावरील उखडलेल्या स्लॅबमधून लोखंडी शिगा बाहेर आल्याने या मार्गावरील वाहतूक धोकादासक झाली आहे.



दापोली तालुक्यातील शिवाजीनगर महसूली गावाच्या हद्दीतून कारीवणी नदी वाहते. या नदीवर बांधण्यात आलेल्या पुलावरील स्लॅब उखडून त्यातून लोखंडी शिगा बाहेर आल्या आहेत. स्लॅब उखडल्याने पुलावर खड्डे पडले आहेत. या खड्यांमध्ये पावसाचे गढूळ पाणी साचते. त्यामुळे बाहेर आलेल्या शिगा पायी चालणाऱ्या प्रवाशांना तसेच वाहन चालकांना खड्ड्यांमध्ये साचलेल्या गढूळ पाण्यामुळे दिसून येत नाहीत. त्यामुळे या पुलावरील वाहतूक धोकादायक झाली आहे.

दापोली-साखळोली मार्गे गावतळेकडे जाणारा हा मार्ग वाहतुकीच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा असा मार्ग आहे. या मार्गावर असलेल्या कारीवणी नदीच्या पुलावर उखडलेल्या स्लॅबच्या डागडुजीकरीता सिमेंट कॉक्रीट ओतून उखडलेला स्लॅब बुजवून पुलावरील वाहतूक सुरळीत करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रयत्न करावे, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.


## देवरुख येथे रक्तदान शिबिराचे आयोजन

**रत्नागिरी** : रत्नागिरी रक्तपेढी शासकीय रग्णालय, आयसीटीसी विभाग ग्रामीण रुग्णालय देवरुख, स्वयंपूर्तता फाऊंडेशन रत्नागिरी व श्रमिक कृषी संवर्धन संस्था चिपळूण यांच्या संयुक्त विद्यमाने २५ जुलै रोजी देवरुख येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. देवरुख शहरातील ग्रामीण रुग्णालयाच्या पहिल्या मजल्यावर सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत हे शिबीर होणार आहे. या रक्तदान शिबिरात जास्तीत जास्त रक्तदात्यांनी भाग घेऊन रक्तदानाच्या पवित्र कामाला सहकार्य करण्याचे आवाहन सामाजिक कार्यकर्ते युयुत्सु आर्ते, वैशाली पुजारी यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# कोस्टल रोडवर सीसीटीव्हीची नजर

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबईचा प्रवास वेगवान करणाऱ्या कोस्टल रोडवर आता सुरक्षेसाठी तब्बल २३६ सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. या कॅमेऱ्यांच्या माध्यमातून वाहनांच्या वेगाची माहिती, अपघातांवर नजर ठेवण्यात येत असून सुरक्षेची खबरदारी घेतली जात आहे.




पालिकेच्या माध्यमातून उभारण्यात आलेला स्वराज्यरक्षक छत्रपती शिवाजी महाराज मुंबई किनारी रस्ता हा टप्प्याटप्प्याने वाहतुकीसाठी खुला करण्यात आला असून आता संपूर्ण सुमारे १० किमीचा मार्गावर वेगवान वाहतूक सुरू आहे. या मार्गावर सुरक्षेची काळजीदेखील घेण्यात आली आहे. या प्रणालीमुळे मुंबई किनारी रस्त्यावर कोठेही अपघात झाला तर नियंत्रण कक्षाला त्याची त्वरित माहिती मिळते आणि अपघातग्रस्तांना मदत उपलब्ध होते. तसेच दिवसभरात किती वाहनांनी या मार्गाचा वापर केला, त्या वाहनांचे प्रकार कोणते, किती वाहनांनी वेगाची मर्यादा ओलांडली याचीही नोंद या कॅमेरा प्रणालीमुळे ठेवण्यात येत आहे.

प्रिन्सेस स्ट्रीट उड्डाणपूल ते वरळी-वांद्रे सागरी सेतूच्या वरळी टोकापर्यंत हा प्रकल्प उभारण्यात आला आहे. या प्रकल्पावर दोन्ही बाजूने वाहतूक सुरू झाली आहे. या मार्गाच्या प्रिन्सेस स्ट्रीट उड्डाणपूल ते वरळी वांद्रे सागरी सेतूच्या वरळी टोकापर्यंत चार प्रकारचे वैशिष्ट्य असलेले, एकूण २३६ सीसीटीव्ही कार्यान्वित झाले आहेत.

## चिखली मांडवकरवाडीत रानगव्याचे दर्शन

**गुहागर** : तालुक्यातील चिखली मांडवकरवाडी जि.प. शाळा नंबर. २ या शाळेच्या समोर भर दुपारच्या सुमारास भल्या मोठ्या रानगव्याचे दर्शन घडले. शाळेतील विद्यार्थी, शिक्षक व पालकांनी या गव्याला पाहण्यासाठी गर्दी केली. वाढत्या जंगलतोडीमुळे हे रानगवे वाडी वस्तीमध्ये येऊ लागले आहेत. या रानगव्यासोबत आणखीही ४ ते ५ रानगव्यांचे समूह असल्याचे येथील ग्रामस्थांकडून बोलले जात आहे. तसेच, या जंगलतोडीवाल्यांना संबंधित खात्याच्या अधिकाऱ्यांचा आशीर्वाद आहेच त्यामुळे रानतोडीचे प्रकार वाढले आहेत. या रानगव्यांमुळे एखादा अनुचित प्रकार घडू नये यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष घालावे, असे काही ग्रामस्थांमधून बोलले जात आहे.

## उघड्या चेंबरमध्ये कोसळून वृद्धाचा मृत्यू

**ठाणे** : डोंबिवलीतील टाटा पॉवर नाका परिसरातून सोमवारी दुपारी बाबू चव्हाण (६०) हे पायी जात होते. अचानक त्यांचा पाय घसरून ते रस्त्यालगत असलेल्या एमआयडीसीच्या पाण्याच्या उघड्या वॉल चेंबरमध्ये पडले. यात त्यांच्या डोक्याला गंभीर जखम झाली. त्यांना तातडीने चेंबरमधून बाहेर काढून डोंबिवलीतील एका खासगी रुग्णालयात दाखल केले; मात्र उपचारांदरम्यान चव्हाण यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. तर बाबू चव्हाण यांच्या मुलांनी एमआयडीसी प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे ही घटना घडल्याचा आरोप केला आहे.

# सर्वात मोठ्या केस स्टडीचे अनावरण

## २४ जुलैला थेट प्रक्षेपणाद्वारे सादरीकरण

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

सेव्ह अर्थ मिशनच्या इंडिया चॅप्टरचे अध्यक्ष संदीप चौधरी दूरदर्शी नेतृत्व, आध्यात्मिक विज्ञान आणि ग्रासरूट कृतीचे प्रतीक म्हणून उदयास येत आहेत. संदीप चौधरी २४ जुलै २०२५ रोजी पृथ्वीवरील सर्वात मोठ्या केस स्टडीचे सादरीकरण करणार आहेत. याचे थेट प्रक्षेपण फर्स्ट इंडिया न्यूज चॅनलवर रात्री ८ वाजता जगभरातील माध्यमे, शास्त्रज्ञ, पर्यावरणवादी आणि धोरण-निर्माते यांच्यासमोर होणार आहे.

संदीप चौधरी यांचा वाढता प्रभाव आता ऑनलाइनही स्पष्ट दिसत आहे. ऊर्जा, चेतना आणि टिकाऊपणावरील त्यांच्या साहसी विचारांमुळे त्यांचे नाव भारत, संयुक्त अरब अमिराती आणि अमेरिकेत एक्सवर नियमितपणे ट्रेंड करत आहे. १०० पेक्षा जास्त यशस्वी स्टार्टअप्स सुरू करण्यासाठी प्रसिद्ध असलेले संदीप चौधरी हे व्यावसायिक जगातून बाहेर पडून पृथ्वीसाठी अग्रगण्य योद्धा बनले आहेत. एक सुधारक आणि हवामान समर्थक म्हणून ते आता सेव्ह अर्थ मिशनचे नेतृत्व करत आहेत. ही नॉन प्रॉफिट संस्था पर्यावरणीय संतुलन पुनर्स्थापित करण्याच्या मिशनवर कार्यरत आहे.



त्यांच्या मार्गदर्शनाखाली सेव्ह अर्थ मिशनने नुकतेच एका तासात ५ लाखापेक्षा जास्त झाडे लावून गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड मिळवला आहे.

जग २४ जुलै रोजी अपेक्षित केस स्टडीच्या अनावरणाची तयारी करत आहे. तेव्हा आंतरिक सूत्रांनी एक क्रांतिकारी ब्लूप्रिंटकडे इशारा केला आहे, जो पर्यावरण विज्ञान, आध्यात्मिक ज्यामिती आणि पुढील पिढीच्या हवामान तंत्रज्ञानाला एकत्र जोडतो. हे फक्त आणखी एक हवामान भाषण नाही. ही मूल्यांकन, नवकल्पना आणि कृतीची ऐतिहासिक क्षण आहे. सेव्ह अर्थ मिशन ही एक आंतरराष्ट्रीय नॉन प्रॉफिट संस्था आहे. जी पुनर्वनीकरण, नवकल्पना आणि सामूहिक सामुदायिक कृतीद्वारे हवामान बदलाचा सामना करण्यासाठी कार्यरत आहे. २०४० पर्यंत ३० अब्ज झाडे लावण्याच्या महत्त्वाकांक्षी लक्ष्यासह हे मिशन तंत्रज्ञान, पारदर्शकता आणि जन-संचालित प्रगतीसह पुढे जात आहे.

## एकाच रात्री दोन ठिकाणी घरफोडी

**कोल्हापूर** : पुलाची शिरोलीत बंद घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी दोन ठिकाणी चोरी केली. एका ठिकाणी दोन लाख ३० हजार रुपयांची रोकड व सोन्या-चांदीचे दागिने असे तीन लाख ८६ हजार रुपयांची चोरी झाली आहे. तर अन्य एका ठिकाणीही मोठी चोरी झाल्याचा अंदाज आहे. मात्र, त्या घरातील कुटुंबीय वैद्यकीय उपचारासाठी पुण्याला गेल्याने चोरीस गेलेल्या मालाचा नेमका अंदाज लावता येणार नसल्याचे पोलिसांनी सांगितले. शनिवारी रात्री अकरा ते रविवारी सकाळी नऊच्या दरम्यान ही चोरी झाली आहे. या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# परप्रांतीयाकडून रिसेप्शनिस्ट तरुणीला मारहाण

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

कल्याणमध्ये एका खासगी रुग्णालयात रिसेप्शनिस्ट तरुणीला परप्रांतीय तरुणाकडून बेदम मारहाण झाल्याची घटना समोर आली आहे. मारहाणीची घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. याप्रकरणी मानपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गोपाल झा असे आरोपीचे नाव असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

नांदिवलीतील एका खासगी रुग्णालयात पीडित तरुणी ही रिसेप्शनिस्ट म्हणून काम करते. गोपाल झा हा परप्रांतीय तरुण डॉक्टरांना भेटायला आला होता. यावेळी डॉक्टरांच्या केबिनमध्ये आधीच एमआर बसले होते. त्यामुळे डॉक्टरकडे एमआर बसले आहेत, तुम्ही जरा थांबा, असे तरुणीने आरोपीला सांगितले. यानंतर गोपालने तिच्याशी वाद घालायला सुरवात केली.

यानंतर आरोपीने तरुणीच्या अंगावर धावून येत तिला लाथ मारली. त्यानंतर तिच्या केसांना धरून तिला फरफटत नेत मारहाण केली. याप्रकरणी मानपाडा पोलिसात नोंद करण्यात आली आहे. आरोपी फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

# पोषण आहाराच्या धान्याचे अनियमित वितरण

**। संगमेश्वर । प्रतिनिधी ।**

शालेय पोषण आहारासाठी लागणाऱ्या धान्याचे वितरण वेळेत होत नसल्यामुळे तालुक्यातील काही प्राथमिक शाळांच्या व्यवस्थापन समित्या तसेच संगमेश्वर तालुका शिक्षण संस्थाचालक संघटना उपोषण करण्याच्या तयारीत आहेत.



शाळा सुरू होऊन आता एका महिन्यापेक्षा जास्त कालावधी संपत आला तरीही अद्याप शाळांना मिळणारा पोषण आहार मिळालेला नाही. त्यामुळे आता पोषण आहार कुठला शिजवायचा आणि कुठून आणून द्यायचा, असा प्रश्न शाळा व्यवस्थापनाला पडला आहे. पोषण आहार वेळेत मिळत नसल्यामुळे प्राथमिक, माध्यमिक शाळातील व्यवस्थापन समित्या, माता पालकसंघामधून गेले महिनाभर तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. पोषण आहाराचे धान्य, साहित्य फेब्रुवारी महिन्यांपासून मिळालेले नसल्याने अजून किती दिवस उसनवारी करायची, असा प्रश्न केला जात आहे.

तसेच, इतर धान्यांकरिता, साहित्यासाठी लागणारा पैसा कसा उभा करायचा, याचीही चिंता शाळा व्यवस्थापनासमोर उभी ठाकली आहे. विद्यार्थ्यांना सकस आहार मिळावा, ते शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त व्हावेत, यासाठी शासनाने शालेय पोषण आहार योजना आणली; मात्र संगमेश्वर तालुक्यासह अन्य तालुक्यांत पोषण आहाराचा तुटवडा आहे. पोषण आहार वितरणात सातत्याने अनियमितपणा येत असल्याने ठेकेदाराचा ठेकाच रद्द करावा, अशीही मागणी जोर धरत आहे.

# खड्ड्यांमध्ये झाडे लावून आंदोलन

**। पुणे । प्रतिनिधी ।**

बावधन परिसरातील रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. यामुळे अनेक समस्या उद्भवल्या असून, याबाबत वारंवार तक्रारी करूनही पुणे महापालिकेकडून दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे बावधनमधील स्थानिक नागरिकांनी रस्त्यावरील खड्ड्यांमध्ये झाडे लावून अनोखे आंदोलन केले.

बावधन परिससात अनेक उच्चभ्रू सोसायटी तयार झाल्या आहेत. मात्र पायाभूत सुविधा पुरविण्याबाबत प्रशासन अपयशी ठरत आहे. रस्त्याची तर भयंकर दुरवस्था झाली असून, रस्ते दुरुस्ती होत नसल्याने प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी नागरिकांनी खड्ड्यांमध्ये रोपे लावून प्रशासनाच्या उदासीनतेचा समाचार घेतला.

खड्डे पडल्याने पावसाचे पाणी खड्ड्यात साचून राहिल्याने खड्डे दिसत नाहीत आणि त्यामुळे अपघाताची शक्यता नाकारता येत नसल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले. 'रस्ते दुरुस्त होत नसतील तर निदान झाडे तरी उगवू द्या!' अशा आशयाचे फलक आणि घोषणा देत रहिवाशांनी प्रशासनाचे लक्ष वेधून घेतले.

> “ रस्ता दुरुस्तीची कामे युद्धपातळीवर चालू आहेत. पावसामुळे दुरुस्तीच्या कामात अडथळे येत आहेत. लवकरच बावधन परिसातील खड्डे बुजवून रस्त्यांची दुरुस्ती करण्यात येईल.
> – विजय नायकल,
> सहाय्यक आयुक्त, कोथरूड क्षेत्रीय कार्यालय ”

## बाजारपेठेत चालत जाणेसुद्धा कठीण | गणेशोत्सवापूर्वी उपाययोजना राबविण्याची मागणी

# शृंगारतळीत पार्किंगची समस्या गंभीर

**। गुहागर । प्रतिनिधी ।**

**गुहागर तालुक्याची आर्थिक राजधानी असणाऱ्या शृंगारतळी बाजापेठेत वाहतूक कोंडीबरोबरच पार्किंगची समस्या दिवसेंदिवस अधिक उग्र होत चालली आहे. गणेशोत्सवापूर्वी पोलीस यंत्रणेने याकडे अधिक गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याची प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली आहे.**


शृंगारतळी ही गुहागर तालुक्याची मध्यवर्ती बाजारपेठ असून या ठिकाणी संपूर्ण तालुक्यासह इतरत्रहून अनेकजण रोज बाजारात येत असतात. मात्र, रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या या बाजारपेठेत रस्त्याच्या फूटपाथवरून चालत जाणे नागरिकांना अत्यंत कठीण झाले आहे. बाजारपेठेतील काही दुकानदारांनी आपल्या दुकानासमोर आणखी जागा वाढवून आपला माल ठेवलेला असतो. त्यामध्ये अनेक हात गाडीवाले ही उभे असतात, तर उरलेल्या जागेत संपूर्ण बाजारपेठेत फूटपाथवर चारचाकी व असंख्य दुचाकी उभ्या केलेल्या असतात. त्याच्यापुढे रिक्षांची रांग असते, त्यामुळे उरलेल्या चिंचोळ्या जागेतून वाहने मंदगतीने पुढे सरकत असतात. राज्य परिवहनच्या गाड्या त्यांच्या अधिकृत थांब्यावर योग्य पध्दतीने उभ्या राहू शकत नाहीत, एवढी कमी जागा शिल्लक असते. शृंगारतळी बाजारपेठेत एस.टी. स्टँड ते मालाणी दुकानापर्यंत प्रवासी रिक्षास्टँड आहे. तर त्याच्या उजव्या बाजूला पलिकडे आबलोलीकडे जाणारी असंख्य अनधिकृत प्रवासी वाहने मोठ्या रांगेत उभी असतात. तसेच, बाजारपेठेच्या जानवळे फाट्यापासून ते मळण फाट्यापर्यंतच्या दुतर्फा रस्त्यावर हजारो वाहनांनी रस्ता व्यापलेला असल्याने सर्वत्र गाडयाच गाड्या दिसून येतात. वाहतूकीच्या या कोंडीप्रमाणेच आजूबाजूच्या परिसरातील शेकडो गुरे रस्त्यावर ठाण मांडून बसलेली असतात. शृंगारतळी बाजारपेठेतील वाहतूकीची समस्या व गुरांचा त्रास यावर येथील पाटपन्हाळे ग्रा. पं.ने अनेकवेळा तोडगा काढण्याचा प्रयत्न केला, परंतू तो पूर्ण सफल झालेला नाही. बाजारपेठेत ग्रा. पं वा पोलीस पाटील यांना न जुमानन्याची येथे पध्दत पडून गेली आहे. सद्या वाहतूकीची समस्या अधिक उग्र झाली असून पोलिसांनी, ग्रा. पं. ने व तंटामुक्त समिती यांनी या शिस्तीसाठी कठोर होणे गरजेच असल्याचे मत सर्व नागरिकांनी व्यक्त केले आहे.

> **“ गुहागर-विजापूर महामार्गाचे रुंदीकरणाचे काम मुळातच दर्जाहीन झालेले आहे. पूर्वीचा जो रस्ता या बाजारपेठेतून होता तो रुंद व सोयीस्करच होता. मात्र, सध्या तयार करण्यात आलेला रस्ता पूर्वीपेक्षाही अरुंद आहे. त्यातच गटारांच्या पुढे रस्त्यावरच लागलेल्या हातगाड्या, खाजगी वाहने त्यामुळे वाहतुकीस या रस्त्याची रुंदी अपुरी ठरते. आणि या कारणामुळेच शृंगारतळी बाजारपेठेत वाहतुकीची कोंडी होऊन अपघाताला आमंत्रण मिळते.**
> **– असीम साल्हे,**
> **उपसरपंच, पाटपन्हाळे ”**

# पुण्यात टी.ओ.डी.ची सक्ती

**। पुणे । प्रतिनिधी ।**

पुणे शहरात महावितरणकडून गेल्या काही दिवसांपासून ग्राहकांच्या परवानगीशिवाय सक्तीने टी.ओ.डी. वीजमीटर बसविण्याचे काम सुरू आहे.




## ● नव्या वीजमीटरमुळे दुप्पट बिल

मात्र, या नवीन वीजमीटरमुळे वीजबिले दुप्पट येऊ लागली आहेत. याबाबत महावितरणला विचारणा केल्यानंतर महावितरण अदानी कंपनीकडे बोट दाखवत आहे. महावितरणकडून वीजग्राहकांना टीओडी (टाइम ऑफ डे) वीजमीटर मोफत बसविले जात आहेत. पुणे परिमंडलात आतापर्यंत वेगवेगळ्या प्रकारच्या ४ लाखांहून अधिक ग्राहकांना वीजमीटर बसविण्यात आले आहेत. हे मीटर बसवण्याचे कंत्राट विविध कंपन्यांना विभागून दिले असून, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लिमिटेडने स्मार्ट मीटर बसवण्यासाठी मागवलेल्या सहा निविदा पैकी दोन अदानी समूहाने मिळवल्या आहेत. पुण्यात अनेक ठिकाणी अदानींच्या कंपनीचे लोक परस्पर मीटर बसवून जात आहेत. मात्र, जुन्या वीजमीटरच्या बिलाच्या तुलनेने नवीन मीटर बसवल्यानंतर दुप्पट ते तिप्पट बिल येत असून वीजग्राहकांची डोकेदुखी वाढल्याचे दिसून येत आहे.

# विजेअभावी नागोठणेकर अंधारात

## महावितरणचा सावळा गोंधळ, जीर्ण झालेला खांब पडल्याने वीज पुरवठा खंडित

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

**सुरळीत सेवा देण्याचा गाजावाजा महावितरण कंपनी कायमच करीत आली आहे. मात्र, जीर्ण झालेले वीज खांब वेळेवर बदलेले नाही. त्यामुळे वीज पुरवठा खंडीत होऊ संपुर्ण नागोठणेकर रात्रभर अंधारात राहिले आहेत. त्यामुळे नागरिकांचे खुप हाल झाले.**

महावितरणच्या भोंगळ कारभाराबाबत अनेकांनी नाराजी व्यक्त केली आहे. सोमवारी (दि.२१) रात्री दहा वाजण्याच्या सुमारास कुंभार आळी परिसरात, रुची हॉटेल जवळील उच्च वीज वाहिनीचा जीर्ण झालेला विजेचा खांब कोसळला. त्यामुळे नागोठण्याची बत्तीगुल झाली. काही भागात रात्री उशिराने वीज पुरवठा सुरळीत झाला तर काही भागात रात्रभर वीज न आल्याने नागोठणेकरांना प्रचंड त्रास झाला.

नागोठणे रुची हॉटेलच्या पुढे चितळकर जिमच्या मागे उच्च वाहिनीचा पोल पडला. नागोठणे शहरातील गांधी चौक, मोहल्ला बेकरी, जोगेश्वरी मंदिर परिसर, खडक आळी, अंगार आळी या भागातील लाईट उद्या सकाळी म्हणजेच मंगळवारी सुरू होईल असा अधिकृत संदेश वीज वितरणाच्या व नागोठण्यातील इतर व्हॉट्सप समूहावर सोमवारी वीज वितरणाच्या कर्मचाऱ्यांकडून रात्री टाकण्यात आला होता. मात्र मंगळवारी (दि.२२) सायंकाळी उशिरापर्यंत वीजपुरवठा सुरळीत झाला नसल्याचे दिसून आले.



शटडाऊनसाठी मंगळवारी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत वेळ असूनही इतर भागातील वीजपुरवठा सुद्धा पूर्ववत न झाल्याने नागोठण्यातील इतर भागातील नागरिकांनीही या प्रकाराबद्दल संताप व्यक्त केला.

पावसाळ्यापुर्वी उन्हाळ्यात एक दिवस वीज दूरुस्तीसाठी महावितरण कंपनीकडून वीज पुरवठा खंडीत करण्यात आला. वीज खांब, तारा दुरुस्ती करण्यापासून रोहित्र बदलणे, वीज तारांवर आलेल्या झाडांच्या फांद्या तोडण्याचे काम महावितरण कंपनीमार्फत करण्यात आले. तत्कालीन सहाय्यक अभियंता नितीन जोशी यांनी वारंवार शट डाउन घेऊनही विज दुरुस्तीची आवश्यक ती कामे न झाल्याने नागोठणेकरांवर वारंवार विजेच्या मोठ्या संकटाला सामोरे जावे लागत आहे. कधी विजेचा खांब पडला, कधी विजेचा तारा तुटल्या, कधी जंपर, तर कधी कंडक्टर तुटला अशा अनेक कारणांमुळे नागोठण्यात दररोज वीज पुरवठा खंडित होत आहे. विद्युत पुरवठा खंडित झाल्यानंतर वीज वितरणाच्या नावाने केवळ सोशल मीडियावर संताप व्यक्त केला जात आहे. विजेच्या बाबतीतील हे हाल कधी संपणार असा प्रश्न इमाने इतबारे न चुकता येईल ते वीज बिल निमूटपणे भरणाऱ्या सर्वसामान्य ग्राहकांना पडला आहे.

### जनता दरबार भरविण्याची मागणी

**विजेच्या बाबतीत नागोठणेकरांना कुणी वाली आहे की, नाही असा प्रश्नही आत उपस्थित होत आहे. वीज वितरणाच्या पेण, पाली व रोहा येथील वरिष्ठ अधिकाऱ्यांना बोलवून नागोठण्यातील विजेच्या समस्यांसाठी नागोठण्यात जनता दरबार घेण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.**

> **“गेले काही दिवस सुरु असलेल्या मुसळधार पावसामुळे चितळकर जिमच्या मागील बाजूस असलेल्या विजेच्या खांबाच्या ठिकाणी पाणी भरले होते. हाच खांब रात्री कलंडला त्यामुळे नागरिकांना रात्रभर अंधारात राहावे लागले. मात्र कर्मचारी वर्गाने पाऊस असूनही जीर्ण झालेला विजेचा खांब उभा करण्याबरोबरच उच्च दाब विजेच्या ताराही बदलल्या. शट डाऊनमध्ये काम वाढल्याने ती कामे करण्यासाठी अधिक वेळ घ्यावा लागला. येत्या काही दिवसांत वीजपुरवठा खंडित होणार नाही यासाठी खबरदारी घेऊ.”**
>
> **– सत्येंद्र सिंग, सहाय्यक अभियंता, नागोठणे कार्यालय**

# लायन्स क्लब अध्यक्षपदी ॲड. ऋग्वेद ठाकूर

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

लायन्स क्लब मांडवाच्या २०२५-२६ वर्षासाठीच्या नवीन कार्यकारिणीचा पदग्रहण आणि शपथविधी सोहळा रविवार (दि.२०) जुलै रोजी क्षात्रैक्य समाज सभागृहात पार पडला. यावेळी, लायन्स क्लब ऑफ मांडवाचे नवनिर्वाचित अध्यक्ष ॲड. ऋग्वेद ठाकूर, उपाध्यक्ष हर्षद पाटील, सचिव पंकज केसरकर, खजिनदार अजय आंगणे यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांनी आपल्या पदाची शपथ घेतली आणि कार्याची सूत्रे हाती घेतली.




या सोहळ्याला लायन्स हेल्थ फाऊंडेशनचे अध्यक्ष, माजी प्रांतपाल अनिल जाधव, गिरीश म्हात्रे, डॉ. रेखा म्हात्रे आणि मावळते अध्यक्ष जितेंद्र ठाकूर आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.

२०२५-२६ या वर्षांकरिता ॲड. ऋग्वेद ठाकूर यांनी अध्यक्षपदी, पंकज केसरकर सचिव, अजय आंगणे खजिनदार, मृदुला राऊत सहसचिव, विनिता पाथारे सहखजिनदार, सुधीर पुरो सहखजिनदार, हर्षद पाटील, प्रदीप पाटील उपाध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळतील. प्रीती पाटील, मिनल ठाकूर, जितेंद्र ठाकूर, अमिश शिरगावकर, सुबोध राऊत, सुनीता पुरो, बी.एन. कोळी, अमरेश शिरगावकर, सारिका पाटील, विद्या अधिकारी, नितीन दांडेकर, धवल राऊत, नितीन अधिकारी, अरविंद घरत, मोहन पाटील, सुमित पाटील, अभिजीत गुरव यांची निवड करण्यात आली आहे.

या शपथविधी सोहळ्यास लायन्स क्लब अलिबागचे अध्यक्ष प्रदीप नाईक, गुरुनाथ माळी, प्रदीप सिनकर, दिलीप गाटे, विकास पाटील, अरविद अग्रवाल, नयन कवळे, भगवान मालपाणी, महेद्र पाटील, महेश कवळे, श्रीबाग सेंटिनियलचे ॲड. डॉ. के.डी. पाटील, संदीप नागे, अनिल म्हात्रे, कुणाल पाथरे, अमित नाईक, जितेश्री ठाकूर, चंद्रकांत मल्हार, मीनल ठाकूर, उज्वला पाटील, निलम देशमुख आदींसह तालुक्यातील इतरही लायन्स क्लबचे पदाधिकारी आणि सदस्य या सोहळ्यासाठी उपस्थित होते.



## ‘ओळख साहित्यिकांची’ उपक्रमाचा शुभारंभ

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

शालेय विद्यार्थ्यांना विविध साहित्यिकांची माहिती व्हावी या उद्देशाने सामर्थ्य शब्दांचे या अभियानाअंतर्गत ‘ओळख साहित्यिकांची’ या उपक्रमाचा शुभारंभ खालापूरच्या स्वामी विवेकानंद विद्या मंदिरातील सभागृहात करण्यात आला.

राजीव मुळेकर यांनी शालेय विद्यार्थ्यांना लहानपणापासूनच साहित्याची गोडी निर्माण व्हावी, साहित्यिकांची ओळख करून देणार असल्याचे सांगितले. या उपक्रमातील पहिले पुष्प गुंफताना थोर साहित्यिक व रायगड जिल्ह्याचे भूषण असलेल्या कै. र. वा. दिघे यांच्या साहित्य प्रवासाचा आढावा घेतला. दिघे यांनी २१ कादंबऱ्या, कथासंग्रह, नाटके इ. साहित्यप्रकार लिहिले,शेतकरी, आदिवासी यांच्या वेदना त्यांनी आपल्या साहित्यातून मांडल्या. याप्रसंगी राजीवजी मुळेकर, नितीन भावे, साईनाथ पाटील, प्रतिभा मंडावळे, सतीश राणे, प्रवीणा पवार उपस्थित होते.

## धगडवाडीत वनमहोत्सव उत्साहात



**। कोलाड । प्रतिनिधी ।**

श्री रामचंद्रापुर मठ पुरस्कृत माँ. राष्ट्र प्रतिष्ठानच्या अमृतधारा गोशाळा भट फॉर्म कोलाड सुतारवाडी येथे (दि.२०) जुलै रोजी वनमहोत्सव साजरा करण्यात आला.वनमहोत्सवामध्ये मुंबई, डोंबिवलीच्या सदस्यांनी व वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी भाग घेतला होता. यावेळी आंबा, आवळा, चाफा असे विविध प्रकारांचे रोपे गोशाळा परिसरात लावण्यात आली. दरवर्षी लावलेले रोपांच्या काळजी घेणे तसेच परिसरांमध्ये हिरवळ राखण्याचे काम माँ. राष्ट्र प्रतिष्ठान ट्रस्ट करत आहे.

# वाढत्या मजुरीमुळे हांदा पद्धत लाभदायक

**। खांब । वार्ताहर ।**

भारत हा कृषीप्रधान देश असल्यामुळे आपल्या देशातील बहुसंख्य लोकांचा व्यवसाय हा शेती आहे. रायगड जिल्ह्याला भाताचे कोठार म्हणून ओळखले जाते. असे असले तरी दिवसेंदिवस शेती क्षेत्रावर येणारी संकटांची मालिका व वाढत्या महागाईमुळे शेती करणे परवडत नसल्याची शेतकरी वर्गाची भावना आहे. त्यावर उपाय म्हणून शेतीतील हांदा पद्धत लाभदायक ठरत असल्याचे दिसून येत आहे.



आपला वडिलोपार्जित व्यवसाय टिकवून व त्यावर उपजीविका करणाऱ्या शेतकरी वर्गाची संख्याही मोठी असल्याने शेती परवडत नसली तरी सहकुटुंब व हांदा पद्धतीचा अवलंब करून शेती केली जात आहे.या पद्धतीत

मजूरी न देता एकमेकांच्या शेतावर दिवसभर काम करायचे, ज्या शेतकऱ्याच्या शेतात जेवढे दिवस काम केले जाते तेवढे दिवस त्या शेतकऱ्याने पहिल्या शेतकऱ्याच्या शेतात दिवस काम करायचे या पद्धतीला हांदा पद्धत असे म्हणतात.

सध्या मजुरीचे वाढते दर पाहता त्यावर योग्य तोडगा म्हणून पुर्वापर चालत आलेली हांदा पद्धतच योग्य असून गावोगावी बहुतांश शेतकरी याच पद्धतीचा अवलंब करून शेतीची लागवड करीत असल्याचे दिसून येत आहे.

### आर्थिक बचत

**या पद्धतीत कोणत्याही प्रकारची मजूरी द्यावी लागत नसल्याने ही पद्धती तर परवडतेच याशिवाय मोठ्या प्रमाणात आर्थिक बचतही होत असल्याचे शेतकरी वर्गाचे म्हणणे आहे.**

## श्रीया फाऊंडेशनतर्फे आंब्याच्या कलमांचे वाटप

**। उरण । प्रतिनिधी ।**

निसर्गाचे रक्षण व्हावे तसेच शेतकऱ्यांना शेतीव्यतिरिक्त स्थिर उत्पन्न मिळून त्यांच्या कुटुंबाचा आर्थिक स्थर उंचवावा या उद्देशाने पाले गावात श्रीया फाऊंडेशन पालेतर्फे रवि भोईर यांच्या हस्ते मोफत शंभर आंब्याच्या कलमांचे वाटप करण्यात आली. यावेळी श्रीया फाऊंडेशन पाले संस्था करीत असलेल्या वेगवेगळ्या उपक्रमांचे कौतुक करण्यात आले. यावेळी ऋषिकेश म्हात्रे, धनेश गावंड, शशी पाटील, देवेंद्र पाटील, जीवन गावंड, अमित म्हात्रे, चंद्रकांत



म्हात्रे , पोसुराम म्हात्रे, पंकेश म्हात्रे, धर्मा म्हात्रे, गजानन म्हात्रे, रमाकांत म्हात्रे, राजेश म्हात्रे, विनोद म्हात्रे, अनिल म्हात्रे, गंगाराम म्हात्रे, अविनाश म्हात्रे, संदीप म्हात्रे, अजित म्हात्रे, कमलाकर म्हात्रे, अजय म्हात्रे, देवयानी म्हात्रे, रुपाली म्हात्रे, प्रगती म्हात्रे, अनिता फडके , शैला म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

## चेरवली परिसरात वृक्षलागवड

**माणगाव :** सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक उपक्रम राबविणाऱ्या चेरवली गावातील ग्रामस्थ व मुंबईकर मडळाच्यावतीने रविवार (दि.२०) जुलै रोजी गावच्या परिसरात ४५० झाडांचे रोपण करण्यात आले. ग्रामस्थ, मुंबईकर मंडळाच्या वतीने प्रतिवर्षी वृक्षारोपण, विद्यार्थी गुणगौरव असे कार्यक्रम करण्यात येतात. यावर्षीही ग्रामस्थ व मुंबईकर मंडळाच्या वतीने गावच्या माळरानावर तसेच मुख्य रस्त्याच्या दुतर्फा एकूण ४५० विविध झाडे लावण्यात आली.

## शालोपयोगी वस्तूंचे वाटप



**। रसायनी । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषद शाळांतील आवरे, गोवठणे, पाले, पाणदिवे, कोप्रोलीवाडी, सारडे, वशेणी, कडापे, पुनाडे, पुनाडेवाडीतील विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम रामदास गावंड आणि एएससी कॉलेज येथील एसएससी बॅच १९९२ च्या माजी विद्यार्थी यांच्या संयुक्त विद्यमानाने करण्यात आला. यामध्ये नितिन, ॲड. आर. डी. ठाकूर, रामलाल ठाकूर, संजय म्हात्रे, बामन डोंगरी, हसुराम म्हात्रे, सदाशिव पाटील आदी उपस्थित होते.

**लवकरच होणार नूतनीकरण** | **निसर्ग चक्रीवादळात मोठे नुकसान**

# हरिहरेश्वर पोलीस चौकी टाकणार कात

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

**सागरी सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाची असणारी हरिहरेश्वर येथील पोलीस चौकी गेली काही वर्ष बंद अवस्थेत होती. निसर्ग चक्रीवादळात या चौकीचे नुकसान झाले होते, तेव्हापासून नादुरुस्त अवस्थेत असणाऱ्या पोलीस चौकीची दुरुस्ती करण्याची मागणी स्थानिकांनी केली होती. रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी ग्रामस्थांच्या मागणीची दखल घेत चौकीच्या नुतनीकरण संदर्भात लवकरच प्रक्रिया सुरू होणार असल्याचे सांगितले.**



श्रीवर्धन तालुक्याला ५८ किलोमीटर लांबीचा समुद्र किनारा लाभला असून अनेक ठिकाणी सुरक्षेच्या दृष्टीने सागरी पोलीस चौक्यांची आवश्यकता आहे. त्यानुसार सागरी किनाऱ्यावर पोलीस बंदोबस्त असणे गरजेचे आहे. मुंबईतील १९९३ साली झालेल्या बॉम्ब स्फोटानंतर जुलै १९९६ रोजी हरिहरेश्वर येथे पोलीस चौकी उभारण्यात आली. पोलीस चौकी करीता हरिहरेश्वर ग्रामपंचायतीने जागा उपलब्ध करून दिली होती. परंतु, काही कालावधीत मनुष्यबळ अभावी पोलीस चौकी बंद झाली.

### महत्वाची पोलीस चौकी

**१९९३ साली मुंबई येथे झालेले १३ साखळी बॉम्ब स्फोटासाठी वापरण्यात आलेले आरडीएक्स हे शेखाडी येथे उतरविण्यात आले होते. तेव्हापासून हरिहरेश्वर किनारा असुरक्षित वाटू लागला. दक्षिण काशी हरिहरेश्वर येथील वाढते पर्यटन तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस चौकी गरजेची आहे.**

ग्रामस्थांच्या पाठपुराव्यामुळे २०१८ सालात पुन्हा सुरू झालेल्या पोलीस चौकीच्या इमारतीला निसर्ग चक्री वादळाचा फटका बसला त्यात पोलीस चौकीच्या इमारतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. अमित खोत आणि सुयोग लांगी तसेच ग्रामस्थांनी पुढाकार घेत स्वखर्चाने इमारतीची डागडुजी केली. यानंतर काही दिवस पोलीस चौकीत दोन पोलीस कर्मचारी तैनात असायचे, मात्र, पुन्हा मनुष्यबळ अभावी गेल्या काही वर्षांपासून सदरची पोलीस चौकी बंद अवस्थेत होती.

रायगड पोलीस अधीक्षक दलाल यांच्या सुचनेनुसार श्रीवर्धन उपविभागीय पोलीस अधिकारी सविता गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीवर्धन पोलीस ठाणे पोलीस निरीक्षक उमेश पाटील यांनी हरिहरेश्वर येथील दुरावस्थेतील पोलीस चौकी इमारतीची पाहणी केली. यावेळी फैसल हर्जुक, अमित खोत, सुयोग लांगी व ग्रामस्थ उपस्थित होते.

> **“पोलीस चौकी नूतनीकरणाचे काम आम्ही प्राधान्याने करत आहोत. त्यासाठी पोलीस अधीक्षक दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली काम सुरु आहे. नूतनीकरणासाठी आम्ही सीएसआर फंड तसेच डिपीडिसी फंड यामधून आवश्यक निधी मिळण्यासाठी प्रयत्न करत आहोत.”**
>
> **– सवीता गर्जे, उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीवर्धन, जि. रायगड**

## निवडक



### नेरळमध्ये विद्यार्थ्यांची पायी दिंडी

**नेरळ :** आषाढ मास कामिका एकादशीनिमित्त नेरळ आणि परिसर वारकरी संप्रदाय मंडळांच्या वतीने पायी दिंडी काढण्यात आली. वारकऱ्यांनी विद्या विकास शाळेच्या विद्यार्थ्यांसह नेरळ गावात दिंडी काढली. नेरळ आणि परिसर वारकरी संप्रदाय यांच्या वतीने कामिका एकादशीचे आयोजन केले होते. एकादशीनिमित्त नेरळ गावातील श्रीहनुमान मंदिरात सकाळपासून धार्मिक कार्यक्रम सुरू होते. पहाटे चार वाजता काकडाने दिंडीची सुरुवात झाली. तसेच सकाळी मान्यवर यांचे हस्ते देवता पूजन करण्यात आले. त्यात गणेश पूजन, हनुमान पूजन, दीप पूजन, कलश पूजन, विठ्ठल रखुमाई पूजन, श्री माऊली पूजन, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पूजन, तुळशी पूजन, टाळ-मृदुंग पूजन, वीणापूजन आणि ध्वजपूजन करण्यात आले. या उपक्रमात विद्या विकास शाळेच्या विद्यार्थी सहभागी झाले होते. पायी दिंडी सोहळ्याची सुरुवात हनुमान मंदिर येथून निघालेली दिंडी जगतगुरु तुकाराम महाराज चौक, हुतात्मा हिराजी पाटील चौक, श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक, हुतात्मा भाई कोतवाल चौक अशी ही पायी दिंडी स्टेशन रस्त्याने खांडा गावात पोहचली. तेथे श्री विठ्ठल रखुमाई मंदिरात दिंडीचे स्वागत करण्यात आले. तेथून ही दिंडी कल्याण कर्जत रस्त्याने मोहाचीवाडी येथे पोहचली. त्यावेळी श्री साईबाबा देवस्थान येथून ही दिंडी गणेशघाटमार्गे श्री गजानन महाराज मंदिर अशी हेटकर आळी येथे पोहचली. तेथे श्री गणेश मंदिर येथे दिंडीचे स्वागत करण्यात आले आणि पुढे ही दिंडी चेडोबा मैदान येथून श्री हनुमान मंदिर येथे समाप्त झाली. यावेळी नागो गवळी, सुनीता सूर्यकांत राणे, काशिनाथ ठमके, शरद गवळी, उमेश यादव, रामदास साळुंखे, पद्मा थोरवे, उर्मिला हजारे आदी पदाधिकारी उपस्थित होते.



### टिएमसीमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत

**माणगाव :** जे. बी. सावंत एजुकेशन सोसायटीचे टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेज माणगाव येथे शुक्रवार (दि.१८) जुलै रोजी शैक्षाणिक वर्ष २०२५-२६ करीता प्रथमवर्ष बीकॉममध्ये प्रवेश घेतलेल्या नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत संस्थेतर्फे पुष्प गुच्छ देऊन करण्यात आले. यावेळी संस्थेचे सचिव नानासाहेब सावंत यांच्याहस्ते कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यांनी प्रथमवर्ष बीकॉममध्ये प्रवेश घेतलेल्या सर्व नवोदित विद्यार्थ्यांचे आपल्या मनोगतातून स्वागत केले. या कार्यक्रमास संस्थेचे रामदास पुराणिक, प्रा.अशोक मोरे, डॉ. नितीन मुटकुळे, प्रा.जगदीश शिगवण, प्रा. मुटकुळे, प्रा.अमित बाकाडे, प्रा. भारत पवार, प्रा.सायगावकर, दिलीप ढेपे, सर्व शिक्षक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिषा शिंदे यांनी करून प्रा. अशोक मोरे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता झाली.



### लावणीची कामे अंतिम टप्प्यात

**तळा :** तळा तालुक्यात भातशेती लावणीच्या कामात सध्या शेतकरी व्यस्त असून भातशेतीची ७५ टक्के लागवड पुर्णत्वासकडे गेली आहे. यावर्षी पावसाने वेळेपूर्वीच हजेरी लावली. मे महिन्याच्या अखेरीस झालेला अवकाळी पाऊस त्यापाठोपाठ मान्सूनची हजेरी यामुळे शेतीच्या कामात अनेक अडचणी आल्या. शेतकऱ्यांना धुळवाफ्याची पेरणी करताच आली नाही. अनेकांनी चिखलपेरा केला तर काहींनी राहू पध्दतीने पेरणी केली. तळा तालुक्याचा भाग हा अधिक प्रमाणात डोंगराळ वरकस भातशेतीचा आहे. जून महिन्यात सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाला. तळ्यामध्ये जून महिन्यापासून भात शेतीच्या लागवडीला सुरूवात झाली. यावर्षी तालुक्यात भात पिकाखाली ९४९.८० हेक्टर असून ७३६.५० हेक्टरवर भातशेतीची लावणी पुर्णत्वास गेली आहे. त्याच बरोबर नाचणी पिकासाठी २९१.५८ हेक्टर क्षेत्र लागवड योग्य असून आज अखेर पर्यंत ३०.५० हेक्टर क्षेत्रावरती पेरणी करण्यात आली असून आज अखेर पर्यंत १९०.०७ हेक्टर क्षेत्रावरती नाचणीची लावणी पुर्ण करण्यात आली आहे. आता पर्यंत तळा तालुक्यात अंदाजे सरासरी ५० टक्के पावसाची नोंद झाली आहे. एकंदरीत परिस्थिती समाधानकारक असून शेतकरीवर्ग लावणीच्या कामात व्यस्त आहे. अंदाजे १० दिवसांत लावणीची कामे आटोपतील असे शेतकरी वर्गातून बोलले जात आहे. पाऊस आजपर्यंत चांगला पडत आहे. त्यामुळे शेती चांगली आहे.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- अलिबागमधील ऑफिसकरीता सिवील सुपरवायझर. civil engineer व ड्राफ्टसमन पाहिजे. मो.नं. ९९७०३९१६९७
- गोंधळपाडा येथील गृहप्रकल्पाकरीता अनुभवी सिव्हील इंजिनिअर/साईट सुपरवाइजर पाहिजेत. संपर्क- ९५९५०४१६१२/८१८०८६१२३४
- अंध दिव्यांग क्षेत्रात काम करणाऱ्या GSP INDIA या संस्थेला अलिबागमध्ये पद भरणे आहे. प्रकल्प समन्वयक शिक्षण पदवीधर/MSW मानधन (१२००० ते १५००० पात्रतेनुसार) सामाजिक संस्थेत काम केल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य. आपला बायोडाटा ९०९६२१४२९४ या क्रमांकावर पाठवा. www.gspindia.org

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# उरणमध्ये 'रत्नागिरी ८' भात वाणाची लागवड

| उरण | प्रतिनिधी |

उरण तालुक्यातील आवरे गावातील शेतकरी काळुराम पोशीराम गावंड यांच्या शेतात रत्नागिरी ८ या भात वाणाची ४ सूत्री पद्धतीने यशस्वीरित्या लागवड करण्यात आली. तालुका कृषी अधिकारी अर्चना सूळ नारनवर यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रायोगिक उपक्रम राबवण्यात आला. या प्रात्यक्षिकादरम्यान, उपस्थित असलेल्या शेतकऱ्यांना ४ सूत्री भातलागवड पद्धतीबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच या आधुनिक लागवड पद्धतीमुळे होणारे विविध फायदे समजावून सांगण्यात आले.

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे पोयनाड, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली शेतजमिन मिळकत सौ.स्नेहलता प्रमोद जाधव व श्री.संदेश सुरेश पाटील यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहे. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्या बाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील सौ.स्नेहलता प्रमोद जाधव व श्री.संदेश सुरेश पाटील, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/ संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४(चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी, हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| पोयनाड, ता.अलिबाग. | २७/२/ब | ०-०५-६० एकूण | ०-९४ |

अलिबाग,
दिनांक : २२/०७/२०२५.

सही/
**(ॲड. संजय म.भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग टिळक रोड
अलिबाग रायगड
खरेदीदारांचे वकील

## जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे पोयनाड, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या शेतजमिन मिळकतीपैकी ०-०१-४० (हे.आर) शेतजमिन मिळकत श्री.प्रविण प्रभाकर पाटील यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहे. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्या बाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री.प्रविण प्रभाकर पाटील, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४(चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वास कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| पोयनाड, ता.अलिबाग. | २७/२/अ/२ | ०-१०-०० एकूण | १-५० |

सदरील शेतजमिन मिळकतीपैकी श्री.सतीश गणपत पाटील यांच्या मालकीची ०-०१-४० (हे.आर), आकार रू.०-२१ पैसे, ही शेतजमिन मिळकत.

अलिबाग,
दिनांक : २२/०७/२०२५.

सही/
**(ॲड. संजय म.भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग टिळक रोड
अलिबाग रायगड
खरेदीदारांचे वकील

## जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे महान, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या शेतजमिन मिळकतीपैकी ०-८०-०० (हे.आर) शेतजमिन मिळकत श्री.नितेश भिमराव कातुर्डे, श्री.सतिश भिमराव कातुर्डे, श्रीमती नितिना भिमराव कातुर्डे, श्रीमती उज्वला भिमराव कातुर्डे, श्री.चंद्रकांत बाबुराम कातुर्डे, राहणार महान, ता. अलिबाग, जि.रायगड यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकतीपैकी ०-३०-०० (हे.आर) शेतजमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहेत. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्या बाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री.नितेश भिमराव कातुर्डे, श्री.सतिश भिमराव कातुर्डे, श्रीमती नितिना भिमराव कातुर्डे, श्रीमती उज्वला भिमराव कातुर्डे, श्री.चंद्रकांत बाबुराम कातुर्डे, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० (दहा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| महान ता.अलिबाग | ५२/१ | ०-८८-००<br>०-१२-०० पो.ख.<br>१-००-०० एकूण | १-३० |

सदरील वर नमूद मिळकतीमधील ०-८०-०० (हे.आर) शेतजमिन मिळकत श्री.नितेश भिमराव कातुर्डे, वगैरे यांच्या मालकीची असून, सदरील जमिन मिळकतीपैकी ०-३०-०० (हे.आर) शेतजमिन मिळकत.

अलिबाग,
दिनांक : २२/०७/२०२५.

सही/
**(ॲड. संजय म.भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग टिळक रोड
अलिबाग रायगड
खरेदीदारांचे वकील

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक रोमा मिलिंद अंतानी यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

**मौजे : कडाव तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्रं व उपविभाग/सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ९६/४ | एकुण क्षेत्र ०-२४- ५० हे आर पॉ | ०-८७ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : २३/०७/२०२५

**खरेदीदारा तर्फे वकील ॲड. वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९,
तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग
प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर
अमराई रोड, कर्जत ता. कर्जत,
जि. रायगड ४१०२०१

**खरेदीदारा तर्फे वकील ॲड. निलेश कान्हू मोरे**
मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९.
तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग
प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर.
अमराई रोड. कर्जत ता. कर्जत,
जि.रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

माझे अशिल १) श्री. मनोहर लक्ष्मण ओवळेकर वय सज्ञान, व्यवसाय बांधकाम व्यावसायिक व २) श्री. कुणाल मनिष शाह, वय - सज्ञान, व्यवसाय बांधकाम व्यावसायिक, कार्यालय शॉप नं.५, प्लॉट नं.४९, लक्ष्मणशेठ प्लाझा, से.५, उलवे, ता. पनवेल, जि. रायगड, यांच्या वतीने सर्व जनतेस सदर नोटीसीद्वारे असे सुचित करण्यात येते की खालील वर्णनाच्या जमिनीचे मालक १) श्रीमती. संगिता दिलीप वास्कर, २) सौ. सुप्रिया विकास पाटील, ३) श्री ऋषिकेश दिलीप वास्कर व ४) श्री मयुरेश दिलीप वास्कर, सर्व सज्ञान, राहणार : मौजे कुंडेवहाळ, ता. पनवेल, जि. रायगड यांच्या मालकीची खालील वर्णनाची जमीन आहे.

**जमीन (मिळकतीचे) वर्णन**

| अ.क्र. | गट नं. | ठिकाण | क्षेत्र हे-आर-पॉं | आकार रूपये पैसे |
|---|---|---|---|---|
| ०१ | ४३ | मौजे-मोसारे तलाठी सजा मोसारे, ता. पनवेल, जि. रायगड | ०-५६-९० | १२ = ८१ |

या वर्णनाची जमिन माझे अशिल **खरेदी विक्रीच्या करारनाम्यानुसार** कायमस्वरूपी खरेदी करीत आहेत. तरीही याबाबत कोणाही व्यक्ती व्यक्तींचे किंवा आर्थिक संस्थाचे वरील जमिनीसंबंधी कुठल्याही प्रकारचा दावा हरकती जसे विक्री, गहाण, ताबा, जबाबदारी, बक्षिस, भेट, भाडेपट्टा, वारसाहक्क, कर्ज असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत या जमिनीच्या संबंधातील दस्तऐवजांच्या प्रमाणित प्रतीसह माझ्या कार्यालयीन पत्त्यावर संपर्क साधावा अन्यथा सदर जमिनीच्या खरेदी विक्री बाबतचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल त्यानंतर आलेल्या कुठल्याही प्रकारच्या हरकती तक्रारींचा विचार करण्यात येणार नाही कृपया याची नोंद घ्यावी.

**श्री. निरंत वासुदेव पाटील (ॲडव्होकेट)**
कार्यालय : तळमजला, प्लॉट नं. बी-४०, से. २०, अष्टविनायक बिल्डींग, नेरूळगाव, नवी मुंबई. ७०६. फो.नं. ९३२४५६९८०६

## जाहीर नोटीस

सर्व संबंधित व्यक्ती, संस्था आणि हितधारकांस सूचित करण्यात येते की : मौजे चौल, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खाली नमूद केलेल्या जमिनीचे आमचे आशिलाने खरेदी करण्याचे ठरवले आहे. म्हणून, खाली नमूद करण्यात आलेल्या जमिनीबाबत जर कोणत्याही व्यक्ती, संस्था, ट्रस्ट, सहकारी संस्था, कूळधारक, खरेदीदार, मुद्रक, गहाणदार, तारणदार, भाडेकरू किंवा इतर कोणालाही काही हक्क, स्वत्व, दावा, अडचण, अडथळा किंवा कोणताही कायदेशीर संबंध असेल, तर त्यांनी या नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत योग्य त्या लेखी पुराव्यासह आपल्या हरकती खालील पत्त्यावर सादर कराव्यात.

जर दिलेल्या मुदतीत कोणतीही हरकत प्राप्त झाली नाही, तर सदर जमीन निर्विघ्न आणि निर्विवाद आहे असे मानले जाईल आणि आमचे आशिल त्यानुसार खरेदी व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही हरकती आमच्या आशिलावर कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक राहणार नाहीत, याची सर्वानी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन:**

| अ. क्र. | गट क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १. | २६४६/२ | ०-०३-७२+०-००-२८ (पो.ख) = ०-०४-०० | २.०५ | श्री.मंगेश विश्वनाथ लाड |
| २. | २६४६/२ | ०-०६-८२+०-००-२८ (पो.ख) = ०-०७-१ | ३.७५ | श्री.संदेश विश्वनाथ लाड |

अलिबाग
दि. २३-०७-२०२५

सही/-
**ॲड. सचिन जोशी**
दुसरा मजला, फ्लॅट क्र.३.
साईलिला सोसायटी, डॉ.कुमठेकर
हॉस्पिटल शेजारी श्रीबाग नं.२.अलिबाग,
ता.अलिबाग, जि.रायगड-४०२२०१
मो.: ९८२२६५३६५५

दिनांक : २३/०७/२०२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे नेहुली, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतींचे विद्यमान मालक दिलीप बस्तीमल जैन यांच्या मालकी हक्काची व त्यांचे ताबे कब्जातील व वहिवाटीतील खालील वर्ण केलेल्या मिळकती माझे आशिलांना कायमस्वरुपात विकत देण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| नेहुली ता.अलिबाग, जि.रायगड | १२/१ | ०-२९-१०<br>पो.ख. ०-०२-००<br>एकुण क्षेत्र ०-३१-१० | ६.७५ |

सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाहा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनही पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न असल्यास सदरहू मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे, असे गृहीत धरून माझे आशिल वरील मिळकतींच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील, याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

तारिख : २३/०७/२०२५

सही /-
**ॲड. रिया गणेश पाटील**
जिल्हा न्यायालय अलिबाग- रायगड
रा. मु. नेहुली, पो. खंडाळे
ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९६०७३३१९७५

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, विद्यमान जमिन मालक १. श्रीम. कविता शर्मा, २. श्री. मयंक शर्मा यांचे ताबेकब्जातील व वहीवाटीतील त्यांचे कायदेशीर मालकी हक्कातील व हिश्श्यातील खालील परिशिष्ठामध्ये वर्णन केलेली जमिन आमचे अशिलांनी त्यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचा व्यवहार ठरविला आहे. सदरहू जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मौजे मिरचोली, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन**

| भूमापन क्र | उपविभाग क्र | क्षेत्र हे आर | पो.ख | आकारणी रु. पै. |
|---|---|---|---|---|
| २९ | ४ | ०.१४.४२ | ०.०२.७९ | ०.७० |
| | | एकुण क्षेत्र ०.१७.२१ | | |

वरील वर्णनाच्या जमिनीचे संदर्भात अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, ट्रस्ट, पोटगी, वारसा, भाडेपट्टा, वहिवाट वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने, कोणतेही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहित सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर जमिन निर्वेध व बोजारहीत आहे असे समजणेत येवून सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालकाबरोबर पूर्ण केला जाईल. व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दिनांक : २१/०७/२०२५

**ॲड. मोनाली रामदास हजारे.**
एम.कॉम.एल.एल.बी.
पत्ता- दहिवली, ए.व्ही.एफ रेसिडेन्सी,
ललानी रोड, कर्जत ता.कर्जत, जि.रायगड
मो. नं: ९२६०१०९२८२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे गुंडगे ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीच्या मालकांपैकी सुनिल शंकर भोसले यांचे अविभक्त मालकी हिश्याचे क्षेत्र विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १९ | १ | एकुण क्षेत्र ०-६७-०० पैकी अविभक्त क्षेत्र | ०-४१ |

सदरच्या मिळकतीच्या एकुण क्षेत्रापैकी सुनिल शंकर भोसले यांच्या मालकीच्या अविभक्त हिश्याचे क्षेत्राबाबत

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- २३/०७/२०२५

**ॲड. समीर आर.सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता-गाळा नं.०९, कोर्ट व्हयू
बिल्डींग, तळमजला, दिवाणी व
फौजदारी न्यायालयासमोर, कर्जत,
ता.कर्जत, जि.रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) सावित्री धर्मा पाटील, २) सुमती काशिनाथ पाटील, ३) शारदा गणपत राणे, ४) सुचिता कृष्णा केमनाईक, ५) विजया अनंत पाटील, ६) उदय अनंत पाटील, ७) भुपेंद्र अनंत पाटील, ८) पूजा प्रशांत भगत आणि ९) अपूर्वा अरूण राणे यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/ विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्य काही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव- परहुरपाडा, तालुका - अलिबाग, जिल्हा - रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग ३७५, एकूण क्षेत्र ००-११-०० (हे.आर.चौ.मी.) आकार रु. पै.०.१८/-

**ठिकाण : अलिबाग**
**दिनांक : २३/०७/२०२५**
झुंजारराव आणि कं. करीता
सही/-
विक्रांत झुंजारराव

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १. रमाकांत रामचंद्र कवळे, २. सुरेश रामचंद्र कवळे, ३. मोहिनी मंगेश कवळे, ४. मयूर मंगेश कवळे, ५. साहिल मंगेश कवळे यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/ विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्य काही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव- परहुरपाडा, तालुका - अलिबाग, जिल्हा - रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग ९, एकूण क्षेत्र ००-०८-९० (हे.आर.चौ.मी.) आकार रु. पै.१.७५/-

**ठिकाण : अलिबाग**
**दिनांक : २३/०७/२०२५**
झुंजारराव आणि कं. करीता
सही/-
विक्रांत झुंजारराव

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १. शशिकांत दत्ताराम वडके २. योगेश शशिकांत वडके ३. मानसी यतीन देव यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/ विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्य काही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव- टेकली, तालुका - अलिबाग, जिल्हा - रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग ४९१/१, एकूण क्षेत्र ००-४१-०० (हे.आर.चौ.मी.) आकार रु. पै.०.६९/-

**ठिकाण : अलिबाग**
**दिनांक : २३/०७/२०२५**
झुंजारराव आणि कं. करीता
सही/-
विक्रांत झुंजारराव

## निविदा सुचना

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या संचालन व सुव्यवस्था विभाग रोहा कार्यालयाअंतर्गत असणारे लघुदाब वाहिनीला LT स्पेसर्स लावण्याच्या कामासाठी वर्ष २०२५-२६ च्या करारासाठी परवानाधारक विद्युत ठेकेदारांची नेमणुक करणेसाठी ई-निविदा क्रमांक टी-०७, २०२५-२६ एकूण ०१ निविदा महावितरण कंपनीच्या https://etender.mahadiscom.in/eatApp/ संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निविदा विक्रीसाठी दि. २२.०७.२०२५ ते २९.०७.२०२५ पर्यंत उपलब्ध राहतील. निविदा भरण्याची अंतिम तारिख दि. २९.०७.२०२५ ला रात्रौ ११.५५ वाजेपर्यंत आहे. निविदेच्या आवृत्तीत/शुद्धीपत्रातील कोणताही बदल यापुढे आमच्या संकेत स्थळावर प्रकाशित केला जाईल.

**PRO NO - 216** **कार्यकारी अभियंत्ता, रोहा विभाग**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे जांभिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक अरविंद जयवंत मोरे व राजेश्री अरविंद मोरे यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ३० | २ | ०-५०-०० | ६-५६ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- २३/०७/२०२५

**ॲड. समीर आर. सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता - गाळा नं.०९,कोर्ट व्हयू बिल्डींग,
तळमजला, दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर,
कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे - नांदईपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील गट नंबर १८४, एकूण क्षेत्र ०-५३-६० हे.आर., आकार ११.२५ रू. पैसे ही भातशेती मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक १. विनोद प्रभाकर भोईर २. राजेश प्रभाकर भोईर ३ प्रज्योत उमेश पाटील सर्व रा. मु.पो.झिराड, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : २२/०७/२०२५

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो.,ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड.

प्रोसेस जमा रू. — अर्जदार तर्फे ॲड. रश्मी शिंदे

## जाहीर नोटीस

**अलिबाग येथील मे. जिल्हा न्यायाधिश रायगड सो. यांचे न्यायालयात.**

दि.चौ.अर्ज. क्र. १०६/२०२५

श्रीमती अहिल्या संतोष पाटील — अर्जदार
विरूद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यांत येते की अर्जदार हिने गार्डीयन्स ॲन्ड वॉर्डस ॲक्ट १८९० चे कलम ७ प्रमाणे तीचा अज्ञान मुलगा कु.हर्ष संतोष पाटील व मुलगी कु.सानवी संतोष पाटील यांचा मौजे कुरुळ, ता. अलिबाग, जि. रायगड येथील भुमापन क्रमांक व उपविभाग ६१, क्षेत्र ०-१०-१० हे.आर, आकार रु.०-१७ पै. मध्ये श्री. संतोष पोसू पाटील यांच्या निधनापश्चात वारस म्हणून असलेला प्रत्येकी १/४ अविभक्त हिश्याचे पालक/पालनकर्ते म्हणून नियुक्त केल्याचे जाहीर करणेकरीता आणि कलम २९ अन्वये कु.हर्ष संतोष पाटील व मुलगी कु.सानवी संतोष पाटील यांच्या प्रत्येकी १/४ अविभक्त हिश्याची विक्री इतर सह मालकांसह पूर्व नियोजीत खरेदीदार श्री.हिमांशू असचरज सहानी यांचे लाभांत करण्याकरीता परवानगी मिळणेकामी त्यांची आई या नात्याने अर्ज दाखल केला आहे.

ज्या कोणाचा वर नमुद मिळकतीमध्ये हक्क, हितसंबंध आहे अथवा वरील मालमत्तेबाबत अर्जदार हिला कु.हर्ष संतोष पाटील व मुलगी कु.सानवी संतोष पाटील यांचे पालक/पालनकर्ते म्हणून नियुक्त करून जाहीर करण्यास आणि मौजे कुरुळ, ता.अलिबाग, जि. रायगड येथील भुमापन क्रमांक व उपविभाग ६१, क्षेत्र ०-१०-१० हे.आर, आकार रु.०-१७ पै. मधील कु. हर्ष संतोष पाटील व मुलगी कु.सानवी संतोष पाटील यांच्या प्रत्येकी १/४ अविभक्त हिश्याची विक्री इतर सह मालकांसह पूर्व नियोजीत खरेदीदार श्री.हिमांशू असचरज सहानी यांचे लाभांत करण्यास हरकत उपस्थित करण्यांची आहे, अशा व्यक्तींनी दिनांक २५/०८/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता मे. न्यायालया समोर उपस्थित राहुन त्याबाबतचे आपले लेखी म्हणणे, हरकत सादर करावी.

उपरोक्त मुदतीत कोणाचाही कसलीही हरकत न आल्यास अर्जदार यांना कु. हर्ष संतोष पाटील व मुलगी कु.सानवी संतोष पाटील यांचे सहमालकीचे मौजे कुरुळ, ता.अलिबाग, जि.रायगड येथील भुमापन क्रमांक व उपविभाग ६१, क्षेत्र ०-१०-१० हे.आर, आकार रु.०-१७ पै. या मालमत्तेबाबत पालक/पालनकर्ते म्हणून नियुक्त करून जाहीर केले जाईल आणि त्या मिळकती मधील कु.हर्ष संतोष पाटील व मुलगी कु.सानवी संतोष पाटील यांच्या प्रत्येकी १/४ अविभक्त हिश्याची विक्री नियोजीत खरेदीदार श्री.हिमांशू असचरज सहानी यांचे लाभांत करण्याची परवानगी देण्यात येईल हे सर्वांस कळावे.

आज रोजी माझ्या सहिनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिले.

सही/-
**कनिष्ठ लिपीक**
सही/-
**जिल्हा न्यायाधीश**
**रायगड, अलिबाग**

कोर्टाचा शिक्का

**अधिक्षक**
सही/-
**जिल्हा न्यायाधीश**
**रायगड अलिबाग**

## निवडक



### वाघचवरे भावंडांचा वर्ल्ड रेकॉर्ड

**सोलापूर :** दक्षिण आफ्रिकेमध्ये ८ जून रोजी झालेल्या ९० किलोमीटर कॉम्रेड मॅरेथॉन स्पर्धेत सोलापूरच्या वाघचवरे बंधूनी जागतिक रेकॉर्ड प्रस्थापित केले आहे. १९२१ पासून दक्षिण आफ्रिकेत डर्बन व पीटर्मरीसबर्ग या शहराच्या दरम्यान ही कॉम्रेड मॅरेथॉन भरवली जाते. डॉ. स्मिता झांजुर्णे (बहीण) तसेच डॉ. सत्यजित वाघचवरे व डॉ. अभिजीत वाघचवरे या तिघा भारतीय भावंडांनी ही स्पर्धा पूर्ण केली.या स्पर्धेला अल्टिमेट ह्यूमन रेस असे देखील संबोधले जाते. कारण ही स्पर्धा या दोन शहरांमधील असंख्य, अवघड अशा चढ-उतार असलेल्या टेकड्यांमधून, बारा तासांच्या आत, अतिशय प्रतिकूल वातावरणात पूर्ण करावी लागते. भाऊ- बहिणींनी मिळून ही स्पर्धा पूर्ण करण्याची जगातली ही पहिलीच वेळ होती. हे एक जागतिक रेकॉर्ड आहे. त्यांना याची मान्यता लंडन व दिल्ली स्थित वर्ल्ड वाईड बुक ऑफ रेकॉर्ड या संस्थेने दिली आहे.वर्ल्ड वाईड बुक ऑफ रेकॉर्ड्स या संस्थेने वाघचवरे भावंडांना एप्रिसिएशन सर्टिफिकेट बरोबरच मेडल व ट्रॉफी, पर्सनलाईज्ड टी-शर्ट, विशेष शाई पेन व त्यांची मानाची कॅप दिली. वाघचवरे बंधूंना कोचिंग मुंबईचे प्रसिद्ध मॅरेथॉनपटू सतीश गुजारन यांनी केले. ज्यांनी १४ वेळा ही कॉम्रेड मॅरेथॉन पूर्ण केली आहे. तर डॉ. स्मिता राहुल झांजुर्णे यांना पुण्याचे योगेश सानप यांचे कोचिंग लाभले.

### इंग्लंडने स्वतःसाठी खड्डा खणला!

**मँचेस्टर :** भारत-इंग्लंड यांच्यातली चौथी कसोटी उद्यापासून मँचेस्टरच्या ओल्ड ट्रॅफर्ड येथे खेळवली जाणार आहे. यजमान इंग्लंडने मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली असल्याने मँचेस्टरमध्ये विजय मिळवणे टीम इंडियासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. दुखापतींमुळे टीम इंडियाला प्लेइंग इलेव्हन निवडणे आव्हानात्मक वाटत असले तरी इंग्लंडने आधीच त्यांचे अंतिम अकरा खेळाडू जाहीर केले आहेत. पण, इंग्लंडची ही घाई त्यांनाच महागात पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे आणि तशी भन्नाट आकडेवारी समोर आली आहे. बुधवारपासून सुरू होणाऱ्या चौथ्या कसोटीसाठी इंग्लंडने सोमवारी प्लेइंग इलेव्हन जाहीर केली. हॅम्पशायरचा फिरकीपटू लिएम डॉसन हा दुखापतग्रस्त शोएब बशीर याच्या जागी प्लेइंग इलेव्हनमध्ये परतला आहे. ८ वर्षानंतर डॉसन इंग्लंडकडून कसोटी खेळणार आहे. २०१७ मध्ये त्याने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध इंग्लंडसाठी शेवटची कसोटी खेळली होती. त्याने ३ कसोटी सामन्यांत एकूण ८४ धावा केल्या, तर ७ विकेट्स घेतल्या आहेत. लिएम डॉसनने २०१७ मध्ये भारताविरुद्धच्या सामन्यातून इंग्लंडच्या कसोटी संघात पदार्पण केले होते.

### एकांश सिंगच्या शतकाने झुंजवले

**नवी दिल्ली :** भारत-इंग्लंड यांच्या १९ वर्षांखालील संघाच्या दुसऱ्या कसोटीच्या दुसऱ्या दिवसाचा बराचसा वेळ पावसात वाया गेला. भारतीय गोलंदाजांनी भेदक मारा करताना इंग्लंडचा निम्मा संघ ८० धावावंर तंबूत पाठवला होता, परंतु इंग्लंडच्या तळाच्या फलंदाजांनी संघर्ष केला. भारतीय वंशाच्या एकांश सिंगच्या शतकाने इंग्लंडला सावरले. त्याला कर्णधार थॉमस रेव व जेम्स मिंटो यांची साथ मिळाली.



भारतालाही डावाची अपेक्षित सुरुवात करता आली नाही आणि वैभव सूर्यवंशीच्या अपयशाने भारतीयांचे टेंशन वाढले आहे.इंग्लंडच्या दोन्ही सलामीवीर बीजे डॉकिन्स आणि अॅडम थॉमस यांना अनुक्रमे आदित्य रावत व हेनिल पटेल यांनी भोपळ्यावर माघारी पाठवले. त्यानंतर आरएस अंब्रिशने इंग्लंडच्या आर्यन सावंत ( २०) व बेन मायेस ( ३१) यांना बाद केले. रॉकी फ्लिंटॉप १६ धावांवर रावतच्या गोलंदाजीवर झेलबाद झाल्यानंतर इंग्लंडची अवस्था ५ बाद ८० अशी झाली होती.भारताने सामन्यावर घेतलेली पकड नंतर इंग्लंडने सैल केली. कर्णधार थॉमस व एकांश ही जोडी मैदानावर उभी राहिली आणि दोघांनी सहाव्या विकेटसाठी ११० धावा जोडल्या. थॉमस ५९ धावांवर बाद झाला. पुष्पकने हे यश मिळवून दिले. त्यापाठोपाठ त्याने राल्फी अल्बर्टला (१६) बाद केले. पण, एकांश मैदानावर उभा राहिला आणि यावेळी त्याला जेम्सची साथ मिळाली. जेम्सने ४६ धावांची खेळी करून संघाला तीनशे पार पोहोचवले. एकांश १५५ चेंडूत १४ चौकार व ३ षटकारांसह ११७ धावांवर बाद झाला आणि इंग्लंडचा पहिला डाव ३०९ धावांवर आटोपला.

### सरफराजने केले वजन कमी

**मुंबई :** टीम इंडियात कमबॅक करण्यासाठी सरफराज खान सरावासोबतच जिममध्ये घाम गाळताना दिसतोय.भारतीय कसोटी संघातून वगळल्यावर मिळालेल्या मोकळ्या वेळात तो फिटनेवर भर देतोय. दोन महिन्यात १७ किलो वजन कमी करून दाखवत त्याने कमालीच्या बॉडी ट्रान्सफॉर्मेशनसह सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. सरफराज खान याला इंग्लंड दौऱ्यावर टीम इंडियात स्थान मिळाले नाही. अधिक वजन असल्यामुळे २७ वर्षीय क्रिकेटर ट्रोल झालाय. एवढेच नाही तर टीम इंडियात सिलेक्शनसाठीही ही गोष्ट त्याच्या आडवी आली.आता सरफराज खान याने जिममध्ये कठोर मेहनत घेत सर्वांनी आदर्श घ्यावा असा फिटनेसचा फंडा जपल्याचे दिसते. त्याचा नवा लूक सध्या चर्चेचा विषय ठरतोय. इंग्लंडचा माजी क्रिकेटर केविन पीटरसन याने तर सरफराजचे कौतुक करताना थेट पृथ्वी शॉला टोमणा मारला आहे.सर्वोत्तम प्रयत्न, फिटनेसवर घेतलेली मेहनत मैदानातील कामगिरी करण्याच्या कामी येईल, असे म्हणत केविन पीटरसन याने सरफराजला शाब्बासकी दिली. पृथ्वी शॉ ही फिटनेसच्या मुद्यावरून चर्चेत राहिला होता.

# भारतामध्ये बुद्धीबळाचा विश्वकरंडक

## ■ ३० ऑक्टोबर ते २७ नोव्हेंबरमध्ये केले जाणार आयोजन

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

**भारतामध्ये तब्बल २३ वर्षांनंतर बुद्धीबळ विश्वकरंडकाचे आयोजन करण्यात येणार आहे. या वर्षी (२०२५) ३० ऑक्टोबर ते २७ नोव्हेंबर यादरम्यान भारतामध्ये बुद्धीबळ विश्वकरंडकाची रंगत पाहायला मिळणार आहे, अशी माहिती फिडे या आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ संघटनेकडून सोमवारी देण्यात आली.**







याआधी बुद्धिबळाच्या विश्वकरंडकाचा मान भारताला २००२ मध्ये मिळाला होता. भारताचा महान खेळाडू विश्वनाथन आनंद यांनी त्यावेळी विश्वविजेतेपदाचा मान संपादन केला होता. आता तब्बल २३ वर्षांनंतर पुन्हा एकदा भारतामध्ये बुद्धीबळ विश्वकरंडकाची रंगत पाहायला मिळणार आहे. फिडेकडून याप्रसंगी स्पष्ट करण्यात आले, की गेल्या काही वर्षांमध्ये हा करंडक विविध फॉरमॅटमध्ये खेळवण्यात आला. पण २०२१पासून एकेरी बाद फेरीच्या नियमाचा श्रीगणेशा करण्यात आला. प्रत्येक फेरी तीन दिवसांमध्ये खेळवण्यात येते. पहिल्या दोन दिवसांमध्ये क्लासिकल प्रकारामध्ये खेळाडूंचा कस लागतो. अखेरच्या दिवशी टायब्रेकचा अवलंब करण्यात येतो. अर्थात टायब्रेकची गरज पडल्यास ही फेरी खेळवण्यात येते.

### गुकेश, प्रज्ञानंद, अर्जुनवर मदार

भारतात होत असलेल्या बुद्धीबळ विश्वकरंडकात भारताचे तीन खेळाडू सहभागी होतील. जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतील विजेता डी. गुकेश, २०२३ विश्वकरंडकातील उपविजेता आर. प्रज्ञानंद व जागतिक क्रमवारीत पाचव्या स्थानावर असलेला अर्जुन एरीगेसी या तीन खेळाडूंवर भारताची या करंडकातील मदार असणार आहे. २०२३मधील विश्वकरंडकातील विजेता मॅग्नस कार्लसन हादेखील या स्पर्धेत खेळू शकणार आहे.

### प्रतिष्ठेच्या स्पर्धेचे आयोजन

भारतामध्ये याआधी बुद्धिबळातील प्रतिष्ठेच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये २०२२मधील बुद्धीबळ ऑलिंपियाड, टाटा स्टील चेस, २०२४मधील जागतिक ज्युनियर २० वर्षांखालील अजिंक्यपद मालिका, फिडे महिलांची ग्रँडप्रिक्स या स्पर्धांचा समावेश आहे. यंदा बुद्धीबळाचा विश्वकरंडकही खेळवण्यात येणार आहे.

### भारताचे कौतुक

फिडेचे मुख्य कार्यकारी अधिकारी इमिल सुतोवस्की यांच्याकडून भारत व येथील क्रीडाप्रेमींचे कौतुक करण्यात आले. ते म्हणाले की भारतामध्ये २०२५मधील विश्वकरंडकाचे आयोजन करण्यात येणार आहे. हे सांगताना आम्हाला आनंद होत आहे. भारतामध्ये या खेळावर प्रेम करणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. ऑनलाइन व ऑफलाइन अशा दोन्ही प्रकारांत भारतामध्ये या खेळाला उदंड प्रतिसाद लाभतो.

## राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेमध्ये ‘मिडलाईन कर्जत’ संघ उपविजेता

**| पाली/गोमाशी | वार्ताहर |**

स्व.शंकरराव उर्फ बुवा साळवी चषक व राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा बालेवाडी पुणे येथे आयोजक बाबुराव चांदेरे प्रतिष्ठान पुणे यांच्या वतीने नुकतेच करण्यात आले होते. या स्पर्धेत राज्यातील पुणे, रायगड, कोल्हापूर, मुंबई, नांदेड, रत्नागिरी जिल्ह्यातील नामवंत १६ संघांनी सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेत अनेक रोमहर्षक लढती प्रेक्षकांना पहायला मिळाल्या.



या स्पर्धेतील सतेज बाणेर संघ पुणे अजिंक्य ठरला तर रायगडचा मिडलाईन कर्जत संघ उपविजेता पदाचा दावेदार ठरला. या स्पर्धेत प्रशिक्षक अनिकेत म्हात्रे आणि भगवान् शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मिडलाईन कर्जत संघाने नेत्रदीपक कामगिरी करून कर्जत तालुका तसेच रायगड जिल्ह्याचे नाव राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत कोरले. उपविजेत्या संघास आकर्षक चषक व रोख रक्कम १ लाख ५० हजार रुपये धनादेश देऊन गौरविण्यात आले.

**आशिया कप हॉकी स्पर्धा**

## पाक संघाचा भारतात येण्यास नकार

**| लाहोर | वृत्तसंस्था |**

भारतात होणाऱ्या आशिया कपमध्ये सहभागी होण्यासाठी पाकिस्तान हॉकी संघ येणार नाही. यापूर्वी, भारतीय क्रिकेट संघ या वर्षी फेब्रुवारी-मार्चमध्ये झालेल्या चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये पाकिस्तानमध्ये खेळण्यासाठी गेला नव्हता. भारताने त्यांचे सर्व सामने तटस्थ स्थळ दुबई येथे खेळले.

पाकिस्तान हॉकी फेडरेशनने आंतरराष्ट्रीय हॉकी फेडरेशनला कळवले आहे की ते पुढील महिन्यात भारतात होणाऱ्या आशिया कपमध्ये आपला संघ पाठवू शकत नाहीत. भारतातील सध्याची परिस्थिती आणि सुरक्षेच्या कारणास्तव हा निर्णय घेण्यात आल्याचे पीएचएफने म्हटले आहे.

हॉकी आशिया कप २७ ऑगस्टपासून होणार आहे, जो ७ सप्टेंबरपर्यंत बिहारमधील राजगीर स्टेडियमवर खेळला जाईल. पीएचएफचे अध्यक्ष तारिक बुगती म्हणाले की त्यांनी एफआयएच आणि आशियाई हॉकी फेडरेशन यांना पत्र लिहून त्यांच्या चिंता व्यक्त केल्या आहेत.

## नायरला घरवापसीची मिळाली परवानगी

**इंग्लंड :** करुण नायर टीम इंडियात पुनरागमनासाठी गेल्या काही वर्षापासून प्रयत्न करत होता. पण आठ वर्षांनंतर त्याला भारतीय संघात स्थान मिळालं आहे. मात्र तीन सामन्यांच्या सहा डावात त्याची बॅट काही चालली नाही. दुसऱ्या आणि तिसऱ्या कसोटीत त्याला तिसऱ्या स्थानावर फलंदाजीला पाठवलं. असं असताना त्याला चौथ्या कसोटीसाठी प्लेइंग इलेव्हनमध्ये स्थान मिळेल की नाही याबाबत सांगणं कठीण आहे. असं असताना एक मोठी बातमी समोर आली आहे. करुण नायरला घर वापसीची परवानगी मिळाली आहे.

## आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त रेड रन मॅरेथॉन स्पर्धा संपन्न

**| रायगड | प्रतिनिधी |**

प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी मुंबई यांच्या आदेशानुसार व जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार १२ ऑगस्ट हा दिवस आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त जिल्हा एड्स प्रतिबंध या नियंत्रण विभाग, जिल्हा सामान्य रुग्णालय रायगड अलिबाग व लायन्स क्लब, श्रीबाग यांच्या संयुक्त विद्यमाने रेड रन मॅरेथॉन स्पर्धा संपन्न झाली.



या रेड रन स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा शल्यचिकित्सक, डॉ. निशिकांत पाटील यांच्या शुभहस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आले. या कार्यक्रमाचे वेळी निवासी वैद्यकीय अधिकारी (बाह्य) डॉ. किरण शिंदे, डॉ. अनंत बिडकर, डॉ. रवी वरट, डॉ. बंडेवाड, डॉ. प्रवीण कंदाडे, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक संजय माने, अमित पुंडे, अॅड. कला पाटील, अॅड. निहा राऊत, तानाजी भोसले, तपस्वी गोंधळी, डॉ. भैरवी मालवणकर आदी उपस्थित होते.

रायगड जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची व्हाट्सअॅप व स्पर्धेच्या ठिकाणी प्रत्यक्ष नोंदणी करून एचआयव्ही, एड्सच्या अनुषंगाने युवा वर्ग हा अत्यंत महत्वाचा घटक असून त्यांच्यामध्ये एचआयव्ही, एड्सच्या अनुषंगाने जनजागृती व्हावी या मुख्य उद्देशाने सदर रेड रन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धा अलिबाग समुद्रकिनाऱ्यावरून सुरुवात करून ती काँग्रेस भुवन समोरून हिराकोट तलावाला फेरी मारून पुन्हा त्याच मार्गाने समुद्र किनाऱ्यावर सांगता करण्यात आली. त्यामधून मुलांमध्ये प्रथम क्रमांक स्वागत पाटील, पी.एन.पी. कॉलेज वेश्वी, द्वितीय क्रमांक अमर धुमाने, केईएस डॉ. सी.डी.देशमुख कॉलेज रोहा व तृतीय क्रमांक अशोक वारगुडे, भाऊसाहेब नेने कॉलेज, पेण यांनी पटकाविला. तर मुलींमध्ये प्रथम क्रमांक नेहा म्हात्रे, जे.एस.एम. कॉलेज, द्वितीय क्रमांक अदिती मेंगाळ, भाऊसाहेब नेने कॉलेज, पेण व तृतीय क्रमांक प्रणाली तळेगावकर, पी.एन.पी. कॉलेज वेश्वी हिने पटकाविला. विजेत्या मुले व मुलींना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

## बीसीसीआय करणार पाकिस्तानची कोंडी!

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

भारत-पाकिस्तान यांच्यातला वाद क्रिकेटच्या मैदानावरही चिघळत चालल आहे. आशिया चषक २०२५ स्पर्धेच्या मुद्यावर तर उभय देशांच्या क्रिकेट संघटना समोरासमोर आल्या आहेत आणि त्यात भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने नेहमीप्रमाणे बाजी मारलेली दिसत आहे. जगातील सर्वात श्रीमंत क्रिकेट संघटनेने आशिया चषक स्पर्धेतून माघार घेण्याची तयारी दर्शवली आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्ड अध्यक्षपद भूषवित असलेल्या आशियाई क्रिकेट परिषदेच्या सर्वसाधारण सभेवर बहिष्कार टाकण्याची तयारी बीसीसीआयने दर्शवली आहे. ही बैठक २४ व २५ जुलैला ढाका येथे होणार आहे.

बीसीसीआयने बैठकीचं ठिकाण बदलावं अशी मागणी केली आहे आणि त्याला आता श्रीलंका व अफगाणिस्तान या क्रिकेट बोर्डानेही पाठिंबा दिल्याचे वृत्त समोर आले आहे. त्यामुळे वार्षिक सर्वसाधारण सभेचं ठिकाण बदलण्याची बीसीसीआयची मागणी आता पीसीबीला मान्य करावी लागण्याशिवाय पर्याय नाही.

या वादाच्या पार्श्वभूमीवर पीसीबी आणि एसीसीचे प्रमुख मोहसिन नक्वी यांनी एजीएम साठी पर्यायी तटस्थ ठिकाणाचा विचार करण्यास नकार दिल्याचे दिसतेय. पाकिस्तानच्या गृहमंत्र्यांनी ढाका एजीएमसाठी अफगाणिस्तान सरकारचा पाठिंबा मिळविण्यासाठी प्रयत्न केला. अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डच्या अधिकाऱ्यांनी ते ढाका येथे जाणार नाहीत, असे आश्वासन दिले आहे. भारत-बांगलादेश यांच्यातल्या अलिकडच्या राजनैतिक तणावामुळे ढाका बैठकीला बीसीसीआयचा विरोध अपेक्षित आहे. बीसीसीआयने अलीकडेच पुढील महिन्यात होणारा सहा मर्यादित षटकांच्या सामन्यांचा दौरा रद्द केला होता. त्यामुळे आता पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला नमतं घेण्याशिवाय काही पर्याय उरलेला नाही.

## जपानी खेळाडूला हरवून प्रणॉयचा प्री-क्वार्टरमध्ये प्रवेश

**| चांगझोऊ | वृत्तसंस्था |**

चांगझोऊ येथे खेळल्या गेलेल्या चायना ओपन बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या एचएस प्रणॉयने पुरुष एकेरीत शानदार सुरुवात केली. तिने जपानच्या कोकी वतानाबेचा ८-२१, २१-१६, २३-२१ असा पराभव करून प्री-क्वार्टर फायनलमध्ये प्रवेश केला. तर अनुपमा उपाध्यायला महिला एकेरीत पराभवाचा सामना करावा लागला. पहिला गेम गमावल्यानंतर प्रणॉयने पुनरागमन केले.



पहिला गेम ८-२१ असा गमावल्यानंतर, प्रणॉयने दुसऱ्या गेममध्ये जोरदार पुनरागमन केले आणि तो २१-१६ असा जिंकला. तिसऱ्या आणि निर्णायक गेममध्ये तो १-७ आणि नंतर १३-२० असा पिछाडीवर होता, परंतु त्याने उत्कृष्ट कामगिरी करत २०-२० असा बरोबरीत आणला आणि शेवटी गेम आणि सामना २३-२१ असा जिंकला.

**कसोटीपूर्वी भारताच्या मार्गात अडथळे | नितीश कुमार रेड्डीची दुखापतीमुळे मालिकेतूच माघार**

# भारतीय संघासमोर प्रश्नांचे षटक!

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

भारतीय संघ कसोटी मालिकेत १-२ असा पिछाडीवर आहे आणि उद्यापासून सुरू होणारी चौथी कसोटी अत्यंत महत्त्वाची असणार आहे. पण, या कसोटीपूर्वी भारताच्या मार्गात अडथळे आले आहेत. नितीश कुमार रेड्डीला दुखापतीमुळे मालिकेतूच माघार घ्यावी लागली आहे, तर अर्शदीप सिंगही दुखापतीमुळे चौथ्या कसोटीतून बाहेर गेला आहे. त्याची दुखापत बरी होण्यासाठी १० दिवस लागणार आहेत.

इंग्लंडने त्यांची प्लेइंग इलेव्हन कालच जाहीर केली आहे आणि त्यांनी ८ वर्षांनी फिरकीपटूला संघात बोलावले आहे. अशात टीम इंडियाला मात्र प्लेइंग इलेव्हन निवडताना सहा प्रश्नांची उत्तरं शोधावी लागणार आहेत. कर्णधार शुभमन गिल, मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर आणि संघ व्यवस्थापन यांना मँचेस्टर कसोटी जिंकण्यासाठी योग्य निर्णय घ्यावे लागणार आहेत.



करुण नायरला ७ वर्षानंतर भारताच्या कसोटी संघात संधी मिळाली, परंतु त्याला काही खास करता आलेले नाही. त्याने सहा डावांमध्ये फक्त १३१ धावा केल्या आहेत आणि त्यामुळे चौथ्या कसोटीत त्याला संधी मिळण्याबाबत प्रश्नचिन्ह आहे.

तिसऱ्या कसोटीत झालेल्या दुखापतीनंतर रिषभ पंत यष्टींमागे दिसला नाही. पण, कालच्या सराव सत्रात त्याने ग्लोव्ह्ज घालून किपिंग केले आणि त्यामुळे चाहत्यांना आनंद झाला. पण, तो पूर्णपणे बरा आहे का, हा प्रश्न अजूनही आहेच. कारण, मँचेस्टर कसोटीच्या दोन डावांत त्याला यष्टींमागे उभे राहणे शक्य होईल का? जबरदस्तीने खेळवल्यास त्याची दुखापत आणखी चिघळू शकते. त्यामुळे ध्रुव जुरेलला संधी दिल्यास तिसऱ्या क्रमांकाचा व यष्टिरक्षणाचा प्रश्न मार्गी लागेल. अशा परिस्थितीत रिषभ पाचव्या क्रमांकावर फक्त फलंदाज म्हणून प्लेइंग इलेव्हनमध्ये खेळू शकतो.

नितीश कुमार रेड्डीच्या अनुपस्थितीत शार्दूल ठाकूर हा एक पर्याय संघाकडे आहे. जलदगती गोलंदाज म्हणून शार्दूलच योग्य पर्याय आहे, परंतु त्याचा फॉर्म चांगला नाही. त्यामुळे नितीशच्या जागी फलंदाजाला संधी दिली जाऊ शकते आणि अशा परिस्थितीत ध्रुव व साई दोघांना संधी मिळू शकते.

आकाश दीपच्या तंदुरूस्तीबाबत अजूनही संभ्रम आहे. आकाश दीपला कंबरेची दुखापत झाल्याचे मानले जात होते, परंतु त्याला कंबरेचा त्रास असल्याचे निष्पन्न झाले. त्याचा सहकारी मोहम्मद सिराजने सांगितले की वैद्यकीय पथक त्याची काळजी घेत आहे. आकाश मँचेस्टरसाठी उपलब्ध असेल की नाही याची त्याने पुष्टी केली नाही.

ओल्ड ट्रॅफर्डची खेळपट्टी संथ असेल, असे काही दिवसांपूर्वी मायकेल आथर्टनने सांगितले होते. त्यांनी भारताने कुलदीप यादव, रवींद्र जडेजा आणि वॉशिंग्टन सुंदर यांना खेळवायला हवे असे सुचवले होते. आकाश दीप खेळेल की नाही हे अनिश्चित असल्याने, कुलदीपसाठी एक दार उघडू शकते.

अंशुल कंबोजला संघात स्थान देण्यात आले आहे. त्याने भारत अ संघासाठी चांगली कामगिरी केली होती. प्रसिद्ध कृष्णाचा फॉर्म पाहता, बुमराह आणि सिराजला योग्य साथ देईल असा गोलंदाज गिलला हवा आहे. साई सुदर्शनला तिसऱ्या क्रमांकासाठी संधी मिळू शकते.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)